
मराठी

# कुमारभारती

## इयत्ता नववी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



## मराठी

# कुमारभारती

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

FH1UZH

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
चौथे पुनर्मुद्रण : २०२२

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ
(सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**निमंत्रित तज्ज्ञ**

श्री. शिवाजी तांबे
डॉ. सुजाता महाजन

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५.

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ, यशवंत देशमुख

**मुखपृष्ठ** : आभा भागवत

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** :

**मुद्रक** :

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता नववीच्या वर्गात स्वागत आहे. 'कुमारभारती' मराठी हे तुमच्या आवडीचे भाषेचे पुस्तक! इयत्ता नववीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा वापर करतो. मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, कल्पना, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

या पाठ्यपुस्तकातून विविध साहित्यप्रकारांची ओळख तुम्हांला करून दिली आहे. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांची तुम्हांला ओळख व्हावी, म्हणून बोलीभाषेतील उतारेही दिले आहेत. ते वाचून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे, हे लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, म्हणून या पुस्तकात अनेक भाषिक कृती दिल्या आहेत.

पाठ्यपुस्तकात तुमच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती व सृजनशीलतेला संधी देण्यासाठी अनेक कृती दिल्या आहेत, त्या कृती तुम्ही जरूर करा. भाषाभ्यासाच्या कृतींतून भाषेचे घटक, त्यांचे उपयोग समजावून घ्या. त्याचबरोबर लेखनक्षमता व अभिव्यक्ती विकास यांसाठी विविध कृती व नमुने दिले आहेत, त्यांचा तुम्ही अभ्यास करा. या कृतींतून तुमच्यातील लेखनकौशल्य व वाङ्मयीन अभिरूची नक्कीच वाढणार आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही तुम्हांला करावयाचा आहे व त्याचे फायदेही समजून घ्यायचे आहेत. पाठ्यघटकाशी संबंधित पूरक माहितीसाठी पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या संदर्भग्रंथ सूचीचा व संकेतस्थळांचा अभ्यासासाठी वापर करावा असे आम्हांला वाटते.

तुमच्या कल्पकतेला आणि विचारांना चालना देणाऱ्या या पाठ्यपुस्तकाबाबतचे तुमचे मत आम्हांला नक्की कळवा.

तुम्हां सर्वांना शुभेच्छा !



**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ एप्रिल, २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

**इयत्ता नववीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या, चर्चा व संवाद समजपूर्वक ऐकता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणांवरील सूचना समजपूर्वक ऐकता येणे.<br>३. घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकता येणे.<br>४. विनोद, गाणी, कविता, कथा व संवाद ऐकून आनंद घेता येणे.<br>५. गीते, समूहगीते, कविता, वक्त्यांची भाषणे व विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.<br>६. विविध बोलीभाषा लक्षपूर्वक व समजपूर्वक ऐकता येणे. |
| भाषण संभाषण | १. गाणी, कविता, समूहगीते स्वराघातासह म्हणता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करता येणे.<br>३. प्रसंगानुरूप व विषयानुरूप स्वत:चे विचार समोरील व्यक्तीला पटवून देता येणे.<br>४. विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या चर्चेत सहभाग घेता येणे.<br>५. प्रभावी भाषण-संभाषणाच्या कौशल्यांचा उपयोग करता येणे.<br>६. विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमांतून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. |
| वाचन | १. पाठ्यपुस्तक व पाठ्येतर साहित्याचे समजपूर्वक व अर्थ लक्षात घेऊन प्रकट वाचन करता येणे.<br>२. योग्य आरोह-अवरोह व विरामचिन्हे यांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>३. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.<br>४. विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>५. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करून, त्या माहितीचा उपयोग करता येणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचून स्वमत निश्चित करता येणे. |
| लेखन | १. श्रुतलेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करता येणे.<br>२. ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याच्या आशयावरील काढलेल्या टिपणांच्या मुद्द्यांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह, सुभाषिते यांचा वापर करून प्रभावी लेखन करता येणे.<br>५. दिलेल्या विषयावर स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग यांवर आधारित चिकित्सक विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.<br>७. घडलेले प्रसंग, कार्यक्रम, घटना यांचे वृत्तान्त लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

अध्ययन कौशल्य

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. दिलेल्या विषयावर मुद्देसूदपणे स्वमत स्पष्ट करता येणे.
३. विविध कार्यक्रमांचा अहवाल तयार करता येणे.
४. आपल्या व इतर बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांची यादी करून विषयनिहाय, अर्थनिहाय वर्गीकरण करता येणे.
५. ऑनलाइन अर्ज भरणे, बिले भरणे यांसारख्या सुविधांचा वापर करता येणे.
६. सोशल मिडियाच्या योग्य व जबाबदार वापराबाबत जाणीव निर्माण होणे.
७. संगणकावरील साहित्याचा वापर करताना संबंधितांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे.
८. प्रसारमाध्यमे/संगणक इत्यादींवरून उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, चिकित्सक विचार करता येणे.
९. संगणक/आंतरजालाच्या साहाय्याने भाषांतर/लिप्यंतरण करता येणे.
१०. विविध सामाजिक समस्यांबाबत होणाऱ्या चर्चेमध्ये सहभागी होऊन आपले विचार मांडता येणे.

भाषाभ्यास

१. रूपक, व्यतिरेक, दृष्टान्त, चेतनगुणोक्ती अलंकार ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
२. आर्या, दिंडी ही मात्रावृत्ते ओळखता येणे.
३. नवरस ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे, त्यांचा आस्वाद घेता येणे.
४. शुद्धलेखनाच्या नियमांचा लेखनामध्ये उपयोग करता येणे.

## शिक्षकांसाठी

मराठी कुमारभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ, कविता, गीते, कृती, स्वाध्याय यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. तसेच व्याकरण घटकांची मनोरंजक, सोप्या व कार्यात्मक पद्धतीने मांडणी केली आहे. उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींतून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्यातील निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांसही संधी मिळणार आहे.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी. त्याचबरोबर या विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्कातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचा अर्थ लक्षात घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा व त्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरणा द्यावी.

मराठी कुमारभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका


## भाग – १

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | वंद्य 'वन्दे मातरम्' (गीत)<br>– ग. दि. माडगूळकर | १ |
| २. | संतवाणी<br>(अ) जैसा वृक्ष नेणे– संत नामदेव<br>(आ) धरिला पंढरीचा चोर–संत जनाबाई | <br>३<br>६ |
| ३. | कीर्ती कठीयाचा दृष्टान्त<br>– म्हाइंभट | ८ |
| ४. | नात्यांची घट्ट वीण<br>– मीरा शिंदे | १० |
| ५. | एक होती समई<br>– उत्तम कांबळे | १३ |
| ❁ | हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन)<br>– मधुकर धर्मापुरीकर | १७ |

## भाग – २

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ६. | या झोपडीत माझ्या (कविता)<br>– राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | २२ |
| ७. | दुपार<br>– राजीव बर्वे | २५ |
| ८. | अभियंत्यांचे दैवत–डॉ. विश्वेश्वरय्या<br>– डॉ. यशवंत पाटणे | ३० |
| ९. | मी वाचवतोय (कविता)<br>– सतीश काळसेकर | ३४ |
| १०. | यंत्रांनी केलं बंड<br>– भालबा केळकर | ३६ |
| ❁ | इंग्लंडचा हिवाळा (स्थूलवाचन)<br>– इरावती कर्वे | ४२ |

## भाग –३

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ११. | मातीची सावली<br>– स्टॅन्ली गोनसाल्विस | ४६ |
| १२. | महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून<br>काया (पोवाडा)<br>– अण्णा भाऊ साठे | ५२ |
| १३. | थोडं 'आ' भारनियमन करूया<br>– मंगला गोडबोले | ५४ |
| १४. | आदर्शवादी मुळगावकर<br>– गोविंद तळवलकर | ५९ |
| १५. | निरोप (कविता)<br>– पद्मा गोळे | ६३ |
| ❁ | 'बिग ५'च्या सहवासात (स्थूलवाचन)<br>– जयप्रकाश प्रधान | ६६ |

## भाग –४

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १६. | वनवासी (कविता)<br>– तुकाराम धांडे | ७१ |
| १७. | ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ<br>– बाळ ज. पंडित | ७३ |
| १८. | हसरे दु:ख<br>– भा. द. खेर | ७६ |
| १९. | प्रीतम<br>– माधुरी शानभाग | ८२ |
| २०. | आपुले जगणे...आपुली ओळख!(कविता)<br>– संदीप खरे | ८६ |
| ❁ | विश्वकोश (स्थूलवाचन) | ८८ |
| ♦ | उपयोजित लेखन | ९४ |

# १. वंद्य 'वन्दे मातरम्'

भाग – १

**ग. दि. माडगूळकर** (१९१९–१९७७) : प्रसिद्ध कवी, गीतकार, लेखक, पटकथालेखक, कादंबरीकार, गीतरामायणकार. 'जोगिया', 'चैत्रबन', 'वैशाखी', 'पूरिया' इत्यादी गीतसंग्रह; 'गीतगोपाल', 'गीतसौभद्र' ही काव्यनिर्मिती; 'कृष्णाची करंगळी', 'तुपाचा नंदादीप' हे कथासंग्रह; 'आकाशाची फळे', 'उभे धागे आडवे धागे' या कादंबऱ्या प्रसिद्ध. भारत सरकारने 'पद्मश्री' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

आपल्या अलौकिक प्रतिभेमुळे 'महाराष्ट्र–वाल्मीकी' म्हणून प्रसिद्ध असलेल्या ग. दि. मा. यांचे प्रखर राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या वीर भारतपुत्रांच्या कृतज्ञतेविषयीचे हे गीत आहे. प्रस्तुत गीत 'चैत्रबन' या काव्यसंग्रहातून घेतले आहे.

वेदमंत्रांहून आम्हां वंद्य 'वन्दे मातरम्' !

माउलीच्या मुक्ततेचा यज्ञ झाला भारती
त्यांत लाखो वीर देती जीवितांच्या आहुती
आहुतींनी सिद्ध केला मंत्र 'वन्दे मातरम्' !

याच मंत्राने मृतांचे राष्ट्र सारे जागले
शस्त्रधारी निष्ठुरांशी शांतिवादी झुंजले
शस्त्रहीनां एक लाभो शस्त्र 'वन्दे मातरम्' !

निर्मिला हा मंत्र ज्यांनी, आचरीला झुंजुनी
ते हुतात्मे देव झाले स्वर्गलोकी जाउनी
गा तयांच्या आरतीचे गीत 'वन्दे मातरम्' !



प्रस्तुत गीत हे केवळ काव्यानंदासाठी समाविष्ट केले आहे. विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे.

## महाराष्ट्र-वाल्मीकी-गदिमा

शारदेच्या साहित्य दरबारातील एक अग्रणी नाव म्हणजे गजानन दिगंबर माडगूळकर. गदिमा म्हणजे मूर्तिमंत प्रतिभा. गदिमा यांच्या सृजनशील प्रतिभेचा उदंड ठेवा महाराष्ट्राला लाभला आहे. ओव्या-अभंगांपासून काव्याचे अनेक प्रकार गदिमांच्या प्रतिभेची साक्ष देतात. 'गीतरामायण' हे दीर्घकाव्य श्रीरामप्रभूंच्या जीवनकथेचा काव्यबद्ध आविष्कार आहे. अवघ्या महाराष्ट्राला वेड लावणारे 'गीतरामायण' म्हणजे गदिमा व सुप्रसिद्ध संगीतकार, गायक सुधीर फडके यांनी घडवलेला चमत्कार होय.

पुणे आकाशवाणीने दर आठवड्याला एक गीत याप्रमाणे सलग छप्पन्न आठवडे संपूर्ण 'गीतरामायण' प्रसारित करून आकाशवाणीच्या इतिहासात एका वेगळ्या विक्रमाची नोंद केली आहे. गीतरामायणाच्या निर्मितीमुळे आधुनिक वाल्मीकी म्हणून मान्यता पावलेले गदिमा हे थोर शब्दप्रभू होते. गीतरामायणातील एकेक शब्द हा चपखल शब्दरचनेचे मूर्त उदाहरण आहे. १.४.१९५५ रोजी प्रथम प्रसारित झालेल्या गीतरामायणातील पहिल्या गीताने सर्व रसिकांना एक अनोखा श्रवणानुभव दिला. गदिमांनी त्यांच्या एकटाकी लेखनशैलीने 'स्वये श्रीरामप्रभू ऐकती' हे पहिले गीत लिहिले. हे गीत भूप रागावर आधारित आहे. या गीतासाठी सुधीर फडके (बाबूजी) यांनी अप्रतिम चाल तयार केली. आपल्या शब्दांनी डोळ्यांसमोर प्रसंगदृश्ये निर्माण करणारे गदिमा व सुमधुर चाल लावून गाणारे सुधीर फडके यांच्या अलौकिक प्रतिभेने रसिकांना जिंकले.

'राम जन्मला ग सखी, राम जन्मला' या गीताची जन्मकथा अत्यंत उत्कंठा वाढवणारी आहे. तेव्हाचा हा प्रसंग. गदिमांचे चिरंजीव श्रीधर माडगूळकर यांच्याच शब्दांत -

''गावाकडची आठवण येतीय वाटतं?'' चहाचा कप हातात घेऊन इतक्या वेळ अस्वस्थ गदिमांकडे पाहत उभी असलेली माझी आई त्यांना म्हणाली. तेव्हा तंद्रीतून जागे होत गदिमा तिला म्हणाले, ''अगं गीतरामायणातलं पुढचं गाणं उद्याच बाबूजींना दिलं पाहिजे.'' संध्याकाळी गदिमा एकटेच लांबवर अगदी थेट रेंजहिल्सपर्यंत पायीच फिरून आले. आल्याआल्याच आईला म्हणाले, 'आज मागील दारी तुळशीवृंदावनाच्या कट्ट्यावरच माझी बैठक घाल.' त्यांच्या सांगण्याप्रमाणे आईने तुळशीवृंदावनाच्या कट्ट्यावरच गादी घालून त्यावर पांढरीशुभ्र चादर घातली. पाठीमागे लोड-तक्के ठेवले. शेजारी बदकाच्या आकाराचे त्यांचे पानसुपारीचे तबक ठेवले. जवळच चंदनाच्या सुगंधाची उदबत्ती लावून ठेवली. 'पपा मागच्या अंगणात लिहायला बसलेत. अजिबात दंगा करू नका' अशी आम्हांला तंबी देऊन, ती पुन्हा रात्रीच्या स्वयंपाकाच्या तयारीला लागली. जाताना नेमाकाकाला तुळशीवृंदावनाजवळ एक ट्यूबलाईट लावून ठेवायला सांगायची मात्र ती विसरली नाही.

संध्याकाळ उलटत चालली. तुळशीवृंदावनावर छाया धरणाऱ्या अशोक वृक्षाची पाने पश्चिमेकडून सुटलेल्या उन्हाळी वाऱ्यामुळे सळसळू लागली, तरी गदिमांच्या पॅडवरील कागदावर एक शब्दही लिहून झाला नव्हता. आईने पुन्हा एकदा त्यांना चहा दिला आणि ''तुम्ही खाली बसला आहात तोपर्यंत मी वरच्या मजल्यावरील तुमची बैठकीची खोली आवरून येते. काही लागलं तर हाक मारा'' असे सांगून ती निघून गेली. त्यालाही आता बराच वेळ झाला होता. मध्यरात्र उलटून गेली तरी गदिमांकडून काहीच निरोप येत नाही हे पाहिल्यावर तिने खाली तुळशीवृंदावनाजवळ बसलेल्या गदिमांना विचारले, ''अहो, जेवणाबिवणाचा काही विचार आहे की नाही? जवळजवळ बारा वाजून गेले आहेत, झालं का नाही तुमचं लिहून?'' ''अग एवढी घाई कशाला करतेस? प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र जन्माला यायचेत, तो काय अण्णा माडगूळकर जन्माला येतोय थोडाच? वेळ हा लागणारच!'' गीतरामायणाच्या ५६ गाण्यांतील रामजन्माचे गीत पहाटे-पहाटे पूर्ण झाले तेव्हा गदिमांनी त्यांच्यासाठी जागत, पेंगुळलेल्या माझ्या आईला ते वाचून दाखवले, तेव्हा त्यांच्याविषयीच्या अभिमानाने तिचा ऊर भरून आला.

**पेंगुळल्या आतपात, जागत्या कळ्या**
**'काय काय' करत पुन्हा, ऊमलल्या खुळ्या**
**उच्चरवे वायू त्यास, हसून बोलला**
**राम जन्मला ग सखी, राम जन्मला...**

FHAR25

# २. संतवाणी-(अ) जैसा वृक्ष नेणे

**संत नामदेव** (१२७०-१३५०) : वारकरी संप्रदायातील संतकवी. संत नामदेवांची अभंगरचना अतिशय उत्कट असून त्यांच्या अभंगाची भाषा सुबोध, सरळ, साधी आहे. संत नामदेवांनी हिंदीतही रचना केली आहे. पंजाबात जाऊन त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवली. शिखांच्या 'गुरु ग्रंथसाहेब' या ग्रंथात त्यांची एकसष्ट कवने समाविष्ट असून 'भक्त नामदेवजी की मुखबानी' या नावाने ती प्रसिद्ध आहे. संत नामदेवांची अभंगगाथा पुस्तकरूपाने १८९२ मध्ये प्रथम लोकांसमोर आली.

प्रस्तुत अभंगामध्ये संतांना वृक्षाची उपमा देऊन त्यांची महती सांगितली आहे.

**जैसा वृक्ष नेणे मान अपमान ।**
**तैसे ते सज्जन वर्तताती ।।१।।**

**येऊनियां पूजा प्राणि जे करिती ।**
**त्याचें सुख चित्तीं तया नाही ।।२।।**

**अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती।**
**तया न म्हणती छेदूं नका ।।३।।**

**निंदास्तुति सम मानिती जे संत ।**
**पूर्ण धैर्यवंत साधु ऐसे ।।४।।**

**नामा म्हणे त्यांची जरी होय भेटी ।**
**तरी जीव शिवा गांठी पडूनि जाय ।।५।।**

[सकलसंतगाथा खंड पहिला : संत नामदेव महाराजांची अभंगगाथा
अभंग क्र.१४७७ ]
संपादक-प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

## स्वाध्याय

**प्र. १. वृक्ष आणि संत यांच्यातील साम्य लिहून तक्ता पूर्ण करा.**

| वृक्ष | संत |
|---|---|
| | |

**प्र. २. खालील तक्ता पूर्ण करा.**

| वृक्ष | घटना | परिणाम |
|---|---|---|
|  | वंदन केले. | |
| | घाव घातले. | |

**प्र. ३. खालील विधानांपैकी सत्य विधान ओळखून लिहा.**

(अ) संतांचे वर्तन वृक्षाप्रमाणे असते.
(आ) संतांना सन्मानाची अपेक्षा असते.
(इ) संत निंदास्तुती समान मानत नाहीत.
(ई) संत सुख आणि दुःख समान मानत नाहीत.

**प्र. ४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

(१) वृक्ष (२) सुख (३) सम

**प्र. ५. काव्यसौंदर्य.**

(अ) 'अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती । तया न म्हणती छेदूं नका ।।' या काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ सांगा.
(आ) 'निंदास्तुति सम मानिती जे संत । पूर्ण धैर्यवंत साधु ऐसे ।।' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

**प्र. ६. अभिव्यक्ती.**

(अ) प्रस्तुत अभंगातून संतांना दिलेल्या वृक्षाच्या उपमेसंदर्भातील तुमचे मत स्पष्ट करा.
(आ) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एखाद्या अभंगाविषयीची माहिती लिहा.

**उपक्रम :** 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे....' हा अभंग वर्गात वाचून त्यावर चर्चा करा.

### भाषा सौंदर्य

खाली दिलेल्या कंसातील शब्दांना (क्रियापदांना) 'ईव' प्रत्यय जोडून विशेषणे तयार करा व त्यांच्यासाठी समर्पक विशेष्य शोधून लिहा.

उदा., आखणे - आखीव - आखीव कागद.

(रेखणे, कोरणे, ऐकणे, घोटणे, राखणे) यांसारख्या इतर शब्दांचा शोध घ्या.

## भाषाभ्यास

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो, तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचनाचा आनंद मिळवून देण्यात या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यातील एक घटक म्हणजे अलंकार.

अलंकाराचे शब्दालंकार आणि अर्थालंकार हे दोन प्रकार आपल्याला माहीत आहेत. अर्थालंकारांमध्ये ज्या वस्तूला उपमा दिलेली असते तिला उपमेय म्हणतात आणि ज्या वस्तूची उपमा दिलेली असते तिला उपमान म्हणतात. आता उपमेय आणि उपमानातील साधर्म्यावर आधारित काही अलंकारांचा आपण परिचय करून घेऊया.

### (१) रूपक अलंकार :

● **खालील उदाहरण वाचा व समजून घ्या.**

उदा., नयनकमल हे उघडित हलके जागी हो जानकी ।

(१) वरील उदाहरणातील उपमेय- [ ]

(२) वरील उदाहरणातील उपमान- [ ]

● **रूपक अलंकाराची वैशिष्ट्ये-** (१) उपमेय व उपमान यांच्यात साम्य.
(२) उपमेय हे उपमानच आहे असे मानणे.
(३) अनेकदा केवळ, प्रत्यक्ष, साक्षात, मूर्तिमंत इ. साधर्म्य दर्शक शब्दांचा वापर.

उपमेय व उपमान (कमल व नयन) यांच्यातील साम्यामुळे दोन्ही गोष्टी एकच वाटतात म्हणून इथे 'रूपक' अलंकार होतो. यात नयन हे कमळासारखे आहेत (उपमा) किंवा नयन म्हणजे जणू काही कमलच आहे (उत्प्रेक्षा) असे न म्हणता नयन हेच कमल असे दर्शवले आहे, म्हणून येथे रूपक अलंकार झाला आहे.

● **जेव्हा वाक्यांत उपमेय, उपमान यांच्यातील साम्यामुळे दोन्ही गोष्टी अभिन्न दर्शवल्या जातात तेव्हा 'रूपक' अलंकार होतो.**

● खालील ओळी वाचा.

ऊठ पुरुषोत्तमा । वाट पाहे रमा ।
दावि मुखचंद्रमा । सकळिकांसी ।।

उपमेय [ ]

उपमान [ ]

# २. संतवाणी-(आ) धरिला पंढरीचा चोर

**संत जनाबाई :** वारकरी संप्रदायातील संत कवयित्री. संत नामदेवांच्या शिष्या. त्यांना संत नामदेवांच्या सान्निध्यात विठ्ठलभक्तीचा ध्यास लागला. संत जनाबाईंनी विपुल काव्यरचना केली आहे. विशुद्ध वात्सल्य, आत्मसमर्पणाची भावना त्यांच्या अभंगवाणीत ओतप्रोत भरलेली आहे.

प्रस्तुत अभंगात संत जनाबाईंनी भक्तीच्या माध्यमातून विठ्ठलाला कसे प्राप्त केले, याबाबतचे वर्णन केले आहे.

**धरिला पंढरीचा चोर ।**
**गळां बांधोनियां दोर ।।१।।**

**हृदय बंदिखाना केला ।**
**आंत विठ्ठल कोंडिला ।।२।।**

**शब्दें केली जवाजुडी ।**
**विठ्ठल पायीं घातली बेडी ।।३।।**

**सोहं शब्दाचा मारा केला ।**
**विठ्ठल काकुलती आला ।।४।।**

**जनी म्हणे बा विठ्ठला ।**
**जीवें न सोडीं मी तुला ।।५।।**

[सकलसंतगाथा खंड पहिला : संत जनाबाईंचे अभंग
अभंग क्र.१८०]
संपादक-प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

## स्वाध्याय

**प्र. १. खाली दिलेल्या शब्दांसाठी अभंगात आलेल्या उपमा लिहा.**

(अ) विठ्ठल → 

(आ) हृदय → 

**प्र. २. जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) विठ्ठलाला धरले | (अ) शब्दरचनेच्या जुळणीने |
| (२) विठ्ठल काकुलती आला | (आ) भक्तीच्या दोराने |
| (३) विठ्ठलाच्या पायी घातली बेडी | (इ) 'तू म्हणजे मीच' या शब्दाने |

**प्र. ३. काव्यसौंदर्य.**

(अ) 'सोहं शब्दाचा मारा केला । विठ्ठल काकुलती आला ।।' या ओळीतील विचार स्पष्ट करा.

(आ) 'जनी म्हणे बा विठ्ठला । जीवें न सोडीं मी तुला ।।' या ओळीतून व्यक्त झालेला संत जनाबाईंचा भाव स्पष्ट करा.

(इ) प्रस्तुत अभंगातून संत जनाबाईंच्या मनातील विठ्ठलाविषयीच्या कोणत्या भावभावना दिसून येतात, ते सांगा.

**प्र. ४. अभिव्यक्ती.**

(अ) मानवी जीवनातील निष्ठा, भक्ती आणि प्रयत्न यांचे असलेले महत्त्व तुमच्या शब्दांत सांगा.

**उपक्रम :** आंतरजालाच्या साहाय्याने महाराष्ट्रातील संत कवयित्रींची माहिती मिळवा.

# ३. कीर्ती कठीयाचा दृष्टान्त

**म्हाइंभट (तेरावे शतक) :** मराठीतील पहिले चरित्रकार. महानुभाव पंथाचे प्रवर्तक. महात्मा चक्रधरांचे निष्ठावान अनुयायी. चक्रधरांच्या उत्तरापंथ प्रयाणानंतर नागदेवाचार्यांच्या सहकार्याने अनुयायांकडून चक्रधरांच्या आठवणींचे परिश्रमपूर्वक संकलन करून 'लीळाचरित्र' हा मराठीतील पहिला चरित्रग्रंथ लिहिला. नंतर 'गोविंदप्रभूचरित्र'ही लिहिले. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान, तत्कालीन सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती, भाषा व समाजजीवन यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने 'लीळाचरित्र' हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे.

कोणताही जीव विकारापासून वेगळा राहत नाही, हे स्पष्ट करण्यासाठी प्रस्तुत लीळेत चक्रधर स्वामींनी 'कीर्ती कठीयाचा दृष्टान्त' सांगितलेला आहे. कोणत्याही कार्याचा आणि व्रतस्थपणाचा अहंकार बाळगणे हा सुद्धा विकारच आहे, हे प्रस्तुत लीळेतून पटवून दिले आहे.

डोमग्रामी गोसावीयांचा ठायी उदयाचे मातीकाम होत होते: ते सी बाजत होते: तेणे भक्तीजनासी व्यापार होववे ना: आन भट व्यापार करु लागले: नाथोबाए म्हणीतलें: ''नागदेया: तू कैसा काही हींवसी ना?'' तवं भटी म्हणीतलें: ''आम्ही वैरागी: काइसीया हीवु:'' यावरी सर्वज्ञें म्हणीतलें: ''वानरेया: पोरा **जीवासी वैराग्य मिरवु आवडे: हाही एकू विकारुचि कीं गा:**'' यावरि भटी म्हणीतलें: ''जी जी: निर्वीकार तो कवण:'' सर्वज्ञें म्हणीतलें: ''वानरेया: पोर **जीव वीकारावेगळा केव्हेळाही जालाचि नाही:** मा तु काइ वेगळा अससि:'' ''हो कां जी:'' यावरि गोसावी कीर्ती कठीयाचा दृष्टान्त निरोपीला: **''कव्हणी एकू कठीया असे: तो भोगस्थानाची सुश्रुषा करी: झाडी: सडा संमार्जन करी: ते देखौनि गावीचे म्हणति: 'कठीये हो नीके करीत असा: बरवे करीत असा:' ते आइकौनि दीसवडीचा दीसवडी हात हात चढवी: तयासि देवता आपुले फळ नेदी: तयासि कीर्तीचेचि फळ झाले:''**

[लीळाचरित्र उत्तरार्ध : एकांक लीळा क्र. १२०]

संपादक-प्रा. पुरुषोत्तम नागपुरे.

## स्वाध्याय

**प्र. १. कोणांस उद्देशून म्हटले आहे ते लिहा.**

(१) वानरेया – ______

(२) सर्वज्ञ – ______

(३) गोसावी – ______

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

______ ← **कठीयाची जाणवलेली स्वभाव वैशिष्ट्ये** → ______

**प्र. ३. प्रस्तुत दृष्टान्तातील उपदेश तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ४. पुढील शब्दांना प्रमाणभाषेतील शब्द सांगा.**

कठीया | सी | काइसीया | कव्हणी

**प्र. ५. 'आपल्यातील गुण हाच अवगुण होऊ शकतो', हा विचार प्रस्तुत पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**प्र. ६. पाठातील दृष्टान्त वेगळ्या उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.**

## भाषाभ्यास

### (२) व्यतिरेक अलंकार :

खालील उदाहरण वाचा व समजून घ्या.

उदा., 'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा'

वरील उदाहरणातील उपमेय–______ उपमान–______

- **व्यतिरेक अलंकाराचे वैशिष्ट्य–** उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ असते.

  वरील उदाहरणात परमेश्वराचे नाव गोडीच्या बाबतीत अमृतापेक्षाही श्रेष्ठ आहे, असे मानले आहे.

- **जेव्हा कोणत्याही काव्यात वा वाक्यात उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे, असे मानले जाते तेव्हा तिथे 'व्यतिरेक' अलंकार होतो.**

- **खालील उदाहरण अभ्यासा व तक्ता पूर्ण करा.**

  तू माउलीहून मयाळ । चंद्राहूनि शीतल ।
  पाणियाहूनि पातळ । कल्लोळ प्रेमाचा ।।

| उपमेय | उपमान | समान गुण |
|---|---|---|
| तू (परमेश्वर/गुरू) | | |
| | चंद्र | |
| | | पातळपणा |

# ४. नात्यांची घट्ट वीण

**मीरा शिंदे (१९४८) :** विविध नियतकालिकांतून व मासिकांतून कथा कवितांचे लेखन. त्यांचा 'आभाळमोकळी' हा कवितासंग्रह १९९६ साली प्रकाशित झालेला आहे. 'क्षण मोहरते' एक अभिनव काव्यमैफिल'चे आजपर्यंत पन्नास कार्यक्रम त्यांनी सादर केले आहेत.

प्रत्येक माणूस हा अनेक नात्यांनी परस्परांशी गुंफलेला असतो. जन्मापासून सुरू झालेला हा नात्यांचा प्रवास अखेरपर्यंत चालूच राहतो. एवढी नात्याची वीण घट्ट असते. प्रस्तुत पाठात लेखिकेने नात्यांचे सहज व परिणामकारक वर्णन केले आहे. प्रस्तुत पाठ 'आवाम' २०१० या मासिकातून घेतला आहे.

जन्माला आलेला प्रत्येक माणूस जन्माबरोबरच किंवा नाळेबरोबरच 'नातं' नावाची एक भलीमोठी 'माळ' लेवून येतो. ज्या माळेत 'नाते' नामक मणी एकामागोमाग एक ओवलेले असतात. हे मोती मग एक सुंदर वीण गुंफत जातात. आपल्या सर्वांभोवती नकळत विणली जाणारी आणि भेटणाऱ्या प्रत्येक नात्याने अधिकाधिक मजबूत होत जाणारी ही नात्यांची वीण प्रत्येकाभोवती गुंफली जाते. नात्याला एक-एक नाव देत ती कधी जवळीक साधते, अगदी स्वकीय होऊन जाते, तर कधी कधी 'परक्या'प्रमाणे वागते. नाती जन्माबरोबर आलेली असोत वा सहवासातून किंवा वातावरणातून निर्माण झालेली असू देत, त्यातही स्वकीय, परकीय असा भेदाभेद दिसतोच!



खरं तर माणूस जन्माला येतो तोच मुळी कुणाचा तरी मुलगा, कुणाची तरी मुलगी, कुणाचा तरी भाऊ, कुणाची तरी बहीण, कुणाचा तरी नातू म्हणूनच! नात्यांच्या विणीशी त्याची पहिली ओळख होते ती इथे आणि नंतरच्या प्रवासात भेटणारी अनेक नवी नाती त्या विणीला समृद्ध आणि सुंदर करून जातात.

रेशमाच्या धाग्यासारखी ही वीण एकाच वेळी नाजूकही असते आणि भक्कम, मुलायम आणि धारदारही. अशी ही बहुरंगी वीण अलगदपणे नात्यांचे एक-एक पदर आपल्यासमोर उलगडत जाते. नात्यांच्या आठवणीने कधी डोळ्यांत पाणी जमतं, तर कधी त्या आठवणीसह हृदयात नाती जपली जातात ती कायमचीच!

प्रत्येक आई मुलाच्या जन्मानंतरही त्याला घडवतच राहते. असे घडवताना कधी कुंचल्याच्या हळुवारपणे रंग रेखत तर कधी छिन्नीचे कठोरपणे घाव घालत तिचे काम चालूच असते. आईच्या घडवण्याने आपण जरी घडत गेलो तरी ती आपल्यासाठी कायमच एक गूढ बनून राहते. कधी ती आपल्यासाठी ऊबदार शाल असते, तर कधी कणखर ढाल असते, बालपणीच्या अंगाईला लागलेली सुंदर चाल असते.

आईनं जन्म दिल्यानंतर या जगाशी आपली ओळख होते. या 'जग' नावाच्या भवसागरात स्वत:चे माणूसपण जपण्याची तारेवरची कसरत प्रत्येकाला करावीच लागते. मुलाची जगण्याची वाट थोडी कमी खडतर व्हावी म्हणून 'बाप' नावाचं वल्हं हातात धरून भवसागर पार करण्याचा प्रयत्नही केला जातो. त्यासाठी मात्र 'संवाद' नामक सेतू बांधला जावा लागतो, मग या संवादातून बापाचं बाप असणं ठळकपणे जाणवत राहतं.

मायेचे आणि वात्सल्याचे पडदे भेदून हातात आलेलं मूल मोठं होऊन बघता बघता पंख पसरून कधी उडायला सुरुवात करतं कळतही नाही; पण त्याची झेप जेव्हा सातासमुद्रापलीकडे जायला लागते, तेव्हा मात्र पुन्हा एकदा तुटणाऱ्या नात्याची वेदना असह्य होते. आनंदाचा मुखवटा धारण केलेल्या आई-वडिलांचं दु:ख मुलांना कळणार कसं अन् कधी? ही आई-वडिलांच्या जिवाची उलघाल कधीही न कळणारी असते मुलांसाठी! या विश्वात्मक जगात आपण मात्र पोरके होत जातो हे दु:ख उरी बाळगून, आशीर्वादासाठी उंचावलेला हात तसाच ठेवून मुलांच्या पाठीशी उभं राहण्यापलीकडे आई-वडील काय करू शकतात?

आईच्या डोळ्यांतून झरणाऱ्या अश्रूंची कथा साऱ्यांनाच माहिती आहे; पण 'बाप' नावाच्या पुरुषाच्या चेहऱ्यावरचा जबाबदारीचा मुखवटा दूर केलात, तर त्यामागे चेहऱ्यावरून ओघळणारे देखील अश्रूच असतात. ते फक्त जबाबदारीच्या मुखवट्यामागे दडवले जातात किंवा त्याच्याच गळ्यातल्या उपरण्याने पुसले जातात, एवढे मात्र खरे! नवीन नाती जुळणं ही दोन्ही बाजूंकडून घडणारी प्रक्रिया असते. तिची सुरुवात दोन्हींकडून व्हावी लागते. असं घडलं तरच नाती जुळून येतात, नाही तर अनेक दुवे नात्यातून निखळून जातात.

'मैत्री' हे एक असंच नातं आहे. अतिशय तरल असं हे नातं जपताना दोघांनाही एकाच वेळी एकच स्वप्न पडावं लागतं, तेव्हाच ते नातं 'अनादि अनंताचं, नव्या अभिनव सृजनाचं' होतं हे मात्र निर्विवाद सत्य! मैत्रीसारखी भावना खूप सूक्ष्म व तरल असते म्हणूनच म्हटलं जातं, 'मित्र जरी समोर दिसला तरी मैत्री कधी दिसत नसते'. जगण्यासाठी अशी अनेक नाती आवश्यक असतात, त्यासाठी गरज भासते ती एका हितचिंतकाची, मार्गदर्शकाची, गुरूची! भारतीय परंपरेत गुरूकडून शिक्षण घेतल्यानंतर शिष्याला गुरुदक्षिणा द्यायची असते व गुरूने त्याला कानमंत्र द्यायचा असतो. जो पुढील कसोटीच्या काळात परिस्थितीवर मात कशी करायची ते शिकवून जातो.

शेजारधर्म हे पण एक असंच नातं असतं. शेजारधर्माचा एक धागा जुळला असेल तर स्नेहाच्या मर्यादा ओलांडतो आणि तुटला असेल तर वैराच्या मर्यादा ओलांडतो. कौटुंबिक वातावरणात आपल्या अवतीभवती रेंगाळणारी काही नाती अशी असतात, की ती विसरू म्हटलं तरी विसरली जात नाहीत. असंच एक नातं 'आजी'चं असतं. झोपताना रोज नवी गोष्ट सांगणारी आजी आता फक्त आठवणीत जपावी लागते. तिला शोधण्यासाठी पाय आपोआप 'वृद्धाश्रमा'कडे वळतात. असे प्रसंग मग मनं दु:खी करून जातात.

जन्मापासून सुरू झालेला हा नात्यांचा प्रवास! तारुण्याचे क्षण संपून वार्धक्याकडे वाटचाल करू लागतो, तेव्हा मागे वळून पाहावेच लागते. किंबहुना ते अपरिहार्यच आहे. मागे वळून पाहिल्यानंतर आजपर्यंतचा प्रवास एका वेगळ्या स्वरूपात समोर येतो. पूर्वीचे मुखवटे गळून पडतात, अहंगंड, मान-अपमान, प्रतिष्ठा या साऱ्यांची कात टाकून एक निखळ, निकोप मन समोर येतं आणि आपण साऱ्या गोष्टी मान्य करतो, कारण उंबरठा ओलांडून पलीकडच्या जगात केव्हा जावं लागेल हे सांगता येत नाही. पिकलं पान गळलं तरी नवी पालवी फुटणार आहे हा निसर्गाचा नियम, यातून कोण सुटणार आहे? हे शाश्वत सत्य मान्य करावंच लागतं आणि मग जन्मापासून सुरू झालेला नात्यांचा हा प्रवास निर्णायक उंबरठ्यावर येऊन थांबतो आणि आपलं एक अभिन्न असं नातं तयार होतं, साऱ्या नात्यांच्याही पलीकडे जाणारं! ज्याला शब्दांचं क्षितिजच काय; पण शब्दांचं आभाळही अपुरं पडेल. आपल्या हातून काही निसटत चालल्याची ही हुरहूर असली तरी त्याच शेवटामध्ये एक सुरुवातही असते, आपल्याला पुढे नेणारी! नात्यांची वीण ही अशीच असते, घट्ट पकडून ठेवणारी!

## स्वाध्याय

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ) नात्याच्या विणीसाठी योजलेली विशेषणे

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

(आ) नात्याच्या विणेची पाठातील वैशिष्ट्ये

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. २. 'नातं' या अमूर्त संकल्पनेतून व्यक्त होणाऱ्या विविध भावना लिहा.**

**प्र. ३. खालील वाक्यांसाठी समान आशयाच्या ओळी पाठातून शोधून लिहा.**

(अ) 'पारितोषिक आणि शिक्षा' या तंत्राचा उपयोग आई मुलाला घडवताना करते.

(आ) जीवनाच्या प्रवासात वडिलांचे मार्गदर्शन घेतले जाते.

**प्र. ४. वर्गीकरण करा.**

आई, गुरू, भाऊ, वडील, मित्र, बहीण, आजी, मैत्रीण, हितचिंतक, शेजारी

| जन्माने प्राप्त नाती | सान्निध्याने प्राप्त नाती |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |
| (४) | (४) |
| (५) | (५) |

**प्र. ५. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे फरक स्पष्ट करा.**

| तारुण्यातील नात्याचा प्रवास | वार्धक्यातील नात्याचा प्रवास |
|---|---|
| | |

FI3E73

**प्र. ६. स्वमत.**

(अ) माणसाच्या जडणघडणीत असलेलं नात्याचं महत्त्व सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) तुमच्या सर्वांत जवळच्या मित्राचे/मैत्रिणीचे नाव काय? मैत्रीचं नातं तुम्ही कसे निभावता ते सविस्तर लिहा.

### भाषा सौंदर्य

पाठातील वाक्यांत परस्पर विरोधी शब्द वापरून केलेली रचना हे लेखिकेच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. ही रचना म्हणजे समृद्ध भाषेचे उत्तम उदाहरण आहे.

उदा., (१) कधी आई आपल्यासाठी ऊबदार शाल असते, तर कधी कणखर ढाल असते.

(२) शेजारधर्माचा एक धागा जुळला तर स्नेहाच्या मर्यादा ओलांडतो आणि धागा तुटला असेल तर वैराच्या मर्यादा ओलांडतो.

(३) आपल्या हातून काही निसटत चालल्याची ही हुरहूर असली तरी त्याच शेवटामध्ये एक सुरुवातही असते आपल्याला पुढे नेणारी.

अशा उदाहरणांतून तुम्ही तुमचे लेखन कौशल्य वाढवू शकता, भाषा समृद्ध करू शकता. त्यांतून तुमचे भाषिक कौशल्य विकसित होणार आहे. याप्रमाणे इतर वाक्यांचा शोध घ्या. या प्रकारची वाक्ये स्वत: तयार करा.

# ५. एक होती समई


**उत्तम कांबळे** (१९५६) : प्रसिद्ध लेखक. 'श्राद्ध', 'अस्वस्थ नायक', 'शेवटून आला माणूस' इत्यादी कादंबऱ्या; 'रंग माणसांचे', 'कथा माणसांच्या', 'कावळे आणि माणसं', 'न दिसणारी लढाई', 'परत्या' इत्यादी कथासंग्रह; 'थोडसं वेगळं', 'फिरस्ती', 'जगण्याच्या जळत्या वाटा', 'पावलानेच बनते वाट' इत्यादी ललितलेखन; 'पाचव्या बोटावर सत्य', 'किनाऱ्यावरचा कालपुरुष', 'खूप दूर पोहोचलो आपण' इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध. त्यांचे 'आई समजून घेताना' हे पुस्तक लोकप्रिय आहे. साहित्यनिर्मितीसाठी तसेच पत्रकारितेसाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित.

आदिवासी भागात पूर्वप्राथमिक शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचवण्यासाठी ज्यांनी आपले अवघे आयुष्य वेचले अशा समाजसेविका व शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ यांच्या कार्याचा परिचय प्रस्तुत पाठातून लेखकांनी करून दिला आहे. प्रस्तुत पाठ 'डोंगरासाठी काही फुले' या पुस्तकातून घेतला आहे.

काही माणसं वादळं झेलतात आणि पचवतात, पुढं विशाल सागराचं रूप धारण करतात, काही माणसं वादळामुळे कोलमडून पडतात, तर काही माणसं वादळ पचवण्याचे धडे दुसऱ्यांकडून घेतात. आयुष्यभर आदिवासींसाठी डहाणूजवळील कोसबाडच्या टेकडीवर ज्ञानयज्ञ तेवत ठेवणाऱ्या थोर समाजसेविका आणि शिक्षणतज्ज्ञ अनुताई वाघ यांचा समावेश यांपैकी पहिल्या श्रेणीत करावा लागेल. त्यांच्या निधनानं कोसबाडची टेकडी हळहळली आणि परिसरातील सर्व आदिवासींना हुंदके फुटले. अनुताईंच्या निधनानं एका व्रतस्थ जीवनाची अखेर झाली. थोर शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक यांच्या सहवासात वाढलेल्या अनुताईंचं एकूण जीवनच त्याग, कष्ट आणि निःस्वार्थी सेवा यांचा सुरेख मिलाफ होता. वयाच्या केवळ तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. विवाह असतो तरी काय हे समजण्यापूर्वीच, म्हणजे केवळ सहा महिन्यांतच त्यांच्या इवल्याशा कपाळावरील कुंकू नियतीनं कायमचंच पुसून टाकलं. भातुकलीचा खेळ मोडला; पण छोट्या अनूनं आभाळाएवढं दुःख पचवलं. कोलमडून टाकणारं वादळ पचवलं. ताराबाईंनी त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसले. दुःखाचा डोंगर टाचेखाली चिरडत अनुताई मोठ्या जिद्दीनं उभ्या राहिल्या, त्या कधीही पराभूत न होण्यासाठी. त्यांनी स्वतः शिक्षण घेणं सुरू केलं. बाहेरून अभ्यास करून त्यांनी पदवी मिळवली. समाजव्यवस्थेत पिचलेल्या असंख्य आदिवासींच्या घरोघरी ज्ञानगंगा नेण्याचं व्रत स्वीकारलं. ग्राम बाल शिक्षा केंद्रानं सुरू केलेल्या पूर्वप्राथमिक शाळेत कार्यकर्ती म्हणून कामास प्रारंभ केला आणि ताराबाईंच्या निधनानंतर त्या संस्थेच्या संचालक झाल्या. ताराबाईंच्या रोपट्याचं त्यांनी पुढे वटवृक्षात रूपांतर केलं. वेगवेगळ्या कल्पना, शिक्षणासाठी वेगवेगळी क्षेत्रं आणि सातत्यानं नवनवे प्रयोग ही त्यांच्या कामाची त्रिसूत्री होती. भाकरीच्या शोधात आयुष्य गमावणाऱ्या आणि दारिद्र्याचा शाप कपाळावर घेऊन फिरणाऱ्या असंख्य आदिवासी बालकांना अनुताईंनी आपल्या कर्तृत्वाच्या पंखाखाली आश्रय दिला. मायेची ऊब दिली आणि असंख्य मनांमध्ये ज्ञानाची ज्योत पेटवली. शिक्षक, मार्गदर्शक, कार्यकर्त्या, विचारवंत, लेखिका अशी विविध रूपं व्यक्त करत त्यांनी आदिवासींमध्ये चांगलं स्थान मिळवलं.

रानावनात भटकणाऱ्या आदिवासींना व्यावहारिक शिक्षण देणं तसं खूप सोपं; पण जाणीवपूर्वक आणि आयुष्यात उपयुक्त ठरणारं औपचारिक शिक्षण देणं खूप अवघड. त्यासाठी आवश्यक असते भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी आणि धडपड, या दोन्हीही गोष्टी अनुताईंकडे होत्या. त्यामुळे त्यांना वेगवेगळे प्रयोग करताना कसलीच अडचण भासली नाही, की पाश्चिमात्यांचा अभ्यासक्रम भाषांतरित करावा लागला नाही. प्राथमिक शिक्षण म्हणजे एकूणच शिक्षणाचा आणि आयुष्याचा भक्कम पाया असावा लागतो, याचं भान त्या कधीच

विसरल्या नाहीत, की शिक्षणाच्या दिशाहीन प्रसाराचा ध्यास त्यांनी धरला नाही. आपल्या मंद प्रकाशात मंदिर उजळून टाकणाऱ्या समईप्रमाणं अनुताईंनी काम केलं. प्रसिद्धीचा झगमगाट मिळवण्याचा हव्यास त्यांनी धरला नाही, कारण त्या आणि त्यांचं कार्यच स्वयंप्रकाशित होतं. अनेकांनी या लोभस उजेडात आपल्या आयुष्यातील अंधार संपवण्याचा प्रयत्न केला. प्रसिद्धी आणि मानसन्मान त्यांच्यापर्यंत चालत आले आणि त्यांनी स्वतःचंही भाग्य उजळून घेतलं. त्यांनी केलेल्या अजोड कामाला कोणाच्या शिफारसपत्राची गरज नव्हती किंवा एखाद्या पुरस्काराची आवश्यकता नव्हती. पुरस्काराला छेद देऊन पुढं जाणारं त्यांचं कार्य होतं, म्हणूनच आदर्श शिक्षक, पद्मश्री, दलित मित्र यांसारखे मानसन्मान नेहमीच अनुताईंच्या शोधात भटकत राहिले.



शिक्षणाच्या अनुषंगानं अन्य क्षेत्रांतही अनुताईंनी फार मोठं काम केलं आहे. शिक्षणाबरोबरच त्यांनी बालकल्याण, मूक-बधिरांसाठी शिक्षण, महिला विकास कार्यक्रम, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता, कुटुंबकल्याण, आरोग्य आदी विषयांवरही खूप कष्ट घेतले. एक चांगला नागरिक निर्माण होण्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या सर्व त्यांनी केल्या. एकाच वेळेला अनेक प्रयोग, असेही त्यांच्या कामाचं स्वरूप होतं. त्यामुळेच केवळ देशातील नव्हे, तर परदेशांतील संस्था आणि शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांना कोसबाडच्या टेकडीचं सातत्यानं आकर्षण राहिलं. शिक्षणक्षेत्रात आणि त्यासाठी आदिवासी क्षेत्र निवडून काम करणं हे अतिशय अवघड असतं. ज्यांच्यासाठी शिक्षणाचं व्रत चालवायचं त्यांचाही अशा कामाला प्राथमिक अवस्थेत विरोध होतो. रूढी, परंपरा, अज्ञान आणि अंधश्रद्धा ही त्यामागची कारणं असतात. शिवाय स्थितिशील समाजही या कार्यात वारंवार अडथळे आणत असतो. या सर्व गोष्टींवर मात करून ज्ञानाचा दिवा जपण्याचं आणि अनेकांच्या मनांतील विविध प्रकारचा अंधार दूर करण्याचं काम अनुताईंनी निरपेक्ष वृत्तीनं केलं. स्वतःच्या बळावर त्यांनी शिक्षणक्षेत्रात एक सुरेख स्वप्न पाहिलं. ते प्रत्यक्षात उतरवलं. कधी झाडाखाली, कधी गोठ्यात, कधी बोडक्या माळावर, तर कधी झोपडीत वर्ग चालवून त्यांनी मोठ्या जिद्दीनं ज्ञानप्रसार केला. ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा, असा प्रचार कधी त्यांनी केला नाही, तर स्वतःलाच दिवा बनवलं. त्यात आपल्या श्रमाचं तेल ओतलं, कर्तृत्वानं तो पेटवला आणि आयुष्यभर तो तेवतच ठेवला. पाच-सहा तपांच्या अविरत धडपडीनंतर कोसबाडच्या टेकडीवरील ही समई आता विझली आहे. त्यामुळे अवघी टेकडी हळहळली असेल, आदिवासींचे डोळे पाणावले असतील, तर या सर्वांनी अनुताईंच्या पाऊलखुणा जपून ठेवणं हीच त्यांना आदरांजली ठरेल.

## स्वाध्याय

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) कोसबाडच्या टेकडीवरील समई म्हणून ओळख –

(आ) रोपट्याचा वटवृक्ष झालेली संस्था –

(इ) आयुष्याचा पाया भक्कम करणारे –

(ई) भाकरीच्या शोधात आयुष्य गमावणारे –

**प्र. २. खालील घटनांचे परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (अ) ताराबाईंनी अनुताईंचे अश्रू पुसले. | |
| (आ) ताराबाईंचे निधन. | |
| (इ) अनुताईंचे निधन. | |

**प्र. ३. कार्यक्षेत्र लिहा.**

शिक्षणक्षेत्राव्यतिरिक्त असलेली अनुताईंची कार्यक्षेत्रे

**प्र. ४. का ते लिहा.**

(अ) शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांना कोसबाडच्या टेकडीचं सातत्यानं आकर्षण राहिलं.

(आ) अनुताईंच्या कामाला प्राथमिक अवस्थेत विरोध झाला.

**प्र. ५. खालील शब्दांमधील कल्पना स्पष्ट करा.**

भातुकलीचा खेळ, ज्ञानयज्ञ, ज्ञानगंगा, पाऊलखुणा

**प्र. ६. खालील शब्दसमूहांसाठी एक शब्द लिहा.**

(अ) व्रताने स्वत:ला बांधणाऱ्या–

(आ) नेमाने स्वत:ला बांधणारा–

(इ) गावातील रहिवासी–

(ई) तिऱ्हाइताच्या भूमिकेतून बघणारा–

**प्र. ७. खाली दिलेल्या शब्दांचा उपसर्ग बदलून विरुद्धार्थी शब्द लिहा.**

उदा., (१) सापेक्ष × निरपेक्ष (२) अनावृष्टी × अतिवृष्टी

(१) अनाथ × (४) पुरोगामी ×

(२) दुश्चिन्ह × (५) स्वदेशी ×

(३) सुपीक × (६) विजातीय ×

**प्र. ८. स्वमत.**

(१) अनुताई वाघ यांना दिलेल्या समईच्या उपमेची सार्थकता तुमच्या शब्दांत लिहा.

(२) 'समई हे सातत्याचे, संयमी वृत्तीचे आणि सामर्थ्याचे प्रतीक आहे'. या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

**उपक्रम :** आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी कार्यरत असणाऱ्या कोणत्याही एका संस्थेची माहिती मिळवा.

## भाषाभ्यास

उपमेय व उपमान यांच्यातील साधर्म्यावर आधारित काही अलंकारांचा आपण अभ्यास केला. आता इतर काही अलंकार पाहूया.

### (३) दृष्टान्त अलंकार :

- **खालील उदाहरण वाचा व समजून घ्या.**

उदा., चंदनाचे हात । पायही चंदन
तुका म्हणे तैसा । सज्जनापासून
पाहता अवगुण । मिळेचिना (संत तुकाराम)

(१) संत तुकाराम कोणत्या दोन गोष्टींची तुलना करतात?

______ आणि ______

(२) (अ) चंदनाचा विशेष गुण– ______

(आ) संतांचा विशेष गुण– ______

चंदन सर्वांगाने सुगंधित–त्रिकालाबाधित सत्य

सज्जन व्यक्ती अंतर्बाह्य सज्जन असते हे पटवून देण्यासाठी वरील उदाहरण दिले आहे.

- **दृष्टान्त अलंकाराची वैशिष्ट्ये–** (१) एखादी गोष्ट पटवून देणे.
  (२) ती पटवून देण्यासाठी समर्पक उदाहरणाचा वापर करणे.

- **एखादी गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच अर्थाचे एखादे समर्पक उदाहरण दिले जाते, तेव्हा 'दृष्टान्त' अलंकार होतो.**

- **खालील ओळी वाचा व चौकटी पूर्ण करा.**

लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा ।
ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ।।

(१) संत तुकाराम परमेश्वराजवळ हे मागणे मागतात. ______

(२) रत्नासारख्या थोर असलेल्या ऐरावताला सहन करावा लागतो. ______

(३) मुंगीला ही गोष्ट प्राप्त होते. ______

(४) संत तुकाराम ही गोष्ट पटवून देतात. ______

(५) मोठेपणातील यातना या उदाहरणाने पटवून देतात. ______

# हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन)

**मधुकर धर्मापुरीकर** (१९५४) : कथालेखक, ललित लेखक आणि व्यंगचित्रांचे संग्राहक - अभ्यासक.

१९७६ पासून त्यांनी व्यंगचित्रांचा संग्रह करण्यास सुरुवात केली. कथालेखनासोबतच व्यंगचित्रांच्या आस्वादाच्या निमित्ताने विपुल लेखन. किशोरवयीन मुलांसाठी लिहिलेल्या 'अन्कॉमन मॅन आर. के. लक्ष्मण.' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. आर. के. नारायण यांच्या 'मालगुडी डेज' आणि 'स्वामी ॲण्ड फ्रेंडज' या पुस्तकांचे मराठी अनुवाद केलेले आहेत. 'अप्रूप', 'रूप', 'विश्वनाथ', 'चिनकूल' हे कथासंग्रह; 'रेषालेखक वसंत सरवटे', 'हसऱ्या रेषेतून हसवण्याच्या पलीकडले' ही पुस्तके प्रसिद्ध.

हास्यचित्र, व्यंगचित्र म्हणजे काय? ती कशी वाचायला पाहिजेत? हे प्रस्तुत पाठातून सांगितले आहे. हास्यचित्रे, व्यंगचित्रे आपल्याला हसवतात, विचार करायला भाग पाडतात. हास्यचित्रे व व्यंगचित्रे यांमधील भेदाभेद दर्शवत लेखकांनी या चित्रदुनियेची सफर प्रस्तुत पाठातून घडवून आणली आहे. प्रस्तुत लेख 'वयम् २०१६'च्या दिवाळी अंकातून घेतला आहे.

आपण दररोज कार्टून्स पाहतो, ती आपल्या इतक्या सवयीची झालेली आहेत, की कार्टून्सच्या ऐवजी त्याला कुणी व्यंगचित्र किंवा हास्यचित्र म्हटलं, की आपण थबकतो. शिवाय, आपण सहसा जी पाहत असतो, ती असतात 'स्ट्रीप कार्टून्स' (म्हणजे चित्रमालिका). 'चिंटू' हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे असे उदाहरण. अशा चित्राच्या पहिल्या भागात कुणीतरी कुणाला तरी सांगत असतं, बोलत असतं, मग त्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या भागांत त्या सांगण्या-बोलण्यातून उलगडणारी गंमत असते! कधी आपल्याला एकाच भागाचं कार्टून पाहायला मिळतं, ते पाहून खुदकन हसू येतं आपल्याला. असं चित्र हे हास्यचित्र असतं; पण हास्यचित्र म्हणजे काय, असं विचारलं तर आपल्याला काय सांगता येईल?

कुणी सांगेल, वेडंवाकडं चित्र काढलं, की ते झालं कार्टून! कुणी म्हणेल, त्यात एक जोक असतो आणि कुणी सांगेल, त्यात एक माणूस असतो, तो दुसऱ्याला बोलतो, ते वाचलं की आपल्याला हसू येतं, वगैरे... हे सगळं सांगणं-बोलणं बाजूला ठेवून, आपल्याला हास्यचित्राची व्याख्या करायची झाल्यास अशी करता येईल - 'सफाईदार रेषांनी काढलेलं गमतीदार चित्र, म्हणजे हास्यचित्र'. हास्यचित्राचे वैशिष्ट्य काय, तर ते पाहिलं, की आपल्याला हसू येतं! व्यंगचित्र म्हणजे, हास्यचित्राचा पुढला टप्पा. व्यंगचित्रसुद्धा आपल्याला हसवतं; पण केवळ हसवणं एवढाच त्याचा हेतू नसतो. व्यंगचित्र पाहिल्यावर आपल्याला हसूही येतं आणि ते आपल्याला त्याशिवाय काहीतरी सांगू पाहत असतं. आपण जर त्या चित्रापाशी थोडं थांबून राहिलो, तर त्यात काही गमतीदार विचार मांडलेला असतो, हे आपल्या लक्षात येतं.

मुलांची हास्यचित्रं काढणं ही सर्वांत अवघड गोष्ट आहे. मुलांची म्हणजे, केवळ मुलांसाठीच नाही, तर हास्यचित्रात जी मुलं असतात, ती मुलं काढणं फार अवघड असतं, का ? तुम्ही काढून पाहा, तेव्हा लक्षात येईल. कारण, लहान मुलाचं चित्र-आकारानं लहान काढलं, तर ते थोडंच लहान मुलाचं वाटणार! एखादा उंच माणूस काढला, तर तो त्या उंच माणसाचा मुलगा वाटणार का, छे! मग... दाढीमिश्या नसल्या, की होईल का चित्रातलं पोरगं-नाही बुवा! तसंही होणार नाही. त्याला शर्ट-चड्डी घातली, की होईल का ते पोरगं... चित्र काढायचा प्रयत्न केला, की आपल्या या अडचणी लक्षात येतात. मोठ्या माणसाकडे आणि मुलाकडे आपण बारकाईनं पाहिलेलंच नाही, हेही आपल्या स्पष्टपणे लक्षात येईल! आणि इथेच व्यंगचित्रकाराचं कौशल्य लक्षात येतं. मुलांसाठी विनोद करणं एक वेळ सोपं; पण व्यंगचित्रातलं मूल हे मुलासारखं दिसणं सर्वांत कठीण!

आपण इथे वेगवेगळ्या व्यंगचित्रकारांनी, आपापल्या व्यंगचित्रांत-हास्यचित्रांत लहान मुलं कशी काढली आणि त्यांच्या बोलण्यातून, वागण्यातून त्यांचं लहानपण कसं उमटलं आहे, ते पाहूया. हास्यचित्र



म्हटलं, की आधी आठवण येते, ती शि.द. फडणीस या ज्येष्ठ व्यंगचित्रकाराच्या चित्रांची. शाळेतल्या चौथी–पाचवीच्या गणिताच्या पुस्तकात फडणीसांची हास्यचित्रे होती, ती पाहताना गणिताचा 'बाऊ' कमी झाला होता मुलांचा!

त्यांचं हे हास्यचित्र पाहा. जाड रेषांनी खरं म्हणजे मोठी माणसं काढता येतात, असा आपला समज. मात्र या चित्रात फ्रॉक घातलेली ही मुलगी लहान बाळाला दूध पाजावे, तशी या लहानग्या रोपट्याला पाणी घालते आहे, तेही किती काळजीने–दुधाच्या बाटलीने!

श्याम जोशी हे मराठीतले मागच्या पिढीचे महत्त्वाचे हास्यचित्रकार. त्यांची रेषा ही फडणीसांच्या रेषेपेक्षा अगदी उलट–नाजूक आणि लवचीक अशी! त्यांच्या या हास्यचित्रांत पाहा.







अगदी रांगणारं मूल काढलं आहे, त्याची हालचाल जाणवते, नाही का! शिवाय देवाला 'फूल' देणारा हा मुलगा त्या रांगणाऱ्या बाळापेक्षा मोठा! हास्यचित्र आणि चित्रात हाच फरक असतो. चित्रात हुबेहूब काढायचा प्रयत्न असतो तर हास्यचित्रात विनोदी माणूस एखाद्याच्या वागण्या–बोलण्याची जशी हुबेहूब नक्कल करतो, तशी ती चित्राची गमतीदार हुबेहूब नक्कल असते.

डेव्हीड लँग्डन या अमेरिकन व्यंगचित्रकाराची ही चित्रं पाहा. पहिल्या चित्रात चतुर मुलगा पैशाचा गल्ला फोडतो आहे, हा त्याचा पराक्रम आपल्याला दिसतो आणि मग त्याच्या चेहऱ्यावरचे ते भाव आपल्याला जाणवतात आणि खरे वाटतात.





तर दुसरं चित्र भोकाड पसरणाऱ्या मुलाचं; त्याला व्यंगचित्र म्हणता येईल. का बरं?... चित्र पाहताना आपलं लक्ष आधी जातं, ते काळ्या रंगाकडे–मुलाच्या मोठ्याने रडण्याकडे. आपल्याला वाटून जातं, की लहान मुलं उगीचच रडत असतात, तसंच हा रडतो आहे, बाकी काही नाही; पण चित्राकडे लक्षपूर्वक पाहिल्यावर आपल्याला दिसते, ती सेफ्टी पिन... आणि विचार येतो, अरे! ही पिन याला टोचत असणार आणि म्हणून याने भोकाड पसरले असणार. तसेच असावे, कारण मुलांच्या रडण्याला काही 'कारण' असतं! इथे त्याचे हातपाय कसे काढले आहेत, पाहा.




लहान मुलं लहान कशी दिसतात चित्रात? त्याचं नेमकं काय रहस्य आहे हे पाहायचं असेल, तर ज्या व्यंगचित्रात -हास्यचित्रात मोठा माणूस आणि छोटा मुलगा असे दोन्ही आहेत, अशी चित्रं पाहावीत. हे आहे, जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांनी रेखाटलेलं व्यंगचित्र. खेड्यात मुलांचे केस कापणारे असायचे, मुलाला जमिनीवर बसवून त्याचे केस कापले जायचे. इथे पाहा, तो माणूस कसा बसला आहे, त्याचा आकार त्याच्या चेहऱ्यावरचे ते उत्साहाचे भाव आणि केस कापून घेणारा, कंटाळलेला, वैतागलेला मुलगा... तेच हात-पाय, तेच नाक-डोळे; पण फरक कुठे आहे ज्यामुळे हा मोठा माणूस वाटतो आणि हे मूल, लहान मूल वाटतं? आकाराने लहान-मोठेपण आहेच; पण त्याशिवाय अधिक काय आहे?

ही चिंटूची चित्रमालिका पाहा. इथेही हा फरक आपल्याला दिसतो. शिवाय, पहिल्या चित्रात त्या चिंटूचा प्रश्न त्याच्या बाबांप्रमाणे आपल्यालाही स्पष्ट कळत नाही, मात्र तिसऱ्या चित्रात त्याचा 'अर्थ' समजतो. त्या अर्थानं हे उत्तम असे व्यंगचित्र आहे, नाही का!




आता आणखी एक गंमत पाहू. हंगेरियन व्यंगचित्रकार रेबर याचे हे व्यंगचित्र. चित्र पाहताच आपल्याला वाटते, ही दोन वेगवेगळी चित्रं आहेत- एक लहान मुलगा आणि एक मोठा माणूस; पण भिंतीवर लावलेले तेच चित्र आणि दोघांच्या केसांची ठेवण पाहिल्यावर लक्षात येते, की हा लहानपणी मोठे व्हायोलिन वाजवतो आहे आणि आता मोठा झाल्यावर लहान व्हायोलिन वाजवतो आहे. लहान मुलांना 'मोठ्या' वस्तूंचं आकर्षण असतं आणि वाढत्या वयानुसार आपण जपलेला छंद अधिक खोल-सूक्ष्म असा होत जातो, बाह्य आकाराचं आकर्षण कमी होत असतं, असं या व्यंगचित्रकाराला सांगायचं आहे.



आता हे हास्यचित्र. चित्रकलेवर हुकूमत मिळवली, की हास्यचित्रात काय जादू करता येते, त्याचं उदाहरण. ब्रिटिश व्यंगचित्रकार नॉर्मन थेलवेल यांचं. मुलाची कॅप, त्याचा शर्ट आणि सॉक्स - बूट पाहून लक्षात येतं, की हा स्काउटचा मुलगा आहे. त्याच्याकडे सर्वच उपयोगी वस्तू अगदी तयार असतात. इथे, त्याच्या बुटात अगदी मध्यभागी काहीतरी घुसून बसलं आहे अन् ते काढण्याच्या नादात असलेला हा मुलगा पाहा ना, कसा वेडावाकडा झालेला आहे, शिवाय त्याचा चेहरा...आपल्याला अगदी गुंतवून टाकणारं हे हास्यचित्र.



आता आपल्या लक्षात आलं असेल, की लहान मुलाचं चित्र काढताना, त्या चित्राचा किंवा त्या मुलाचा लहान आकारच महत्त्वाचा नसतो, तर शरीराच्या प्रत्येक अवयवाचा आकार त्या प्रमाणात लहान असणं गरजेचं असतं. म्हणजे, हाता-पायांची बोटं, ती लहान काढली, की आपोआप नखं लहान होतात. नाकाचा, ओठांचा आकार काढल्यावर कळतं, की लहान मुलांच्या भुवया तशाच लहान किंवा एका रेषेच्या असतात आणि लहान मुलांना दाढी-मिश्या नसतात, हे तुम्हांला सांगायची गरज नाही! यापुढे व्यंगचित्रं-हास्यचित्रं पाहताना आणि काढताना, अशा बारीकसारीक गोष्टींची नोंद तुम्हीसुद्धा घेऊ शकाल.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील फरक लिहा.**

| व्यंगचित्र | हास्यचित्र |
|---|---|
| | |

**प्र. २. वैशिष्ट्ये लिहा.**

व्यंगचित्रे

**प्र. ३. 'व्यंगचित्र हे व्यक्तीचे गुण-दोष मांडण्याचे प्रभावी अस्त्र आहे', हा विचार सोदाहरण स्पष्ट करा.**

**प्र. ४. प्रस्तुत पाठातील व्यंगचित्रांपैकी तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका व्यंगचित्राचे तुम्ही केलेले निरीक्षण बारकाव्यासह स्वत:च्या शब्दांत लिहा.**

**प्र. ५. 'व्यंगचित्र रेखाटणे' ही कला आत्मसात करण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते, यासंबंधी तुमचे विचार लिहा.**

**प्र. ६. 'लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड आहे', याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**उपक्रम :** ५ मे या जागतिक व्यंगचित्र दिनाच्या निमित्ताने शाळेमध्ये विविध व्यंगचित्रांचे प्रदर्शन भरवा व त्यांचा आस्वाद घ्या.

- खालील चित्राचे निरीक्षण करा.




**विचार करा. सांगा.**

- *शेजारील चित्रात कोणती समस्या प्रतिबिंबित होते?*
- *ही समस्या का निर्माण झाली असावी?*
- *पाण्यासाठी पैसा व वेळ खर्च करावा लागला तर... कल्पना करा व लिहा.*
- *ही समस्या दूर करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल?*
- *या समस्येसंदर्भात घोषवाक्ये तयार करा.*

## भाषाभ्यास

### (४) चेतनगुणोक्ती अलंकार :

- **खालील ओळी वाचा व समजून घ्या.**

उदा., '' नित्याचेच दु:ख होते  
उशागती बसलेले  
... तोच अवचित आले  
सुख ठोठावीत दार ।''  (कृ. ब. निकुम्ब)

(१) वरील ओळींमधील अचेतन गोष्टी कोणत्या? [ ] [ ]  
(२) अचेतन गोष्टी कोणत्या क्रिया करतात? [ ] [ ]  
(३) अचेतन गोष्टी ज्या क्रिया करतात त्या मानवी आहेत का? [ ]

- **चेतनगुणोक्ती अलंकाराची वैशिष्ट्ये–** (१) अचेतन वस्तूंना सचेतन मानले जाते.  
(२) त्या वस्तू सजीव प्राण्याप्रमाणे किंवा माणसाप्रमाणे वागतात.
- **अचेतन वस्तूवर जेव्हा सचेतनेचा किंवा मानवेतर प्राण्यांवर मानवी गुणधर्माचा आरोप केला जातो, तेव्हा 'चेतनगुणोक्ती' अलंकार होतो.**
- खालील वाक्य वाचून दिलेल्या चौकटींत उत्तरे लिहा.

मंगल मंगल गीत म्हणे, अस्फुट रजनी मूकपणे.  
(१) प्रस्तुत उदाहरणातील अचेतन गोष्ट– [ ]  
(२) अचेतन गोष्टीने केलेली कृती– [ ]  
(३) अचेतन गोष्टीने केलेली कृती कशी आहे? [ ]

# ६. या झोपडीत माझ्या

**राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज –** माणिक बंडोजी ठाकूर (१९०९–१९६८) : संतकवी, समाजसुधारक. अंधश्रद्धा, जातिभेद, धर्मभेद यांसारख्या समाजविघातक गोष्टींवर हल्ले चढवून त्यांनी देशभक्ती, अहिंसा व आत्मसंयम यांचे पाठ दिले. गावागावातून ‘गुरुदेव सेवा मंडळे’ स्थापन केली. या कार्याबद्दल भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना ‘राष्ट्रसंत’ ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. ‘अनुभवसागर भजनावली’, ‘सेवास्वधर्म’, ‘राष्ट्रीय भजनावली’ इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. शिक्षण, भेदाभेद व अस्पृश्यता निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता, सर्वधर्मसमभाव यांविषयी कळकळीचे आवाहन करणारा व अज्ञानी जनतेला वात्सल्ययुक्त भूमिकेतून लोकशिक्षण देणारा त्यांचा ‘ग्रामगीता’ हा ग्रंथ सर्वत्र आदराने वाचला जातो.

सुख आणि आर्थिक सुबत्ता यांचा काही संबंध नसतो, कारण सुख–दुःख या मानवी मनाच्या भावभावना आहेत. लहानशा झोपडीतही शांतिसुखाचा अनुभव व आनंद सदैव कसा मिळतो, याचे वर्णन प्रस्तुत कवितेत केले आहे.

राजास जी महाली, सौख्ये कधी मिळाली
ती सर्व प्राप्त झाली, या झोपडीत माझ्या

भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पहावे
प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या

पहारे आणि तिजोऱ्या, त्यांतूनि होती चोऱ्या
दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या

जाता तया महाला, ‘मज्जाव’ शब्द आला
भीती न यावयाला, या झोपडीत माझ्या

महाली मऊ बिछाने, कंदील शामदाने
आम्हां जमीन माने, या झोपडीत माझ्या

येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा
कोणावरी न बोजा, या झोपडीत माझ्या

पाहूनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या




## स्वाध्याय

**प्र. १. कवितेत आलेल्या आशयानुसार पुढील मुद्द्यांतील फरक सांगा.**

| झोपडीतील सुखे | महालातील सुखे |
|---|---|
| (१) .................... | (१) .................... |
| (२) .................... | (२) .................... |

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**




**प्र. ३. 'झोपडीत निसर्गाचे सान्निध्य आहे', हे पटवून देणारी उदाहरणे लिहा.**

**प्र. ४. 'तिजोरी' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**


**प्र. ५. काव्यसौंदर्य.**

(अ) 'पाहूनि सौख्य माते, देवेंद्र तोहि लाजे
शांती सदा विराजे, या झोपडीत माझ्या' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) 'दारास नाही दोऱ्या, या झोपडीत माझ्या' या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.

- **झोपडी व महाल यांच्यातील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.**





**झोपडी :** ..................................................................................

**महाल :** ..................................................................................

**झोपडी :** ..................................................................................

**महाल :** ..................................................................................

**झोपडी :** ..................................................................................

**महाल :** ..................................................................................

**झोपडी :** ..................................................................................

**महाल :** ..................................................................................

- **उजळणी– तक्ता पूर्ण करा.**


| **उपमेय**–आईचे प्रेम **उपमान**–सागर | | **उपमेय**–आंबा **उपमान**–साखर |
|---|---|---|
| उपमा | आईचे प्रेम सागरासारखे असते. | |
| उत्प्रेक्षा | आईचे प्रेम म्हणजे जणू सागरच. | |
| रूपक | वात्सल्यसिंधू आई. | |

- **म्हण म्हणजे काय ?**

'म्हण' हा विषय मनोरंजक आहे. आपण व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या म्हणी – उदा. –'करावे तसे भरावे' किंवा 'गाढवाला गुळाची चव काय' यांसारख्या म्हणींचा अभ्यास केला तर, 'म्हण म्हणजे शहाणपणाने भरलेले वचन.' या ज्ञानाचा आपल्याला बोलताना, लिहिताना अनेक प्रसंगी उपयोग करता येतो आणि आपले बोलणे, लिहिणे अधिक प्रभावशाली करता येते. भाषेला सौंदर्य प्राप्त होते, किंबहुना त्या भाषेची ती भूषणे आहेत. शब्द हे वज्राहूनही कठीण असतात आणि फुलाहूनही कोमल असतात, असे म्हटले जाते ते शब्दांच्या अर्थासाठी.

'म्हण' म्हणजे लक्षात ठेवण्यास योग्य असे ज्ञानवचन.
उदा., 'दिव्याखाली अंधार' यासारख्या म्हणीतून ज्ञान साठवलेले आहे. अनुभव आणि शहाणपण या म्हणीच्या अर्थातून डोकावतेच.

'म्हणीचा' प्राण आहे 'लोकसंमती', म्हणीचा वारंवार उपयोग करणे हेच त्या वचनातील ज्ञानाच्या खरेपणाचे निदर्शक आहे.
उदा.,'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीतील अर्थ थोडे थोडे एकत्र करूनच साठा तयार होतो. म्हणीचा बोलताना, लिहिताना केला जाणारा वापर म्हणजे जनसंमती होय.




'म्हण' चटकदार पद्धतीने ज्ञान देते. तिच्या शब्दात खुमारी व अंत:करणावर छाप पाडण्याची किमया असते.
उदा.,'चोराला चावला विंचू चोर करीना हूं की चूं' निंद्य कर्म करणाऱ्यावर एखादे संकट आले तर ते बाहेर सांगता येत नाही.

'म्हणी'त अर्थाच्या मानाने शब्द थोडे असतात. म्हणीतील अर्थसंकोच वारंवार वापराने अशिक्षितालाही कळतो व ती म्हण सर्वश्रुत होते.
उदा., 'नाकापेक्षा मोती जड' एखाद्याने आपल्या योग्येतपेक्षा अधिक डामडौल केला तर तो हास्यास्पद होतो.

# ७. दुपार

**राजीव बर्वे** (१९५८) : प्रसिद्ध लेखक, निर्माता व दिग्दर्शक. 'मनबहर', 'मृगजळ', 'मोहरलेले क्षण', 'रंग निशेचे', 'मनात आलं म्हणून', 'मन:स्पर्श' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. 'देवाशपथ खरं सांगेन', 'बोला दाजिबा', 'देधडक बेधडक', 'सासर झालं माहेर' या मराठी चित्रपटांची निर्मिती.

दुपारच्या प्रहराचे मनोहारी चित्रण प्रस्तुत ललितलेखातून लेखकाने व्यक्त केले आहे. प्रस्तुत पाठ 'मनात आलं म्हणून' या पुस्तकातून घेतला आहे.

सकाळच्या उल्हासानंतर अन् प्रसन्नतेनंतर सूर्याच्या तेजाने तळपत असते पृथ्वी आणि पृथ्वीवरील माणसे, प्राणी, पशू, पक्षी, झाडे, वेली. सूर्य दिवसाच्या मध्यान्हावर आलेला असतो आणि सुरू होते या विश्वाची, या जगाची दुपार. त्या प्रखर सूर्याच्या तेजाने तेजाळून जातो सगळा आसमंत. 'माझ्याकडे डोळे वटारून पाहिलंस तर डोळे जाळून टाकीन', असं त्या सूर्याचं रौद्र रूप, सूर्यनारायणाकडे न बघताही दिसतं दुपारीच. आपल्या कर्तृत्वानं त्यानं दीपवून टाकलेलं असतं पृथ्वीला-इतकं, की त्याच्याकडे पाहण्याची सुद्धा हिंमत होऊ नये.

अशी ही दुपार होत असते एखाद्या शेतावर. त्या तळपत्या सूर्याला साक्षी ठेवून सकाळपासून केलेल्या कामाचा शिणवटा घालवण्यासाठी प्रशस्त अशा वडाच्या नाही तर पिंपळाच्या झाडाच्या सावलीत



विसावलेला असतो कोणी शेतकरी. सकाळपासून नांगरून अन् घाम गाळून झाल्यावर घरच्या लक्ष्मीने आणलेला भाकर-तुकडा, तिच्याच बरोबर दोन-चार सुख-दु:खाच्या गोष्टी करत नुकताच खाऊन झालेला असतो. आपल्या धन्याच्या कष्टाकडे मोठ्या कौतुकाने पाहत असते ती. दुपार कृतकृत्य होऊन मोठ्या आदराने पाहत असते त्या दोघांकडे. त्यांच्या डोईवरच्या वडाच्या झाडावरच्या पक्ष्यांचा किलबिलाटही आता थांबलेला असतो आणि फांदीवरच ऊन लागणार नाही अशा झाडांच्या सावलीत बिचारे पक्षीदेखील थोडीशीच; पण छानशी डुलकी काढत असतात. लांबवर भटकणारे, शेकडो मैलांची रपेट करणारे पक्षीदेखील मिळेल त्या वृक्षांवर थोडी विश्रांती घेत असतात. सकाळपासून प्रयत्न करून थोडं दाणा-पाणी मिळाल्यावर छोटे-छोटे पक्षीदेखील कुठे तरी विसावत असतात अन् घरांच्या आश्रयानं राहणारी कबुतरंदेखील गुटर्गू थांबवून कुठं तरी छपरांच्या सांदीत थोडी सैलावलेली असतात. 'आणखी उत्साहानं काम करण्यासाठी, सज्ज होण्यासाठी थोडी विश्रांती घ्या' म्हणत असते पशु-पक्षी अन् प्राण्यांनादेखील ही दुपार. जंगलातले प्राणीदेखील भक्ष्य मिळवण्यासाठीची भटकंती आता बंद करून, नाही तर सकाळी-सकाळीच ताव मारलेलं आपलं भक्ष्य आता पचवण्यासाठीची पायपीट बंद करून एखाद्या ढोलीत, नाही तर गुहेत अंमळ पाय ताणून विसावलेले असतात. जगाची सगळी काळजी अन् उद्याची भ्रांत त्या देखण्या जनावरांनी दुपारवर टाकून दिलेली असते-दुपारनंही ही काळजी घेतलेली असते अन् 'छान आराम करा' म्हणत असते ती त्यांना!

खेडोपाडी गावं सुस्तावलेली असतात, शेतावर न गेलेल्या घरातल्या बायका सगळी घरकामं करून 'दोन घटका जरा डोळं मिटूया'- म्हणून विसावलेल्या असतात अन् घराच्या दरवाजावर टांगलेल्या पिंजऱ्यातला पोपटदेखील छानपैकी पेंगत असतो. या सगळ्यांची काही क्षणांची विश्रांती असते दुपार; परत ताजंतवानं होण्याकरिता कार्यरत असते ती!

दुपार होते एखाद्या शहरात, नाही तर महानगरीत. काबाडकष्ट करून दमलेला कोणी गाडीवान आपलीच हातगाडी थोड्याशा सावलीत लावून आतापर्यंत बऱ्यापैकी कमाई मिळाली; पण एखादी आणखी चांगली वर्दी 'येईल का?'- या विवंचनेत थोडा पहुडलेला असतो अन् कोणी शेठ तेवढ्यात त्याला 'ऊठ रे' करून उठवतोही. थोडी लांबवरची वर्दी मिळालेली असते, त्यानेही फारशी घासाघीस न करता हमाली कबूल केलेली असते आणि तो कपाळावर उपरणं बांधून तातडीने गाडी ओढायला, दुपारचा आळस क्षणात बाजूला सारून तयार झालेला असतो. नागपूरच्या नाही तर अमरावतीच्या, नाही तर लखनौच्या वा कानपूरच्या तळपत्या उन्हात, जरा कुठं डुलकी काढू-विसावू म्हणणाऱ्या सायकलरिक्षावाल्यांना कोणी लांबची वर्दी दिलेली असते अन् घाम पुसत निघतात बिचारे रात्रीची पोटाची खळगी भरण्याकरिता भर दुपारी सायकल मारत. दुपार सलाम करते या गाडीवानांना अन् ही सायकल ओढणाऱ्या कष्टकऱ्याला!

कोणत्याशा कारखान्यात पहाटे आलेल्या कामगारांची पहिली पाळी संपलेली असते. हात धुऊन हातातला रिकामा डबा सावरत लोकल नाही तर बस पकडण्यासाठी, डोळ्यांवर आलेली झापड दूर सारण्याचा प्रयत्न करत धावत-पळत घराच्या ओढीने निघालेले असतात हे श्रमिक अन् त्याच वेळी दुपारपासून रात्रीपर्यंत अव्याहत काम करण्याकरिता आलेले असतात त्यांचे साथीदार. धडधडणारं ते अवाढव्य मशीन थांबवायचं नसतं अन् ही सगळी कार्यशीलता कौतुकानं पाहत असते दुपार अन् कार्यरत राहण्याचा आशीर्वादही देत असते त्यांना!

मधल्या सुट्टीत वर्गातून आरडत-ओरडत धूम ठोकणाऱ्या पोरांना कोण आनंद झालेला असतो, या छोट्याशा सुटीचा अन् आईनं काय डब्यात दिलंय याची उत्सुकता तर आता अगदी शिगेला पोहोचलेली असते. नेमका आज त्यांचा आवडता डबा असतो अन् तो पटापट खाऊन, हात धुऊन वर्ग सुरू व्हायच्या राहिलेल्या थोड्या वेळात त्यांनी थोडा खेळ आणि मस्तीही केलेली असते. दुपार मोठ्या गमतीनं रोज-रोज ही शाळेतल्या मधल्या सुट्टीचा आनंद घेत असते.

शहरातल्या निरनिराळ्या कार्यालयांतल्या लेखनिकांचे अन् हिशोबतपासनिसांचे लक्ष हातांतल्या नाही तर भिंतीवरच्या घड्याळाकडे लागलेले असते-केव्हाचे दीड-दोन होतायत. पोटात भुका लागल्यायत. आता एवढ्यात काही नवं काम समोर न येवो म्हणजे डबा खाता येईल थोडा निवांतपणे, असा विचार येत-येतच जेवायची सुट्टी होते. संगणक काही मिनिटांकरिता बंद होतात अन् सहकाऱ्यांशी जिवाभावाच्या गप्पा मारत सुख-दुःख 'शेअर' करत करत ताजेतवाने होण्याकरिता, पोटाला आधार देण्यासाठी एकमेकांच्या डब्यांतल्या पदार्थांचीही थोडीशी चव चाखत एखादं कार्यालय काही मिनिटांकरिता कसं शांत-शांत झालेलं असतं. जेवणाची सुट्टी संपते. संगणक सुरू होतात. दुपार म्हणते, 'उठा-आराम बास' अन् पेनं सरसावत, नाही तर संगणकाचा की-बोर्ड समोर ओढून घेत असतात...हेही आधुनिक श्रमजीवीच! कार्यालयात काम करता-करता, 'हळूच खुर्चीतच थोडीशी डुलकी काढू' या विचारानं कोणी डुलकी काढतोही आणि दुपार हसत हसत त्यालाही थोडं माफ करून टाकते. काही क्षणांनी हलकेच उठवते त्याला अन् मग तो करू लागतो अधिक जोमानं टेबलावरचं त्याचं काम!

दूरवर अथांग पसरलेल्या समुद्रावरही दुपार झालेली असते. मैलोगणती पसरलेलं समुद्राचं खारं पाणी चकाकत असतं-डोळे दीपवून टाकत असतं भर दुपारी अन् दुपार खुणावत असते, बोलावत असते या पाण्यालाच आपल्या कवेत घ्यायला. गरम झालेलं तळपणारं पाणी मात्र प्रचंड ओढीनं वाफ होऊन

आकाशाकडे झेपावतं अन् मग दुपार सुखावते हे दृश्य पाहून! सृष्टीचं हे चक्र असंच अव्याहत चालू असतं अन् त्यातली महत्त्वाची भूमिका पार पाडत असते दुपार!

कर्त्या घरातली कर्ती माणसं आपल्या आयुष्याच्या प्रश्नावर-म्हणजेच आयुष्याच्या दुपारीच कर्तृत्वानं चार पैसे आपल्यासाठी अन् पुढच्या पिढीसाठी गाठी बांधत असतात...त्या उद्योजकाची आयुष्यातली सकाळ, शिकण्याचा काळ आता संपलेला असतो अन् आयुष्याची संध्याकाळ व्हायच्या आत त्याला आपल्या आयुष्याच्या संध्याकाळची बेगमी याच आपल्या चाळीस-पन्नास वर्षांच्या काळात, आपल्या आयुष्याच्या दुपारीच करून ठेवायची असते. हे सुद्धा चक्र असंच चालू असतं घरोघरी. घरांतली वृद्ध माणसं बिछान्यावर पडून वामकुक्षी करता-करता दुपारी विचार करत असतात मागे बघत. त्या दुपारच्या शांततेत आपण कमावल्याच्या-गमावल्याच्या बाबींची मनात कुठे तरी पहुडल्या-पहुडल्या उजळणी चालू असते. कुठे-तरी भीतीची एखादी लकेरही मनात येऊन जाते-भविष्याबद्दल; पण मग 'रोज रोज हा विचार करायची तरी काय गरज? उद्याची दुपार पाहायला मिळणार आहे का नाही, याचाही नको करायला विचार...जेव्हा जे व्हायचं ते होणारच आहे, आपण फक्त या दुपारचे प्रतिनिधी!' असा विचार करून मन शांत केल्यावर दुपार मग त्या दमल्या-भागल्या जीवाला पुरेपूर विश्रांतीही घेऊ देते.

हिमालयातली, नाही तर दूर कुठे तरी आल्प्सच्या पर्वताची बर्फाच्छादित गिरिशिखरं तेजानं न्हाऊन निघतात. दुपारच्या काहिलीनं सुरू होते विघटन... एक निराळंच काम दुपार करत असते. समुद्राच्या पाण्याची वाफ अन् आता डोंगरावरच्या बर्फाचं परत पाणी-जणू दुपारच्या रौद्ररूपानं अचंबित होऊन डौलदार गिरिशिखरं धापाच टाकू लागतात अन् प्रसवू लागतो तो डोंगरमाथ्यावरून थेंबाथेंबाच्या रूपाने खाली धरतीकडे. सगळीकडून येणाऱ्या त्या पाण्याचा मग ओहोळ, ओहोळातून पुढे नदीला मिळते ते पाणी अन् पावसाचा थेंबही न पाडता ही जादूगार दुपार दुथडी भरून धावायला लावते त्या नदीला. शेतकरी सुखावतो. गहू नाही तर तांदळाचं आता दाणेदार पीक येईल म्हणून धन्यवाद देतो. दुपारनं आपलं काम चोख बजावलेलं असतं.

'हे दुपार, तू कर्तृत्ववान आहेस-कार्याची-कामाची प्रेरणा देणारी आहेस-सर्व सृष्टीला कार्यरत करणारी आहेस-आपल्या कर्तृत्वाच्या तेजानं तळपवून टाकणारी आहेस. दुपार, तू मानवाची हितकर्ती आहेस-रक्षणकर्ती आहेस. आपल्या तेजानं तू नाश करतेस, हवेतले कीटक नि जंतू अन् स्वच्छ करून टाकतेस आसमंत. तू उदास नाहीस तर उल्हास आहेस, तू अचेतन नाहीस तर चेतना आहेस, सकाळनंतर येणारी तू दीर्घ कर्तृत्ववाहिनी आहेस...सृष्टीला कार्यप्रवण करण्याची विलक्षण शक्ती तुझ्यात आहे. उत्साहानं कार्यरत ठेवणारी, वैभवाची वाट दाखवणारी, 'संध्याकाळ चांगली जावी' म्हणून झटायला लावणारी, तेजाने अशुभ-अमंगल-किडीचा नाश करणारी तू! तुला शतशः प्रणाम...शतशः प्रणाम!'

## स्वाध्याय

**प्र. १. तुलना करा.**

| कष्टकऱ्यांची दुपार | लेखनिकांची दुपार |
|---|---|
| (१) | |
| (२) | |
| (३) | |
| (४) | |

**प्र. २. कोण ते लिहा.**

(अ) दुपारला अभिमान वाटणारा मानवी घटक–

(आ) दुपारला आनंद देणारा घटक–


(इ) दुपारच्या दृष्टीने एकविसाव्या शतकातील श्रमजीवी–

(ई) सृष्टिचक्रातील महत्त्वाचे काम करणारा घटक–

(उ) मानवी जीवनक्रमातील दुपार–

(ऊ) वृद्‌ध व्यक्ती दररोज आपल्या आयुष्याचे सिंहावलोकन करतात तो काळ–

**प्र. ३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**प्र. ४. 'डौलदार गिरिशिखरे धापाच टाकू लागतात' या विधानातील अलंकार ओळखून स्पष्ट करा.**

**प्र. ५. खाली काही शब्दांचे गट दिले आहेत. त्या गटांतून वेगळ्या अर्थाचा शब्द शोधा.**

उदा., मित्र – दोस्त, मैत्री, सखा, सोबती = मैत्री

(१) रस्ता – वाट, मार्ग, पादचारी, पथ

(२) पर्वत – नग, गिरी, शैल, शिखर

(३) ज्ञानी – सुज्ञ, सुकर, डोळस, जाणकार

(४) डौल – जोम, ऐट, दिमाख, रुबाब

(५) काळजी – चिंता, जबाबदारी, विवंचना, फिकीर

**प्र. ६. स्वमत.**

(अ) 'माझी मे महिन्यातील दुपार' याविषयी आठ ते दहा वाक्ये लिहा.

(आ) 'दुपार' या ललितलेखातील कोणता प्रसंग तुम्हांला अधिक आवडला, ते सविस्तर लिहा.

**प्र. ७. अभिव्यक्ती.**


(अ) तीनही ऋतूंतील तुम्ही अनुभवलेल्या सकाळ व संध्याकाळचे वर्णन करा.

(आ) पाठात आलेल्या 'दुपार'च्या विविध रूपांचे वर्णन करा.


## रसविचार

मानवी जीवनात कलेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोणतीही कलाकृती पाहताना, त्याचा आस्वाद घेताना मानवी मनात भावनांचे अनेक तरंग उठतात. कलेचा आस्वाद घेण्याचे कौशल्य प्रत्येकाच्या स्वानुभव क्षमतेवर अवलंबून असते. ही अनुभवक्षमता शालेय वयापासून वृद्धिंगत व्हावी, या दृष्टीने 'रसास्वाद' ही संकल्पना आपण समजून घेऊया. मानवाच्या अंत:करणात ज्या भावना स्थिर व शाश्वत स्वरूपाच्या असतात, त्यांना 'स्थायिभाव' असे म्हणतात. उदा., राग, दु:ख, आनंद इ.

कोणत्याही कलेचा आस्वाद घेताना या भावना जागृत होतात व त्यांतून रसनिष्पत्ती होते.




स्थायिभावांची उत्कट स्थिती म्हणजे रस होय.




साहित्यामध्ये गद्य-पद्य घटकांचा आस्वाद घेताना आपण अनेक रस अनुभवतो. गद्य-पद्य घटकांतून चपखलपणे व्यक्त होणारा आशय, दोन ओळींमधील गर्भितार्थ, रूपकात्मक भाषा, पद्य घटकांतील अलंकार, सूचकता, प्रसाद, माधुर्य हे काव्यगुण पदोपदी प्रत्ययास येतात. अर्थपूर्ण रचनांचा रसास्वाद घेण्याची कला आत्मसात झाली, की त्यामुळे मिळणारा आनंद अवर्णनीय असतो. भाषासमृद्धीसाठी 'रसास्वाद' या घटकाकडे आवर्जून लक्ष देऊया.

मनातील वैयक्तिक दु:खाची भावना जर साहित्यातून अनुभवाला आली तर तिथे करुण रसाची निर्मिती होते. मनातल्या दु:खाचा निचरा, विरेचन होऊन (कॅथर्सिसच्या सिद्‌धांतानुसार) कारुण्याच्या सहसंवेदनेचा अनुभव घेता येतो. आणि या प्रक्रियेतून काव्याचा आस्वाद घेता येतो. तसेच वैयक्तिक दु:खाची भावना सार्वत्रिक होऊन तिचे उदात्तीकरण होते. अशा भावनांच्या उदात्तीकरणामुळे मी व माझा या पलीकडे जाऊन व्यक्तींच्या व समाजाच्या भावनांचा आदर करण्याची वृत्ती जोपासली गेली तर नात्यांमधील, व्यक्तीव्यक्तींमधील भावसंबंधाचे दृढीकरण होते.

कोणतीही कलाकृती अभ्यासताना त्या कलाकृतीचा आस्वाद घेता आला तरच ती आनंददायी ठरते. एखादी कलाकृती दिसणे, ती पाहणे व ती अनुभवणे हे कलाकृतीच्या आस्वादाचे टप्पे आहेत. केवळ डोळ्यांनी नव्हे तर कलाकृती मनाने अनुभवता आली पाहिजे. कोणत्याही कवितेचे, पाठाचे आकलन होऊन संवेदनशीलतेने कलाकृतीतील अर्थ, भाव, विचार, सौंदर्य टिपता आले पाहिजे. कवीला काय सांगायचे आहे याविषयी दोन ओळींमधील दडलेला मथितार्थ समजला तरच कवितेचे पूर्णांशाने आकलन होते व त्याच्या रसनिष्पत्तीचा आनंद घेता येतो. आपल्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ, प्रत्येक कविता, प्रत्येक घटकाकडे पाहण्याचा अर्थ समजून घेण्याची ही आस्वादक दृष्टी विकसित झाली, तर भाषेचा खरा आनंद प्राप्त होईल.

# ८.अभियंत्यांचे दैवत – डॉ.विश्वेश्वरय्या

**डॉ. यशवंत पाटणे** (१९५८) : प्रसिद्ध लेखक. 'शेकोटी', 'सुंदर जगण्यासाठी', 'चैतन्याचे चांदणे', 'जगाच्या कल्याणा', 'स्वरगंगेच्या काठी', 'ग्रंथ आमुचे साथी', 'उद्याच्या आनंदासाठी', 'चंदनाचे हात', 'स्वयंशिल्पी', 'सहावे सुख', 'सत्यशोधक तेंडुलकर' इत्यादी पुस्तकांचे लेखन.

विज्ञानयुगातील विश्वकर्मा व आपल्या विषयातील अचूक ज्ञानासाठी विख्यात असलेले डॉ. विश्वेश्वरय्या यांच्या जीवनाचा व कार्याचा परिचय लेखकांनी प्रस्तुत पाठातून करून दिला आहे. प्रस्तुत पाठ 'चैतन्याचे चांदणे' या पुस्तकातून घेतला आहे.



या विश्वाचा पसारा अफाट आहे. ईश्वर त्याचा नियंता आहे. तोच पृथ्वीचे नंदनवन करण्यासाठी 'विश्वेश्वरय्या'यांच्यासारखे अभियंते पाठवत असतो. म्हैसूरचे 'वृंदावन उद्यान' ही या अभियंत्याची अद्‌भुत निर्मिती! १५ सप्टेंबर १८६१ ते १४ एप्रिल १९६२ असे शतकोत्तर आयुष्य लाभलेल्या विश्वेश्वरय्यांच्या पूर्वजांचे गाव होते आंध्रप्रदेशातील मोक्षगुंडम. त्यांचे जन्मगाव होते कर्नाटकातील मदनहळ्ळी. त्यांच्या अभियांत्रिकी शिक्षणाचा व नोकरीचा प्रारंभ झाला महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात! अशी ही नावातली विश्वात्मकता त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातही अवतरली होती.

आशावादी मनुष्य नेहमी एक नवी स्फूर्ती व शक्ती घेऊन वावरत असतो. तो शांततापूर्ण व सफल जीवनासाठी शरीरापेक्षा मनाला अधिक महत्त्व देतो. विश्वेश्वरय्या यांनी सुनियंत्रित आचरण, कठोर परिश्रम, प्रसन्नता, संयम व प्रचंड आशावाद ही आपल्या दीर्घ जीवनाची पंचसूत्री सांगितली आहे.

शालेय शिक्षण घेत असतानाच विश्वेश्वरय्या आपल्या सुसंस्कृत पित्याला पारखे झाले. परिस्थिती बेताची होती; पण आई मनाची श्रीमंत होती, जिद्दी होती. तरीही शिक्षणाचा भार आईवर पडू नये, म्हणून विश्वेश्वरय्यांनी शिकवण्या करून पैसे उभे केले. पुष्कळ कष्ट घेतले. कष्टाच्या कमाईतून महाविद्यालयाची पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली. पुढे प्राचार्यांच्या सल्ल्यानुसार पुणे गाठले. तेथे अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला. १८८३ मध्ये ते अभियांत्रिकी पदवी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम श्रेणीत आले.

मुंबई सरकारच्या नाशिक विभागात सार्वजनिक बांधकामखात्यात साहाय्यक अभियंता पदावर त्यांना नियुक्त करण्यात आले. त्याच वर्षी त्यांनी खानदेशामधल्या एका नाल्यावर पाइप बसवण्याचे अशक्यप्राय व आव्हानात्मक काम मोठ्या कौशल्याने करून दाखवले. त्यांच्या कामावर वरिष्ठ मंडळी बेहद्द खूश झाली व त्याचीच फलश्रुती म्हणून सिंध प्रांतातील सक्कर शहराच्या पाणीपुरवठ्याची क्लिष्ट जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली.

झाले असे, सक्कर नगरपालिकेने गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी सिंधू नदीच्या किनाऱ्याजवळील एका उंच डोंगरावर एक जलाशय बांधला होता. नदीचे पाणी मोठ्या पंपाने खेचून त्या जलाशयात साठवले जाई, मग वाळूमिश्रित गढूळ घाणेरडे पाणी मुक्तपणे नागरिकांना पुरवले जाई. बिचाऱ्या नागरिकांना पाणी सोसवत नव्हते आणि प्रचंड खर्चामुळे पाणी फिल्टर करणे नगरपालिकेला झेपत नव्हते. विश्वेश्वरय्यांनी हे आव्हान स्वीकारले व त्यांनी अत्यंत व्यावहारिक व अल्पखर्चिक तोडगा काढला. नदीच्या काठाजवळ

पात्रातच एक गोल व खोल विहीर खोदून काढायला लावली. विहिरीच्या तळापासून नदीच्या प्रवाहाखाली एक बोगदा खणला. नैसर्गिक पद्धतीने विहिरीमध्ये स्वच्छ व शुद्ध पाणी साचू लागले. स्वप्नातही दिसणार नाही असे जलामृत आपल्या अंगणात आलेले पाहून सक्करकरांच्या डोळ्यांत आनंदाचे पाणी आले. तो साऱ्या भारतीयांच्या कुतूहलाचा, कौतुकाचा विषय झाला.

त्यांनी १९०७ मध्ये स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या सेवेचा गौरव, म्हणून मुंबई सरकारने त्यांना पेन्शन दिली. त्यांनी गरजेपुरते पैसे ठेवून सारी पेन्शन गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी व शैक्षणिक संस्थांच्या उभारणीसाठी खर्च केली. इच्छा एकच–आपल्यासारखा कोणी प्रतिकूल परिस्थितीशी झुंजत असेल, तर त्याला प्रोत्साहन लाभावे! मानवतेचे मूल्य कृतीने जोपासणाऱ्या विश्वेश्वरय्यांनी आपल्यातल्या माणुसकीचे असे लोभस दर्शन घडवले.

निवृत्तीनंतर स्थापत्यशास्त्रातील प्रगतीचे अवलोकन करण्यासाठी विश्वेश्वरय्या युरोपच्या दौऱ्यावर गेले होते. दौऱ्यावर असतानाच त्यांना अचानक एक तार आली होती. तार होती हैदराबादच्या निजामांची –'तातडीने या.' हैदराबादच्या मुसा नदीने रौद्ररूप धारण केले होते. सारे शहर पाण्याखाली जाण्याचा जबरदस्त धोका निर्माण झाला होता. खवळलेल्या जलाशी सामना करण्यासाठी विश्वेश्वरय्या नावाचे आधुनिक अगस्ती युरोपचा दौरा अर्धवट सोडून हैदराबादला आले. तब्बल सहा-सात महिने झुंज देऊन मुसा नदी मानवाच्या ताब्यात राहील, अशी त्यांनी कायमची व्यवस्था केली.

ही किमया म्हैसूर संस्थानच्या महाराजांना समजली. त्यांनी तात्काळ विश्वेश्वरय्यांच्या हाती मुख्य अभियंत्याची सूत्रे सोपवली.आपल्या कारकिर्दीच्या प्रारंभकाळातच त्यांनी कावेरी बंधाऱ्याची योजना साकार केली. म्हैसूरजवळ कृष्णसागर नावाचे अजस्र धरण उभे करून साऱ्या जगाचे लक्ष आपल्या कामगिरीकडे वेधून घेतले. महात्मा गांधी हे धरण बघून चकित झाले. ८६०० फूट लांब, १०१ फूट रुंद, १०४ फूट उंच अशा या धरणाच्या माथ्यावर ५० फूट रुंदीचा रस्ता व धरणातील पाणी सोडण्यासाठी आपोआप उघडझाप करणारे १७१ दरवाजे आहेत. धरणाच्या डाव्या बाजूला असलेला ६० मैल लांबीचा कालवा 'विश्वेश्वरय्या कालवा' नावाने गौरवला जातो. या कालव्यासाठी डोंगर खोदून ३९६० लांबीचा बोगदा तयार केलेला आहे. या धरणातून ठरावीक पाणी शिवसमुद्रम धबधब्यात सोडले जाते व पाण्याच्या नियमित पुरवठ्यावर विद्युतनिर्मिती केंद्र चालवले जाते. येथील ऊर्जेच्या बळावर विद्युत रोषणाईने उजळून निघतो म्हैसूरचा राजवाडा आणि वृंदावन उद्यान. ही खरी विश्वेश्वरय्यांची अजरामर स्मारके आहेत. मोठी माणसे आपल्या कार्याच्या रूपाने जगतात ती अशी!

आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर विश्वेश्वरय्या म्हैसूरचे दिवाण झाले. म्हैसूर विद्यापीठ, पोलाद कारखाना, सिमेंट कारखाना, रेशीम, चंदन, तेल, साबण उत्पादन केंद्रे उभारण्यात त्यांचा मोठा वाटा होता. शिक्षण, उद्योग, शेती इत्यादी क्षेत्रांतही त्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. मुंबई औद्योगिक शिक्षण समितीचे अध्यक्ष, मुंबई महानगरपालिका काटकसर समितीचे अध्यक्ष, भारतीय अर्थविषयक समितीचे अध्यक्ष, नवी दिल्ली राजधानी समितीचे सल्लागार अशी विविध पदे त्यांनी भूषवली. कराची, बडोदा, सांगली, नागपूर, राजकोट, गोवा इत्यादी नगरपालिकांना तसेच इंदौर, भोपाळ, कोल्हापूर, फलटण इत्यादी संस्थानांना त्यांनी अडचणीच्या काळात मौलिक मार्गदर्शन केले.

आपल्या विषयातील अचूक ज्ञानासाठी विश्वेश्वरय्या विश्वविख्यात होते. एकदा रेल्वेतून प्रवास करत असताना या अभियंत्याच्या कानाला रेल्वेच्या आवाजाची लय चुकल्याची जाणीव झाली. रेल्वे थांबवण्याचा त्यांनी आदेश दिला. रेल्वे थांबली आणि मग समजले, पुढे दीड किलोमीटर अंतरावर रेल्वेचे रूळ उखडले गेले आहेत. एका अभियंत्याच्या हुशारीने हजारो प्रवाशांचे प्राण वाचले.

राष्ट्रबांधणीसाठी आपले उभे आयुष्य वेचणाऱ्या विश्वेश्वरय्यांना ब्रिटिश सरकारने 'सर' किताब दिला,

तर मुंबई, कोलकाता, पाटणा, अलाहाबाद, म्हैसूर विद्यापीठांनी डी.लिट. पदवी देऊन सन्मानित केले. भारत सरकारने १९५५ मध्ये 'भारतरत्न' पदवी देऊन त्यांना मानवंदना दिली. त्यांच्या स्मरणार्थ पोस्टाचे तिकीट काढले. आता विश्वेश्वरय्यांचा जन्मदिन 'अभियंता दिन' म्हणून साजरा होतो.

विश्वेश्वरय्या हे विज्ञानयुगातील विश्वकर्मा होते. 'झिजलात तरी चालेल पण गंजू नका' हा त्यांनी तरुण पिढीला संदेश दिला होता. वयाची नव्वदी ओलांडली तरी ते तरुणाला लाजवतील एवढे उत्साही होते. १५ सप्टेंबर १९६१ या दिवशी साऱ्या देशाने त्यांची जन्मशताब्दी साजरी केली. पंडित नेहरू यांनी विश्वेश्वरय्यांचा गौरव करताना म्हटले, '

He is an engineer of integrity, character and broad outlook.

पृथ्वीवर प्रकाशपर्व उभारणाऱ्या या महान अभियंत्याची प्राणज्योत १४ एप्रिल १९६२ रोजी मालवली. विश्वेश्वरय्यांच्या जन्मगावातच एका भव्य उद्यानात त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांनी स्वतः बांधलेले सुंदर घर 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून दिमाखाने झळकत आहे. अभियंत्यांचे दैवत म्हणून सारे विश्वच विश्वेश्वरय्यांना वंदन करते.

## स्वाध्याय

**प्र. १. समर्पक उदाहरण लिहा.**

(अ) विश्वेश्वरय्या यांनी घेतलेले कठोर परिश्रम –

(आ) माणुसकीचे दर्शन –

**प्र. २. खालील प्रत्येक वाक्यातून विश्वेश्वरय्या यांचा कोणता गुण प्रकट होतो ते लिहा.**

(१) आवाजाची लय चुकल्याची जाणीव त्यांना झाली.

(२) सफल जीवनासाठी शरीरापेक्षा मनाला महत्त्व देणे.

(३) शिकवण्या करून त्यांनी पैसे उभे केले.

(४) अभियांत्रिकी पदवी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम आले.


(५) वयाच्या नव्वदीतही तरुणांना लाजवेल एवढे उत्साही होते.

(६) सारी पेन्शन गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च केली.

**प्र. ३. माहिती लिहा.**


(१)

विश्वेश्वरय्यांची अजरामर स्मारके



(२)

विश्वेश्वरय्या यांनी भूषवलेली विविध पदे



**प्र. ४. खालील शब्दांच्या अर्थांतील फरक समजून घ्या व त्यांचा स्वतंत्र वाक्यांत उपयोग करा.**

(अ) आव्हान-आवाहन (आ) कृतज्ञ-कृतघ्न (इ) आभार-अभिनंदन (ई) विनंती-तक्रार

**प्र. ५. खालील वाक्याचा मराठी भाषेत अनुवाद करा.**

He is an engineer of integrity, character and broad outlook.

**प्र. ६. स्वमत.**

(अ) 'विश्वेश्वरय्यांच्या दीर्घ जीवनाच्या पंचसूत्रीतून तुम्हांला होणारा बोध लिहा.

(आ) 'स्वप्नातही दिसणार नाही असे जलामृत आपल्या अंगणात आलेले पाहून सक्करकरांच्या डोळ्यांत आनंदाचे पाणी आले', या वाक्याचा भावार्थ स्पष्ट करा.

(इ) विश्वेश्वरय्यांमधील तुमच्यावर प्रभाव टाकणाऱ्या गुणविशेषांचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(ई) 'झिजलात तरी चालेल पण गंजू नका', या विचारातून तुम्हांला मिळालेला संदेश सविस्तर लिहा.

## भाषाभ्यास

रस म्हणजे चव किंवा रुची. आपण गोड, कडू, आंबट, तिखट, तुरट, खारट असे सहा प्रकारचे रस अनुभवतो. त्याचप्रमाणे काव्याचा आस्वाद घेताना वेगवेगळे रस आपण अनुभवतो. त्यातील भावनांमुळे साधारणपणे नऊ प्रकारचे रस आपल्याला दैनंदिन जीवनात आणि साहित्यात अनुभवायला मिळतात.

| | |
|---|---|
| **करुण** | शोक, दुःख, वियोग, दैन्य, क्लेशदायक घटना. |
| **शृंगार** | स्त्री-पुरुषांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या आकर्षणाचे, प्रेमाचे, भेटीची तळमळ, विरह, व्याकुळ मन. |
| **वीररस** | पराक्रम, शौर्य, धाडस, लढाऊ वृत्ती. |
| **हास्य** | विसंगती, विडंबन, असंबद्ध घटना, चेष्टा-मस्करी. |
| **रौद्र** | क्रोधाची तीव्र भावना, निसर्गाचे प्रलयकारी रूप. |
| **भयानक** | भयानक वर्णने, भीतिदायक वर्णने, मृत्यू, भूतप्रेत, स्मशान, हत्या. |
| **बीभत्स** | किळस, तिरस्कार जागृत करणाऱ्या भावना. |
| **अद्भुत** | अद्भुतरम्य, विस्मयजनक, आश्चर्यकारक भावना. |
| **शांत** | भक्तिभाव व शांत स्वरूपातील निसर्गाचे वर्णन. |

रस ही संकल्पना संस्कृत साहित्यातून आलेली आहे. ती शिकवताना प्रामुख्याने कवितांची उदाहरणे दिली जातात. याचा अर्थ रस फक्त काव्यातच असतो असे नाही तर तो सर्व प्रकारच्या साहित्यात असतो. तसेच कधी कधी या नऊ रसांव्यतिरिक्त अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या भावभावनाही असू शकतात. कोणत्याही साहित्यामध्ये एक किंवा अधिक रस असू शकतात. कवितेतील रस हा विशिष्ट शब्दांत नसतो. उदाहरणार्थ, कवितेत 'वीर' हा शब्द आला म्हणजे त्या कवितेत वीररस असेलच असे नाही. तसेच 'हुंदका' शब्द आला म्हणजे तिथे करुण रस असेलच असे नाही.

F-J4XDN

# ९. मी वाचवतोय

**सतीश काळसेकर** (१९४३-२०२१) : प्रसिद्ध कवी. 'इंद्रियोपनिषद', 'साक्षात', 'विलंबित' हे कवितासंग्रह; 'कविता लेनिनसाठी' या लेनिनवरच्या जगभरातील कवितांच्या अनुवादांच्या संग्रहाचे संपादन. 'तात्पर्य', 'मागोवा', 'लोकवाङ्मय' या नियतकालिकांच्या संपादनात सहभाग.

वेगाने बदलत जाणाऱ्या समाजाचे वास्तव चित्र प्रस्तुत कवितेतून कवीने रेखाटले आहे. कवी त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या गोष्टी वाचवू इच्छितात. महानगरी जीवनातील अस्तित्वाच्या अवकळेचे, भोवतालच्या सामाजिक स्थितींचे चित्रण काळसेकर यांच्या कवितेत आहे. प्रस्तुत कविता साधना दिवाळी अंक २००५ या मासिकातून घेतली आहे.

हाकेतून हद्दपार होतेय आई
हंबरायच्या थांबल्यायत गोठ्यातल्या गाई

हरवत चाललाय किराणा आणि भुसार
सुपर मार्केटच्या झगमगाटात झरझर
लोहाराचा भाता आणि कुंभाराचा आवा
निघून चाललाय गावगाड्यासोबत मुकाट


कल्हईची झिलई विस्तवासोबत निघून गेली
मागच्या धगीवर रटरटणारी आमटी
राखेसहित दुरावत गेली गॅसच्या शेगडीवर

बोलाचालीतून निघून चाललीय माझ्या आईची बोली
सुटीत आता खेळत नाहीत मुलं
विटीदांडू आणि लगोऱ्या
थांबून गेलाय त्यांचा दंगा,
आट्यापाट्या आणि पिंगा
परकऱ्या मुली खेळत नाहीत आता
आधीचे मातीतले खेळ

पोरं आता दंग असतात दूरदर्शनच्या चॅनेलवर
बघत क्रिकेटची मॅच
आणि उलगडत क्राइम-थ्रिलर

लिहिते हात आता राहिले नाहीत लिहिते
शब्द बापुडे केवळ वारा
तसे विरून जातायत

मी वाचवतोय माझी कविता
आणि माझी आई
आणि माझी बोली
आणि माझी भूमी
कवितेसोबत



## स्वाध्याय

**प्र. १. कोष्टक पूर्ण करा.**

| पूर्वीचे व्यवसाय | पूर्वीचे खेळ |
|---|---|
| ____________ | ____________ |
| ____________ | ____________ |
| ____________ | ____________ |

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

(अ) मनोरंजनाचे घटक

- आजचे स्वरूप → [ ]
- कालचे स्वरूप → [ ]

**प्र. ३. सकारण लिहा.**

| जुन्या गोष्टींपैकी वाचवाव्या वाटणाऱ्या गोष्टी | तुमच्या मते त्या गोष्टी वाचवण्याची कारणे |
|---|---|
| | |

**प्र. ४. काव्यसौंदर्य.**

(अ) तुम्हांला जाणवलेली कवीच्या मनातील खंत स्पष्ट करा.

(आ) 'शब्द बापुडे केवळ वारा' या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य शब्दबद्ध करा.

(इ) सामाजिक बदलांबाबत कवितेतून व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

**प्र. ५. स्वमत.**

(अ) 'माझी बोली' या संकल्पनेतून तुम्हांला समजलेला कवीचा दृष्टिकोन स्वभाषेत मांडा.

(आ) 'मॉलच्या अतिक्रमणामुळे छोट्या दुकानदारांना फटका बसतो' याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

**उपक्रम :** तुमच्या अवतीभवती घडणाऱ्या सामाजिक बदलांची खालील मुद्द्यांच्या आधारे नोंद करा व कोष्टक तयार करा.

| बदल | परिणाम | तुमचे मत |
|---|---|---|

# १०. यंत्रांनी केलं बंड

**भालबा केळकर–** भालचंद्र वामन केळकर (१९२०–१९८७) : विज्ञानलेखक, अनुवादक, नाट्यवाङ्मयाचे अभ्यासक, नाट्यदिग्दर्शक व अभिनेते. विज्ञानविषयक दृष्टिकोन विकसित व्हावा म्हणून केलेल्या लिखाणाची पस्तीसहून अधिक पुस्तके प्रसिद्ध, त्याचबरोबर 'शेरलॉक होम्सच्या चातुर्यकथा', 'बिचारा डायरेक्टर', 'शेक्सपीयरच्या नाट्यछटा' इत्यादी लेखन प्रसिद्ध.

यंत्रमानवाने मानवी जीवनावर अतिक्रमण केले, तर निर्माण होणाऱ्या गमती व धोके यांचे वर्णन रंजक पद्धतीने पाठात लेखकाने केले आहे. प्रस्तुत विज्ञानकथा 'मराठीतील निवडक विज्ञानकथा' (संपादन–निरंजन घाटे) या पुस्तकातून घेतली आहे.

दीपक फार चौकस मुलगा खरं. त्याला खेळायला म्हणून आणलेलं, कुठलंही नवं खेळणं, तो पहिल्यांदा थोडा वेळ कुतूहलानं रंगून खेळायचा; पण दिवसाच्या शेवटी ते खेळणं मोडून ते कसं चालतं याचा शोध घेण्यात तो मग्न व्हायचा. त्याचा आनंद असे तो खेळण्याच्या आतली रचना समजावून घेण्यात. यांत्रिक हालत्याचालत्या खेळण्यांच्या बाबतीत तर त्याचा उत्साह विचारू नका. दीपकला त्याचे वडील नेहमी म्हणायचे देखील, ''दीपक! यंत्राच्या वाटेला जाऊ नकोस. खेळण्याची मोडतोड करून त्यांना सतावू नकोस. एखाद्या दिवशी यंत्रं रागावली म्हणजे कळेल, मग पळता भुई थोडी होईल. तू मोडलेल्या खेळण्यांतली यंत्रं पहा कशी तुझ्याकडे चिडून पाहताहेत.''

दीपकला या बोलण्याचं हसू यायचं. त्याला वडिलांचं यंत्रांचं वेड आणि यंत्रांबद्दलचं प्रेम माहिती होतं. आपल्या कचेरीतला कारकुनांचा फड हळूहळू कमी करत, अधिकाऱ्यांना रजा देत, दीपकच्या वडिलांनी त्यांची कामं करायला यंत्रं आणली, हे दीपकला माहीत होतं आणि ती यंत्रं दीपकच्या वडिलांनी मुद्दाम त्यांनी नेमलेल्या संशोधकांकडून करवून घेतली होती, हेही त्यांनी मुद्दाम दीपकला सांगितलं होतं. त्यामुळेच ती यंत्रं दीपकचंही ऐकत असत, त्यानं सांगितलेलं काम करत असत. त्यामुळेच दीपकला त्यांच्याबद्दल जवळीकही फार वाटत असे.

एक दिवस दीपक आपल्या यांत्रिक खेळण्यांची मोडतोड करून त्या खेळण्यांतली यंत्ररचना अभ्यासत होता. यंत्रात काय फरक केला म्हणजे ही खेळणी सजीव वाटतील, वागतील यांबद्दल तो विचार करत होता. वडिलांनी त्याला मुद्दाम दिलेला एक यंत्रमानव त्याच्या जवळ बसून त्याचा उपद्व्याप पाहत होता. तेवढ्यात दीपकला आपल्या गृहपाठाची आठवण झाली. त्यानं आपल्या यंत्रमानव मित्राला म्हटलं, ''मित्रा! जरा माझा गृहपाठ करून देतोस का?'' यंत्राची मोडतोड करता–करताच दीपक बोलत होता. त्याचं त्याच्या यंत्रमित्राकडे लक्ष नव्हतं.

''नाही! मुळीच नाही! तुझा गुलाम नाही मी!'' असे उद्धट उद्गार दीपकच्या कानी पडले आणि त्यानं चमकून वर पाहिलं. त्याचा यंत्रमित्र त्याच्याकडे आपल्या जळजळीत भासणाऱ्या भिंगडोळ्यांनी पाहत होता. दीपकच्या हातातल्या मोडक्या यंत्राकडे पाहत दुःखाची किंकाळी फोडून तो यंत्रमित्र चालता झाला.


दीपक आश्चर्यानं पाहतच बसला. आपण यंत्राची मोडतोड चालवलेली पाहून आपला यंत्रमित्र रागावला, दुःखानं किंचाळला हे दीपकच्या लक्षात आलं. त्याला वाटलं, आज माझा यंत्रमित्र माझ्याशी उद्धटपणानं बोलला. ''गुलाम नाही'', असं म्हणाला. उद्या जर बाबांच्या कचेरीतल्या सगळ्या यंत्रांनी असंच चिडून असहकार पुकारला तर? तर... दीपकला या कल्पनेनं काही सुचेना.

तो तसाच उठला आणि गृहपाठ करून, जेवून शाळेत गेला. त्याच्या डोक्यात सारखे यंत्राचेच विचार चालू होते. वर्गातले मित्र यंत्र झाले तर? शिक्षकच यंत्र झाले तर? त्याचं अंग शहारलं आणि उद्या साऱ्या यंत्रांनी आपल्याला यंत्रासारखं वागायला भाग पाडलं तर? या कल्पनेनं तो स्वत:च यंत्रासारख्या हालचाली करू लागला. शिक्षक आणि मुलं आश्चर्यानं पाहतच राहिली. शेवटी शिक्षक म्हणाले, ''दीपक! काय चाललंय?'' मुलं हसली. शिक्षकांनाही हसू आवरेना. मुलांचा हशा ऐकून दीपक भानावर आला. 'हसू नका! हसू नका! यंत्रांनी मोठ्यांदा हसणं बरं नाही!' असं बोलून गेला आणि आणखीनच मोठा हशा उसळला. दीपक लाजून चूर झाला आणि आपली पुस्तकं उचलून आपल्या घराकडे पळत सुटला. तेवढ्यात शाळा सुटल्याची घंटा झाली म्हणून बरं. दीपकला मात्र पुन्हा पुन्हा भास होत होता, की आपले यंत्रमित्रच हसताहेत 'घण! घण! घण!'

दीपकचे वडील आपल्या शॉर्टहँड-टायपिस्टला पत्र लिहून घ्यायला सांगत होते. ''हं! झालं? पुढं मग नेहमीचंच....आपला आभारी आहे, काम लवकर व्हावे ही इच्छा, आपला सदैव कृपाभिलाषी इत्यादी...जा! मिस अय्यंगार! लवकर टाइप करून आणा पत्र. आज गेलंच पाहिजे.'' दीपकनं मिस अय्यंगारकडे पाहिलं आणि तो ओरडलाच, ''मिस अय्यंगार! हे तुमचं असं कसं झालं? ही तोंडावर जाळी का धातूची? आणि पिपात का घातलंत आपलं शरीर? हातापायांत हे कुठले मोजे आणि बूट स्टेनलेसचे?'' दीपकचे वडील मोठ्यांदा हसू लागले. त्या चमत्कारिक मिस अय्यंगारचाही 'किण् किण् किण् किण्' असा हसण्याचा आवाज आला. शेवटी हसू आवरून दीपककडे बघून वडील म्हणाले, ''खरंच दीपक! मी तुला सांगायला विसरलोच. या माझ्या ऑफिसमधील नव्या स्टेनोटायपिस्ट. स्वयंचलित यंत्र महिला. नाव ठेवलंय मिस अय्यंगार, कारण सवय आहे ना मला त्या नावाची. ''मिस अय्यंगार! तुम्ही जा कामाला, चल दीपक, मी तुला जरा कचेरीतल्या सुधारणा दाखवतो.'' असं म्हणून ते दोघं निघणार तेवढ्यात त्या यांत्रिक मिस अय्यंगार आल्या आणि त्यांनी टाइप केलेल्या डझनभर पत्रांचा गठ्ठा दीपकच्या बाबांच्या हातात दिला. तो घेत दीपकचे वडील म्हणाले, ''पहा दीपक! पाच सेकंदांत बारा पत्रं टाइप करून दिली यांनी.''

दीपक स्तंभित होऊन पाहतच राहिला.''बघतोस काय दीपक? अरे ही केवळ सुरुवातच आहे,'' वडील हसत म्हणाले आणि त्याला घेऊन दुसऱ्या खोलीत गेले. ''हा रोबो फोन! केवळ ध्वनिलहरींवर काम करतो.'' वडील म्हणाले. ''म्हणजे? मी जर नुसतं म्हटलं, की मला तुमच्याशी बोलायचं आहे, तर लगेच हा काम करतो?'' दीपकनं विचारलं. ''बरोब्बर! माझ्याकडच्या फोनचा लाइट लागतो, दहा सेकंदांत माझ्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही, तर बझर वाजू लागतो. मी तिथं नसलो, तर रोबो फोन जो काय निरोप असेल तो ध्वनिमुद्रित करतो आणि मी आलो की मला तो निरोप देतो.'' वडील म्हणाले.

रात्री जेवण झाल्यावर दीपक अंथरुणावर पडला तो याच विचारात. 'छे:! चैन नाही पडत. या अमानुष यंत्रांनी अगदी अस्वस्थ केलं आहे. झोप काही नीट लागेल असं वाटत नाही!' असं मनाशी म्हणत दीपक या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत होता. कधी डोळा लागला हे त्याचं त्यालाही कळलं नाही. तेवढ्यात त्याच्या कानावर शब्द पडले, 'सह्याजी, दीपकच्या वडिलांच्या नावानं मी लिहिलेल्या पत्रावर त्यांची सही कर. शाब्बास! सह्याजी! आता आपल्याला त्यांच्या साऱ्या इस्टेटीचा ताबा मिळालाच म्हणून समज!' दीपक घाईघाईनं उठला आणि शेजारच्या खोलीत त्यानं डोकावून बघितलं. त्याला तिथे मनुष्यसदृश्य यंत्र दिसली. यंत्रमानव वडिलांच्या खाजगी कचेरीत काम करत होते. त्यातील सह्याजी म्हणजे सह्यांची हुबेहूब नक्कल करणारं यंत्र, यंत्रमानव. दीपक तावातावानं आत गेला आणि म्हणाला, ''काय चाललंय काय इथं? दुसऱ्याची, प्रत्यक्ष मालकाची



सही करून पत्रं पाठवता! ही उघड उघड दरोडेखोरी झाली.'' ''माझा आता तुझ्या वडिलांच्या सर्व इस्टेटीवर ताबा आहे. तो मी मिळवला आहे.'' तो यंत्रमानव उद्धटपणे म्हणाला. ''तू या इस्टेटीचा मालक झाला आहेस हा तुझा भ्रम आहे.'' दीपक चिडून म्हणाला. ''तुझे बाबाच याला कारण आहेत. त्यांनी अगदी परिपूर्ण मनोव्यापार करणाऱ्या, विचार करू शकणाऱ्या अशा आम्हां यंत्रमानवांना तयार करवून घेतलं आहे, आता आम्ही बंड करून जगच ताब्यात घ्यायचं ठरवलं आहे.'' तो सह्याजी, हुकूमत गाजवणारा यंत्रमानव म्हणाला.

''यंत्रमानवांना, यंत्रांना कधीही जगाचा ताबा मिळणार नाही. हा काय वाह्यातपणा मांडला आहे? तुम्हांला चांगलं वठणीवर आणतो.'' असं म्हणून दीपक तिथून निघाला, जाता जाता त्याच्या कानावर यंत्रमानवाचे शब्द पडलेच, ''दीपक! उगीच संतापू नकोस. तुझे बाबा या बाबतीत काहीच करू शकणार नाहीत, कारण ते आता आमचेच...'' दीपकही ते ऐकून तडकून म्हणाला, ''तुम्हां बंडखोरांचे गुलाम झाले आहेत ना? बघतो ना! त्यांच्यावर तुमचा अधिकार चालणार नाही.'' दीपक असं म्हणत वडिलांच्या खाजगी खोलीत शिरला. बाबा पाठमोरे उभे होते. दीपक ओरडून म्हणाला, ''बाबा! स्वस्थ काय उभे राहिलात? तुमच्या कचेरीत काम करणाऱ्या यंत्रांबद्दल मला तुमच्याकडे तक्रार करायची आहे.''

''नाही, तुम्ही माझे बाबा नाही. तुम्ही तसे दिसता; पण तुम्ही माझे बाबा नाही.'' असं दीपक किंचाळत ओरडत होता; पण बाबांनी आपल्या लोखंडी पकडीत त्याचा हात धरला तो सोडला नाही. त्यांनी दीपकला टेबलाशी नेऊन त्याच्या खुर्चीत कोंबला आणि म्हटलं, ''नीट ताठ बैस! न्याहारी कर झटपट. समोर ठेवलेलं सारं नीट पटापट चावून खा.'' ''मला भूक नाही. मी आता खेळायला जातो.'' असे म्हणून दीपक खुर्चीवरून उठला. त्याच्या खांद्यावर लोखंडी गजाचे ठोके बसल्यासारखे ठोके बसले. त्याने पाहिले तर त्याचे बाबा त्याच्या मागे उभे. ते खणखणीत आवाजात म्हणाले, ''दीपक! खेळायला जायचं नाही. मी तुझा गृहपाठ तपासला आहे. तू चूक केली आहेस. पुन्हा सगळा गृहपाठ कर....'' ''पुन्हा गृहपाठ? झालेली चूक दुरुस्त करतो की.'' दीपक म्हणाला. ''नाही. सगळा पुन्हा. नाहीतर मित्रांना भेटायला जाता येणार नाही. खेळणं बंद'', बाबा म्हणाले. दीपक मुकाट्यानं गृहपाठ

करायला गेला. गृहपाठ केला आणि तो आपल्या वर्गातल्या मैत्रिणीकडे खेळायला गेला. तिथं त्याची मैत्रीण ज्यूली त्याला दिसेना, तो तिच्या बंगल्याभोवती हिंडला, बागेत तिला शोधत बसला, शेवटी हताश होऊन एका पायरीवर बसला, धापा टाकत. तेवढ्यात लांबून कुणीतरी खणखण करत येताना दिसलं, जवळ आल्यावर त्याच्या लक्षात आलं, की एक यंत्रमानव त्याच्या मैत्रिणीला-ज्यूलीला कडेवर घेऊन येत होता, ती ओरडत होती, ''सोड मला! खाली उतरव मला! मला चालता येतंय! मी पळणार नाही!''

दीपकजवळ तो यंत्रमानव तिला तसाच घेऊन आला, तेव्हा ती ओरडली, ''दीपक, तू केव्हा आलास? किती उशिरा आलास खेळायला आणि हा लोखंडी राक्षस बघ मला खाली सोडतच नाही. सोड की मला! ठेव खाली!'' ''ज्यूली! उगाच धिंगामस्ती करू नकोस. काही उपयोग नाही. या लोखंडी राक्षसाशी धिंगामस्ती केलीस तर तुलाच खरचटेल, लागेल. मुकाट्यानं वागवतोय तसं वागवून घे. कारण, आता जगातल्या यंत्रांनी बंड करून जगाचा ताबा मिळवलाय. यंत्रं आता जगावर राज्य करतात.'' असं म्हणून त्या यंत्रमानवानं तिला खाली सोडलं. ज्यूली म्हणाली, ''दीपक! आपण सुटलो!'' दीपक म्हणाला, ''असं नाही म्हणता येणार. त्यांचा मेंदू गणिती यंत्राचा आहे. आपण कुठं आहोत हे त्याला कळू शकेल. तो आला बघ! थांब! त्याची पाठ आपल्याकडे आहे. त्याच्या डोक्याच्या मागच्या बाजूला एक बटण दिसतंय. हळूच जाऊन ते दाबतो. बघूया काय होतंय ते.'' असं म्हणून दीपक हळूच त्या यंत्र रक्षकामागे गेला आणि त्यानं त्याच्या डोक्याच्या मागच्या बाजूला असलेलं बटण दाबलं आणि एकदम घड्याळाच्या गजरासारखा गजर झाला. दीपक जागा होऊन ताडकन उठून बसला. त्यानं पाहिलं तर सकाळचा सातचा गजर झाला होता. दीपकनं आजूबाजूला पाहिलं आणि तो पुटपुटला, ''भयानक स्वप्न!''

दीपक एकदम काही आठवण झाल्यासारखा ओरडला, ''अरे बापरे! बाबा!'' आणि पळत सुटला. वाटेत त्याला त्यांचा स्वयंपाकी भेटला. तो त्याच्याकडेच चहा घेऊन निघाला होता. दीपकनं त्याला विचारलं, ''बाबा कुठं आहेत?'' तो म्हणाला, ''आज लवकर न्याहारी करून कचेरीत गेले!'' दीपक तिकडे धावला आणि बाबांच्या खोलीत जाऊन ओरडला, ''बाबा! तुम्ही तुमच्या यंत्र अधिकाऱ्यांना काढून टाका. पूर्वीची माणसं कामावर घ्या नाहीतर...नाहीतर,''आणि हुंदके देऊन तो रडू लागला.

वडिलांनी त्याला जवळ घेतलं आणि त्याच्या पाठीवरून हात फिरवत म्हटलं, ''दीपक! अरे मलाही तसंच वाटायला लागलं होतं. एकटं एकटं आणि सुनं सुनं वाटायला लागलं होतं. उदास, शुष्क आणि निर्जीव वाटायला लागलं होतं. म्हणून मी कालच ठरवलं होतं, की आपली सगळी ऑफिसची माणसं परत बोलवायची. यंत्र-कर्मचाऱ्यांची हकालपट्टी करायची, म्हणून त्या सर्वांना काल रात्री फोन केले, तारा केल्या आणि विमानानं इथं बोलावून घेतलं.'' दीपकला घेऊन दीपकचे बाबा कचेरीत हिंडले. कचेरीत पुन्हा निर्माण झालेला जिवंतपणा, गजबज, हास्यविनोद, कामाची धावपळ पाहून दीपक सुखावला, आनंदानं हसू लागला. ते पाहून दीपकचे बाबा त्याला म्हणाले, ''दीपक! काहीही झालं तरी माणसं ती माणसं. माणूस आहे तिथे जिव्हाळा आहे. माणुसकी आहे, प्रेम आहे. यंत्र कधीही माणसांची जागा घेऊ शकणार नाहीत.'' आणि ते खरंच नव्हतं का?

# स्वाध्याय

**प्र. १. फरक सांगा.**

| यंत्रांद्‌वारे केली जाणारी कामे | माणसांद्‌वारे केली जाणारी कामे |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |
| (४) | (४) |

**प्र. २. पाठात खालील यंत्रे कोणती कार्ये करतात?**

| यंत्र | कार्य |
|---|---|
| (१) रोबो फोन | (१) |
| (२) यंत्रमानव | (२) |
| (३) सह्याजी | (३) |

**प्र. ३. दीपकला पडलेल्या स्वप्नात यंत्रांनी ताबा घेतल्यावर यंत्राबाबत दीपकने केलेली भाकिते.**

(१) ........................ (२) ........................ (३) ........................

**प्र. ४. खालील शब्दांची विशेषणे, विशेष्य शोधा व लिहा.**

______ –उद्‌गार ______ –यंत्र

हुबेहूब – ______ परिपूर्ण – ______

**प्र. ५. खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) हकालपट्‌टी करणे. | (अ) आश्चर्यचकित होणे. |
| (२) स्तंभित होणे. | (आ) योग्य मार्गावर आणणे. |
| (३) चूर होणे. | (इ) हाकलून देणे. |
| (४) वठणीवर आणणे. | (ई) मग्न होणे. |

**प्र. ६. खाली काही शब्दांची यादी दिली आहे. त्यांतील शब्दांचे उपसर्गघटित व प्रत्ययघटित शब्द असे वर्गीकरण करा व लिहा.**

अवलक्षण, भांडखोर, दांडगाई, पहारेकरी, पंचनामा, दरमहा, विद्‌वत्ता, नाराज, निर्धन, गावकी, दररोज, बिनतक्रार, दगाबाज, प्रतिदिन

**प्र. ७. स्वमत.**

(अ) तुमच्या मते माणसाला 'यंत्र' हा सर्वोत्तम पर्याय ठरू शकेल का? सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) 'मनुष्य करत असलेली सर्व कामे यंत्रे करू लागली तर ............' कल्पनाचित्र रेखाटा.

**उपक्रम :** 'मानवाचा खरा मित्र-यंत्रमानव' ही लेखक सुबोध जावडेकर यांची विज्ञानकथा मिळवा व तिचे वर्गात वाचन करा.

## भाषाभ्यास

● **खाली दिलेली उदाहरणे वाचा. त्यातील भाव समजून घ्या व त्यातील रसाचे नाव लिहा.**

(१) ''दिवा जळे मम व्यथा घेउनी
असशिल जागी तूही शयनी
पराग मिटल्या अनुरागाचे
उसाशांत वेचुनी गुंफुनी ''

[ ]

(२) ''जोवरती हे जीर्ण झोपडे अपुले
दैवाने नाही पडले
तोवरती तू झोप घेत जा बाळा
काळजी पुढे देवाला''

[ ]

(३) ''लाडका बाळ एकुलता फाशीची शिक्षा होता
कवटाळुनि त्याला माता।
अति आक्रोशें, रडते केविलवाणी
भेटेन नऊ महिन्यांनी ''

[ ]

(४) ही बोटे चघळत काय बसले हे राम रे लाळ ही
...शी! शी! तोंड अती अमंगळ असे
आधीच हे शेंबडे
आणि काजळ ओघळे वरूनि हे,
त्यातूनि ही हे रडे।

[ ]

(५) आम्ही कोण म्हणूनी काय पुसता,
दाताड वेंगाडुनी
फोटो मासिक, पुस्तकांत न तुम्ही
का आमुचा पाहिला?

[ ]

(६) ''असावा सुंदर चॉकलेटचा बंगला
चॉकलेटच्या बंगल्याला टॉफीचं दार
पेपरमिंटच्या अंगणात फुलं लाल लाल''

[ ]

(७) ''ओढ्यांत भालु ओरडती
वाऱ्यात भुते बडबडती
डोहात सावल्या पडती''

[ ]

(८) ''पाड सिंहासने दुष्ट ही पालथी ओढ
हत्तीवरूनि मत्त नृप खालती
मुकुट रंकास दे करटि भूपाप्रती
झाड खट्खट् तुझे खड्ग क्षुद्रां
धडधड फोड तट, रूद्र। ये चहुकडे।''

[ ]

(९) '' जे खळांची व्यंकटी सांडो
तयां सत्कर्मी रती वाढो
भूतां परस्परे जडो। मैत्र जीवांचे''

[ ]

# इंग्लंडचा हिवाळा (स्थूलवाचन)

**इरावती कर्वे** (१९०५ ते १९७०) : मानववंशशास्त्र व समाजशास्त्र विषयांतील संशोधिका, ललित निबंधकार. त्यांचा 'किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया' हा ग्रंथ जगन्मान्यता पावलेला आहे. तसेच 'परांजपे व्याख्यानमाला' व 'हिंदूंची समाजरचना' ही पुस्तके प्रकाशित आहेत. 'भारतीय संस्कृती', 'महाराष्ट्र समाज व संस्कृती', 'महाभारत-रामायण' ग्रंथांचा समाजशास्त्रीय अभ्यास या विषयांशी निगडित असे लेखन त्यांनी प्रामुख्याने केले आहे. 'मराठी लोकांची संस्कृती', 'आमची संस्कृती', 'युगान्त', 'धर्म', 'संस्कृती', 'महाराष्ट्र एक अभ्यास' हे त्यांचे महत्त्वाचे ग्रंथ; 'परिपूर्ती', 'भोवरा', 'गंगाजळ' हे त्यांचे ललित लेखसंग्रह प्रसिद्‌ध.

प्रस्तुत पाठात लेखिकेने अनुभवलेल्या इंग्लंडमधील हिवाळ्याचे विलोभनीय वर्णन केले आहे. प्रस्तुत पाठ 'भोवरा' या पुस्तकातून घेतला आहे.

सप्टेंबर-ऑक्टोबरनंतर जवळजवळ रोज पाऊस पडायचा आणि माझ्या ओळखीचे सर्व लंडनवासी पावसाला शिव्या देत असायचे. मला त्या पावसाची मोठी मौज वाटे. वाटेत चिखल नाही, मजेदार गारवा आणि चार-पाच मैल चालूनही थकवा नाही. कोणी म्हणाले, की तुम्ही कशा पावसाला कंटाळत नाही, तर मी उत्तर देई, की जगात कोठेतरी असा पाऊस पडतो व कायम हिरवेगार राहते याचे मला फार कौतुक वाटते.

नुसता पाऊसच नाही, लंडनची सर्वच सृष्टी इकडच्या उलटी. आपल्याकडे धुके म्हटले, की काहीतरी मजेदार संवेदना मनाला होते. पावसाने धुवून काढलेले प्रसन्न आकाश, सकाळची व संध्याकाळची पडू लागलेली थंडी व दहा मैल लांबचे दिसावे असे स्वच्छ वातावरण आणि त्यात काही थोडा वेळ मात्र राहणारा दृष्टीला चकवणारा धुक्याचा पडदा असे आपल्याकडचे धुके. सकाळी उठून पाहावे, तर महाबळेश्वरी किंवा सिंहगडावर खालील दरी धुक्याने भरलेली असते. तेवढ्यात सूर्य उगवावा, की त्या धुक्यावर इंद्रधनुष्ये उमटतात आणि थोडा वेळ इतस्तत: पळून, सूर्य वर आला, की धुके पार नाहीसे होऊन गवताच्या पातीपातींवर अनंत दवबिंदू कोटिसूर्य प्रतिबिंबित करतात. संध्याकाळी धुके पसरले तर तेही रात्र निवळली, की नाहीसे होते व रात्रीचे आकाश सर्व ताऱ्यांनिशी चमकत असते; पण लंडनचे धुके म्हणजे औरच असते. आधी वर्षाचे दहा दिवससुद्‌धा आकाश निरभ्र नसते. तिकडचे आकाश आपल्या आकाशाइतके उंच कधी वाटतच नाही. कधीही वरती पहा, काळसर पांढुरके छत जसे सर्व शहरावर घातलेले असते. कोळशावर चालणारे लंडनमधले हजारो लहान-मोठे कारखाने व कोळशावर चालणाऱ्या लंडनच्या घरांतील लक्षावधी चुली रात्रंदिवस वातावरणात धूर ओकत असतात. घरांतही जरी अनवाणी चालले तरी पाय काळे होतात. कुठल्याही झाडाला हात लावला तरी हात काळे होतात. या धुरकट वातावरणात धुके पसरले, म्हणजे एरवी डोळ्यांना न दिसणारे कोळशाचे कण जणू दृश्य होतात. काळोख डोळ्याला दिसतो व हातांत धरता येतो. असे धुके वर्षातून एक-दोनदा तरी लंडनवर पसरते. पृथ्वीच्या भोवती हवेचे आवरण आहे व आपण त्या हवेच्या तळाशी आहोत या गोष्टी भूगोलाच्या पुस्तकात वाचल्या होत्या; पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव लंडनच्या धुक्यात आला. समुद्राच्या तळाशी असलेल्या जीवांना काय वाटत असेल त्याची कल्पना येते. या धुक्याने हाहाकार होतो. ब्रिटिश खाडीत बोटीवर बोटी आपटतात. रस्त्यावर गाड्यांचे अपघात होतात. मुले रस्ता चुकतात.

हिवाळ्यातले कित्येक आठवडे येथला दिवस संधिप्रकाशाइतपत उजेडाचा असतो. या अर्धवट उजेडात प्रकाशाचा जसा अभाव तसाच छायेचाही. निरनिराळ्या उद्यानांतून केवढाले पर्णहीन वृक्ष उभे असायचे; पण एकाचीही सावली खालच्या हिरवळीवर पडायची नाही. आपल्याकडे रखरखीत ऊन असते व त्याबरोबरच अगदी त्याला चिकटून सावली असते. डांबरी रस्ता उन्हाने इतका चकाकतो की दृष्टी ठरत नाही; पण प्रत्येक चालणारे माणूस व धावणारे वाहन आपल्या सावलीनिशी चालत वा धावत असते. दिव्याच्या प्रत्येक खांबाची सावली त्याच्या शेजारी लांब पसरलेली असते. प्रत्येक वस्तूची एक बाजू पोळलेली आणि प्रकाशमय तर दुसरी बाजू छायेची व निवाऱ्याची, असा विरोध सतत दिसतो. आगगाडीतून प्रवास करताना बघावे, उन्हाच्या वेळी, टेलिग्राफच्या तारांवर बसताना पक्षी नेमके खांबाची सावली पडलेली असेल तेथेच खांबाला चिकटून बसलेले आढळतात. पायी चालणारी माणसे घरांची सावली ज्या बाजूला पडली असेल त्या रस्त्याच्या बाजूने चालतात. झाडाखाली दाट छायेच्या काळ्या चंद्रकळेवर लख्ख प्रकाशाचे गोल गोल कवडसे खडीसारखे चमकतात; पण येथे सावली पडेल इतका लख्ख प्रकाश महिनेच्या महिने पडत नाही.



एक दिवस मी या उद्यानातून त्या उद्यानात भटकत भटकत सेंट जेम्स बगिच्यात पोचले व तळ्यातील पोहणाऱ्या पक्ष्यांकडे पाहत होते. सगळीकडे मंद रुपेरी प्रकाश पडला होता. एकाएकी मला चमत्कारिक वाटले, की प्रकाश खालून वर फाकला आहे. मी परत नीट भोवताली व वर पाहिले. खरेच आकाश अभ्राच्छादित होते. अगदी काळे जरी नसले तरी सूर्याचा मागमूसही नव्हता. खाली तळ्याच्या पाण्यावर व मधल्या दगडावर बर्फाचा पातळ थर साचला होता व त्यातून परावर्तन पावून प्रकाश सर्वत्र फाकला होता. यामुळे प्रकाश खालून वर गेल्यासारखा वाटला. या विशिष्ट प्रकाशात सर्वच रंग आंधळे वाटतात. कधी एखाद्या दिवशी सूर्यप्रकाश पडला व तोही वसंतऋतूत फुलांनी बहरलेल्या ताटव्यावरून व हिरव्या कुरणावरून पडला, म्हणजे रंगाने नटलेली सृष्टी डोळ्यांपुढे नाचते; पण तरीही येथल्या सृष्टीतले रंग व आपल्याकडच्या सृष्टीतील रंग यांत फरक आहे. येथे सर्वच रंग जरा मंद व सौम्य वाटतात. जशा दाट छाया; पण आपापल्या भडकपणाने उठून न दिसता एकमेकांना पूरक अशा भासतात.

## स्वाध्याय

**प्र. १. कारणे लिहा.**

| लेखिकेला लंडनच्या पावसाची मौज वाटण्याची कारणे |
|---|

**प्र. २. तुलना करा.**

| भारतामधील धुके | लंडनमधील धुके |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |
| (४) | (४) |

**प्र. ३. इंग्लंडमधील धुक्याचा तेथील जनजीवनावर होणारा परिणाम सविस्तर लिहा.**


**प्र. ४. स्वमत.**

(अ) 'हिवाळ्यातील एक क्षण' तुमचा अविस्मरणीय अनुभव आठ ते दहा वाक्यांत लिहा.

(आ) तुमच्या आवडत्या ऋतूची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(इ) तुम्ही अनुभवलेल्या धुक्यातील दिवसांचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ५. खालील मुद्द्यांच्या आधारे तुम्ही भेट दिलेल्या प्रेक्षणीय स्थळाचे वर्णन करा.**



# अपठित गद्य आकलन.

आपण पाठ्यपुस्तकात गद्य व पद्य पाठांचा अभ्यास करतो. विविध साहित्यप्रकारांच्या अभ्यासाबरोबर भाषिक अंगाने प्रत्येक पाठाचा अभ्यास आपणांस करायचा असतो. विद्यार्थ्यांची भाषासमृद्धी, भाषिक विकास ही मराठी भाषा अध्ययन-अध्यापनाची प्रमुख उद्दिष्टे आहेत, म्हणूनच पाठ्यपुस्तकातील पाठांच्या सूक्ष्म अभ्यासाने आपल्याला कोणतेही साहित्य वाचल्यानंतर त्याचे आकलन होणे, आस्वाद घेता येणे व त्या भाषेचे सुयोग्य व्यावहारिक उपयोजन करता येणे ही उद्दिष्टे साध्य करता येतात. अशा पाठ्येतर भाषेच्या आकलनाचे, मूल्यमापन करण्याचे कौशल्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात अपठित गद्यउतारा हा घटक समाविष्ट केला आहे. गद्य उतारा वाचून त्याचे आकलन होणे व त्यावरील स्वाध्याय तुम्ही स्वयंअध्ययनाने करणे येथे अपेक्षित आहे.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

(१) दुष्परिणाम लिहा.

अहंकार

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

आपले जीवन सुखी, समाधानी आणि यशस्वी असावे असे प्रत्येक माणसाला वाटत असते; पण तसे होत नाही. उलट सर्वत्र पाहिले असता 'दु:ख मणभर, सुख कणभर' असाच अनुभव येतो; पण असे का होते? याचा विचार माणूस करत नाही. माणसाच्या जीवनात सर्व समस्या निर्माण होतात, त्याच्यामागे 'अहंकार' हा राक्षस असून तोच सर्व समस्यांना कारणीभूत असतो. हा अहंकार डोळ्यांना दिसत नाही. तो स्वत:जवळ आहे हे कळतही नाही, कारण तो सूक्ष्म स्वरूपातही असतो आणि स्थूल स्वरूपातही असतो. जोपर्यंत माणसाच्या ठिकाणी अहंकार आहे तोपर्यंत त्याला ज्ञान प्राप्त होणे कठीण व समाधान मिळणे त्याहूनही कठीण. माणसे अहंकाराचा फुगा कळत नकळत फुगवतच असतात. अज्ञानाला आलेला आकार म्हणजे अहंकार. या अहंकाराचा नाश झाल्याशिवाय माणसाला सत्याचा व सुखाचा साक्षात्कार होणे शक्य नाही, म्हणून माणसाला सुखी व समाधानी जीवन जगायचे असेल तर अहंकारावर लक्ष केंद्रित करून त्याला ताब्यात ठेवणे शिका.

(२) अहंकाराला ताब्यात ठेवण्यासाठी तुमच्या मते कोणते गुण जोपासावेत व कोणते दोष दूर ठेवावेत, ते लिहा.

## भाषा सौंदर्य

**एकच भाव वेगवेगळ्या प्रकारांनी व्यक्त करणे-**

एखादे रिकामे घर पाहिल्यावर तुमच्या मनात येणारे विचार.

(१) घर उदास वाटते.

(२) घर कुणाची तरी आठवण काढते.

(३) घर स्वत:चे एकेकाळचे वैभव आठवून उदास झाले आहे.

(४) घराला गाव सोडून गेलेल्या माणसांची आठवण येते.

(५) एकेकाळी माणसांनी भरलेले घर आज एकाकी वाटते.

विद्यार्थ्यांनो, ही यादी कितीही वाढवता येईल. भाषेच्या अशा अर्थपूर्ण आणि सृजनशील रचनांचा अभ्यास करा व आपले लेखन अधिक परिणामकारक करा.

# ११. मातीची सावली

**स्टॅन्ली गोनसाल्विस** (१९५५) : प्रसिद्ध लेखक. 'मातीची सावली', 'मरणात खरोखर जग हसते' हे कथासंग्रह; 'मोझेसची काठी' हा लघुकथासंग्रह; 'रक्त नव्हे, प्रेम हवे' हा बालकथासंग्रह; 'बायबलमधील व्यक्ती', 'ह्याला जीवन ऐसे नाव' हे अनुवादित लेखन प्रसिद्ध. विविध नियतकालिके व दिवाळी अंकांतून सातत्याने कथा व ललित लेखन प्रसिद्ध.

वाडवळी या बोलीभाषेत लिहिलेली ही कथा आहे. मातीवर प्रेम करणाऱ्या फरसूच्या मनातील विविध भावनांचे वर्णन केले आहे. प्रस्तुत पाठ 'मातीची सावली' या कथासंग्रहातून घेतला आहे.

फरसू पाय ओढत पायरीवर येऊन बसला. आपली खरबरीत बोटं त्याने गुळगुळीत पायरीवरून फिरवली. मग दोन्ही पाय मुडपून गुडघ्यावर हात ठेवून तो आभाळाकडे बघत बसला.

''उठा जरा, आत जाऊन बसा,'' सुनेचा आवाज आला.

दरवाजाच्या चौकटीला धरून फरसू उठला. त्याच्या पायांची हाडं कडकडली. आतल्या खोलीत येऊन तो गुबगुबीत खुर्चीवर बसला. ह्या खुर्चीवर त्याला अवघडल्यासारखं वाटायचं. पाय वर घेऊन बसले, तरी सून डाफरायची. असं बसणं त्याला कधी ठाऊक नव्हतं. जुन्या घराच्या पायरीवर ऐसपैस बसायची त्याची तेवढीच जुनी सवय. दारातच चिंचेचं पुराणं झाड होतं. मडक्यातल्या पाण्यासारखा गारवा घरभर भरून राहायचा. आईच्या पदरासारखी चिंचेची सावली घरावर असायची. मंगलोरी कौलांच्या नळ्यांतून फुंकर मारावी तसं वारं घुमायचं.

फरसू पायरीवर बसायचा. वरून भिरभिरत येणारी फुलपाखरी पानं, झाडावर चढणाऱ्या खारी पाहणं हा त्याचा फावल्या वेळचा उद्योग होता.

रात्री जेवणखाण आटोपल्यावर तो आणि आबू उशिरापर्यंत चिंचेच्या मुळांवर बसायचे. पानांतून पाझरणारं चांदणं अंगावर घेत त्यांच्या गप्पा चालायच्या.. गुरंढोरं, वाडी, गावकीतली प्रकरणं.. असे अनेक विषय. कधीमधी इनूस मास्तर यायचे. पेपरात येणाऱ्या बातम्या ते सांगायचे. अमेरिकेत की कुठे घडणारी ती नवलं फरसू व आबू मोठ्या नवलाईने ऐकायचे.



चिंचेचा पाला खूप गोळा व्हायचा. फरसूच्या लेखी ते सारं खत होतं. पान न् पान जमा करून तो वाडीत टाकायचा. या एका झाडाने त्याच्या जमिनीला अशी काळी कसदार बनवली होती, की त्याला कधी खत विकत आणावं लागलं नाही.

पावसाळ्यात हिरवीगच्च झालेली त्याची भातं पाहून गावकरी मनोमन जळायचे. भाताचं झळाळणारं सोनं घरात येऊन पडलं, की वांगी, दुधी, कारली यांची लागवड व्हायची. फरसू व त्याची मंडळी पाठीचा कणा दुखेपर्यंत राबायची. त्याची विहीरसुद्धा तशीच पाणीदार होती. दुसऱ्या

वितापर्यंत दूध देणाऱ्या गाईसारखी. भर वैशाखातसुद्धा तिला भरपूर पाणी असायचं.

एका दुष्काळात गावातल्या साऱ्या विहिरी कोरड्याठाक पडल्या होत्या; पण फरसूच्या विहिरीतील पाण्याला काही अंत नव्हता. फरसू म्हणायचा,''बापजाद्यांची कमायी रे पोरांनो ! त्यांचीच पुण्यायी यी बावडी नय् नदी हय् नदी. कोणाया कामात खोडा घटला ते तुमश्या नशिबाई वाळू जाल्याशिवाय रेल का?.. मंग या दीड एकराया तुकड्यावर माज्या घरातले उंदीर तरी जगतील का?''

त्या दीड एकराच्या तुकड्यावर त्याने चार पोरं वाढवली. तीन पोरींची लग्न करून सासरी पाठवल्या. तिघींनाही गळे झाकतील एवढे दागिने करून घातले. मनू शेवटचा.

फरसू तिसरी-चौथीच्या पुढे गेला नव्हता. मनूला त्याने शिकवलं. कुठल्याशा इंग्रजी नावाच्या कंपनीत तो कामाला आहे. मातीत बोटं घालायला तो नाखूश असतो, हे फरसूला कधीच जाणवलं होतं; पण तो काहीच बोलायचा नाही. हातपाय चालतील तोवर ह्या मातीची चाकरी करायची, हे त्यानं व त्याच्या मंडळीनं कधीच ठरवलं होतं. पोटच्या पोरांइतक्याच प्रेमाने वाढवलेल्या झाडापानांना जीव जाईस्तोवर उघड्यावर टाकायचं नाही, हा त्यांचा निश्चय होता.

''बाबा, चला, जेवून घ्या.'' मनूचा आवाज ऐकून फरसू दचकला. तो उठून उभा राहिला. किंचित थकल्यागत वाटले त्याला... हं! पूर्वी असे पाय भरून यायचे नाहीत. झाडापानांना आधार देऊन वाढवताना हयात गेली. आपला आधार तर कधीच तुटून पडला.. आता स्वतःला सांभाळायला पाहिजे.. आपणच आपला आधार आता..

''काय सपनं बगत उबे रेतात, कोण जाणे ! अख्खा दिवस रांदीतच बसावं का आमी? '' फरसूच्या कानावर येईल इतकाच आवाज स्वयंपाकघरातून येत होता. स्वतःला सावरून तो जेवणाच्या टेबलावर येऊन बसला.

तिघंही मुकाट जेवत होते. ही खाणावळ फरसूच्या घशातून घास उतरू देत नव्हती. रोजचे हे मुके घास त्याच्या डोळ्यांत आसवं आणत होते.

पूर्वी जुन्या घराच्या त्या अंधाऱ्या पडवीत जेवणं व्हायची. मनूची आई प्रार्थना करायची.. 'आमचे बापा, तू सर्गात आहेस.....'

एकसुरात प्रार्थना झाल्यावर जेवण व्हायचं. मनूच्या आईची टकळी चालायची. मनू तर जेवता जेवता उठून नीना, सिबलशी मस्ती करायचा. तासभर जायचा जेवणाच्या गडबडीत... मनं रिती व्हायची घासागणिक पोटात माया उतरायची.. जेवण तरी काय असायचं.. एखादी भाजी, कधी डाळ, सुके बोंबील, भात आणि तांदळाच्या रोट्या, असंच काहीतरी..

पण, तरारून वाढलेल्या गुबगुबीत केळीचं अख्खं बन एका पाऊसवाऱ्यात जमिनीवर झोपावं, तसा आपला संसार होत्याचा नव्हता झाला. वाडीत खपताना पायाला तार की खिळा लागला आणि आठवडाभरातच बायको-कोसूची मेणवात विझून गेली! कोणाची नजर लागली, की पणजांची पुण्याई संपली? की गेल्या जन्मीच्या पापांचा घडा आता वाहत आहे? नाही, नाही.. हा मातीचाच शाप असणार. ज्या मातीने हा संसार फुलवला त्याच मातीला उजाड केलं आपण.. कारली-वांग्यासारखा तिचा बाजार मांडला. मनूने जमीन विकायला काढली व आपण बैलासारखी मान डोलवली. ''मनू , अरे पोरा, बोल रे कायतरी.. , '' फरसू न राहवून उमाळ्याने बोलून गेला, '' अरे , तू जमीन इकली मणून माज्या मनात कांय राग नय् का तुआ दुस्वास नय्.. आमसा जलम त्या मातीत गेल्ता मणून थोडं वायीट वाटते..''

''बाबा, जमीन इकली म्हणून आज ओ बंगला बांदता आला, नय् ते उबा जलम त्या गोठ्यात काडाला लागलोआ. आज माणसाहारकं घर मिळालंय, परमेसराये आभार माना.. नायतर तुमसं आपलं, माजी जमीन गेली, माजी जमीन गेली, चालूच.''

पाल अंगावर पडावी, तसे मनूचे शब्द ऐकून फरसूचे अंग थरारले. सूनबाई जेवायची थांबली होती. मनूच्या चेहऱ्यावर घर बांधल्याचा अभिमान काठोकाठ पसरला होता. फरसूला पोटात खड्डा पडल्यासारखं झालं. पुढ्यातली बशी सरकवून तो उठला. सूनबाई जेवू लागली. मनूही जेवू लागला.

फरसू खांदे पाडून, मान खाली घालून अंगणात आला.

बिल्डरने मनूला सुंदर, आटोपशीर बंगला बांधून दिला. त्याच्या समोरच त्याची भलीमोठी इमारत आकाराला येत होती.

फरसूला वाटलं, जमिनीवरनं ट्रॅक्टर फिरला, बागायत मातीला मिळाली, मोठाले खड्डे खणले गेले, भलंमोठं दगडविटांचं धूड तिच्यावर उभारलं गेलं, तेव्हा त्या मायला काय वाटलं असेल? आणि या मातीशी नाळ तुटली की माणूसपण तरी कसं राहणार? पाय मातीवर असतात, तोवरच माणूस माणूस असतो.. पोराने मातीशी नातं राखलं नाही, आता बापाशीही नातं सांगत नाही. सिमेंट, दगड, धोंड्यांशी का कधी माणसाचं नातं सांधलं जातं? मातीनंच घडवलंय ना आपणा सर्वांना? आणि शेवटी तिच्याच तर कुशीत विश्रांतीसाठी जायचं आहे.. तिलाच विकून आम्ही या गुळगुळीत, चकचकीत घरात राहायला आलो..

चंद्रप्रकाश सर्वत्र लखलखत होता. पूर्वी पावसासारखं चांदणं चिंचेतून ठिबकायचं. घरातील जुनीपुराणी वस्तू विकावी, तसं ते झाडही गेलं. आंबा, फणस, भेंडी, नेवर.. सारी जमीनदोस्त झाली.

मनू एकदा म्हणाला, '' यी झाडं मणजे नुस्ता कचरा.. उंदीर कवडे येतात घरात... आपल्या बंगल्यापुडं यी जंगली झाडं अजिबात शोभत नाय.. कापून मस्त गुलाब लावू..''

तेव्हा फरसू उत्तरला होता, ''पोरा, झाडं जंगली नसतात रे कवा ! आपण माणसंच जंगली.. कुराडी घेऊन झाडं कापणारी आपण माणसंच जंगली रे, मनू..''

फरसूच्या जन्माआधीची ती झाडं फरसूच्या डोळ्यांदेखत तोडली गेली. मनूने त्या ठिकाणी इंग्लिश गुलाबांची बाग फुलवली.

'' फरसू ऽऽ, फरसू अरे रातच्या पारा एकटाच बायेर काय करते?'' आबूचा आवाज ऐकून फरसू थोडा भानावर आला.

''आबू, बग पयली माजी बायको कोसू गेली.. मंगं जमीन गेली... घर सुद्धा पाडून टाकीलं न् शेवटी ती चिंच पण कापिली.. माजा एकटा पूत.. तो सुदं आथं माजा नय् रायला रे ... जेजूस आथं मानासुदं नेलं ते बरं होईल.. ''

''अरे, अया रडते काय फरसू ? मी.. तुजा दोस्त आबू हय्, इनूस मास्तर हय.. अं? न तुजा पोरगा, सूनबाय, पोरी, जावांय हत् नं? कोणी तुला टाकणार नय? आमचा फरसू खरंस डोकरा जाला आथं..'' आबू उसनं हसत म्हणाला.

'' आबू, यी माया रगताई माणसं.. पण जमीन इकली, पैशे आले न् ते बापाला इसरले.. आता माजं कोणी नय् रायलं! माजी जमीन गेली.. मी तिला ईकून टाकलं.. मनूनं कागद आणला, मी सयी केली.. मी बेईमानी केली.. माज्या मायला फशीलं.. ''

'' अरे येड्या, किती लोक जमिनी ईकितात. तू आपला नुस्ता रडत बवलाय.. बग, टोपलीभर पैसा मिळालाय मनूला.. आथं मातीत हात घालाशी गरज नय्.. सुखात खा मरेपरत.. ''

'' तो पैसा नय् रे आबू.. ते आमशा आजा, पणजाअं रगत हय्.. रगताअं नातं तुटे नय्.. रगताये शाप भोगाला लागतात.. ते शाप मीस भोगीन.. आथं पैसा नय् का सुख नय्.. जेजूस माफ कर रे ! ''

फरसूने हात जोडून आकाशाकडे पाहिले.

'' येड्या, फरसू, लोकं जमिनी ईकून मजा करतात. गाड्या घेतात.. बंगले बांदतात.. तुला आपलं

जलमभर ढोरहारकं खपाला पाये..''

'' तू सुदं त्या बिल्डरहारका जाला रे, आबू!'' फरसूने आवाज चढवत त्याला फटकारले. मग त्याच्याकडे पाठ वळवून तो खालच्या आवाजात म्हणाला, '' माती नयेल ते ढोराअ जीवन तरी काय कामाअ ? आबू, आमी लागले रे आथं वाटेल.. पण आमशी नातंपण.. त्यांना कायच नय् रेणार रे.. त्यांना पायाखालती जमीनच नय् रे..''

''पुढचं पुढे बगून घेतील ते,'' आबू त्याच्या खांद्यावर थोपटत म्हणाला, '' आजकालशी पोरं खूप हुशार हायेत.. त्यांशे पाय जमिनीवर नाय.. यी पोरं बोटीवर जातात.. ईमानात जातात.. अरबस्तानात, इंग्लंड, अमेरिका कटे कटे गेल्यात पोरं आपली... चल तू, टाइम बग कवडा जाला.. जा, नीज..''

आबू निघून गेला. त्याची सावली मांजरीसारखी घुटमळत त्याच्या मागे गेली.

फरसू पाठमोऱ्या आबूकडे पाहतच राहिला. अचानक त्याची नजर डावीकडे वळली. त्याच्या दीड एकराच्या तुकड्यातून ती भलीमोठी इमारत कोंभासारखी वरवर येत होती. मंद चांदण्या प्रकाशात ते धूड अक्राळविक्राळ भासत होतं. इमारतीची काळी ठिप्पूस सावली झाडंझुडपं सपाट केलेल्या शेताला कवटाळत सुस्तावल्यासारखी अस्ताव्यस्त पसरली होती.

फरसूला वाटलं, ही आपल्या मातीची सावली आहे.

## स्वाध्याय

### प्र. १. खालील ओळींतील संकल्पना स्पष्ट करा.

(अ) मडक्यातल्या पाण्यासारखा गारवा. ..............................

(आ) आईच्या पदरासारखी चिंचेची सावली. ..............................

(इ) वरून भिरभिरत येणारी फुलपाखरी पाने. ..............................

### प्र. २. खालील तक्ता पूर्ण करा.

| घटना | परिणाम/प्रतिक्रिया |
|---|---|
| (१) फरसू खुर्चीवर पाय वर घेऊन बसतो. | |
| (२) मनूला फरसूने शिकवले. | |
| (३) वाडीत काम करताना कोसूच्या पायाला तार की खिळा लागला. | |
| (४) मनूने जमीन विकायला काढली. | |

### प्र. ३. आकृती पूर्ण करा.

(अ) फरसूचा वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करणाऱ्या कृती

(आ) पाठाच्या आधारे फरसूचे खालील मुद्द्यांच्या आधारे वर्णन करा.

छंद


मेहनत

फरसू

दु:ख

माणूसपण

**प्र. ४. ओघतक्ता तयार करा.**




**प्र. ५. खालील वाक्ये प्रमाणभाषेत लिहा.**

(अ) ''आमचा जलम या मातीत गेला म्हणून थोडं वायीट वाटते.''

(आ) ''त्यांचीच पुण्यायी यी बावडी नय् नदी हय् नदी.''

**प्र. ६. खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ शोधा व लिहा.**

(अ) टकळी चालवणे–

(१) सूत कातणे. (२) सतत बोलणे. (३) वस्त्र विणणे.

(आ) नाळ तुटणे–

(१) मैत्री जमणे. (२) संबंध न राहणे. (३) संबंध जुळणे.

**प्र. ७. खालील अर्थांची वाक्ये पाठातून शोधून लिहा.**

(अ) फरसूने आपल्या वडिलांचे ऋण व्यक्त केले –

(आ) फरसूचा संसार होत्याचा नव्हता झाला –

(इ) फरसूचे झाडांबाबतचे प्रेम –

**प्र. ८. स्वमत.**

(अ) 'मातीशी नाळ तुटली, की माणूसपण तरी कसं राहणार?' या फरसूच्या विधानाशी तुम्ही सहमत असल्यास त्याची कारणे सोदाहरण लिहा.

(आ) पाठात व्यक्त झालेल्या फरसूच्या विचारांबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

(इ) 'मातीची सावली' या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दांत लिहा.

**उपक्रम :** (१) प्रस्तुत पाठाचे नाट्यरूपांतर करून वर्गात सादर करा.

(२) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे 'उद्याच्या सुंदर दिवसासाठी' हे पुस्तक वाचा.

## भाषा सौंदर्य

आपली मराठी भाषा वाक्प्रचार, म्हणी व सुभाषिते यांनी समृद्ध आहे. शरीर अवयव, प्राणी, पक्षी, मानवी भावभावना, अन्न वा इतर अशा अनेक गोष्टींवरून आपल्याला वाक्प्रचार व म्हणी पाहायला मिळतात. खाली एक तक्ता दिला आहे. तक्त्यातील प्रत्येक रकान्यात दिलेल्या उदाहरणाप्रमाणे आणखी म्हणी व वाक्प्रचार शोधा व लिहा.

| शरीर अवयवावर आधारित | प्राणी व पक्षी यांवर आधारित | मानवी भावभावना | अन्नघटक | इतर घटक |
|---|---|---|---|---|
| चेहरा काळवंडणे. | पोटात कावळे ओरडणे. | जिवाची उलघाल होणे. | खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी. | दगडापेक्षा वीट मऊ. |

## भाषाभ्यास

तुमच्या पाठ्यपुस्तकांमध्ये तुम्ही धडे वाचता, कविता वाचता. धडे आणि कविता म्हणजेच गद्य आणि पद्य यांच्या रचनेत फरक आहे, हे तुम्हांला माहीत आहे. हा फरक असतो मुख्यत: लयीचा. पद्य गाता येते किंवा लयीत वाचता येते. गद्याचे तसे नसते. कवितेमध्ये लय निर्माण कशी होते? कुठल्या गोष्टीमुळे होते? हे आज आपण बघणार आहोत. वृत्त, छंद यांसारख्या गोष्टींमुळे कवितेला लय मिळते. कवितेची लय समजण्यासाठी आपण त्या गोष्टींचा अभ्यास करणार आहोत. वृत्त किंवा छंद म्हणजे काय? लय निर्माण करण्यासाठी कवितेची जी विशिष्ट शब्दरचना केली जाते. ऱ्हस्व, दीर्घ स्वरांचा जो एक विशिष्ट क्रम वापरला जातो, त्याला 'वृत्त' म्हणतात. याचा अर्थ कविता एका विशिष्ट वृत्तामध्ये रचलेली असते, म्हणून ती आपल्याला लयीत म्हणता येते. गणितात जशा बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या संकल्पना येतात, तशा वृत्तविचारामध्ये काही संकल्पना महत्त्वाच्या आहेत. त्या संकल्पना आपण आधी समजून घेऊया.

| व्याकरणातील संज्ञा | लघू | गुरू |
|---|---|---|
| अक्षरे ⟶ | ऱ्हस्व अक्षरे | दीर्घ अक्षरे |
| अक्षरे–स्वर ⟶ | अ, इ, उ, ऋ | आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ |
| स्वरयुक्त अक्षरे ⟶ | क, कि, कु, कृ | का, की, कू, के, कै, को, कौ |
| संकेत खूण ⟶ | ∪ (अर्धचंद्र) | – (आडवी रेघ) |
| मात्रा संकेत ⟶ | १ मात्रा | २ मात्रा |

| उदा., | पसारा | काकडी | मदन | पाटण | वैशाली |
|---|---|---|---|---|---|
| लघुगुरूक्रम | ∪ – – | – ∪ – | ∪ ∪ ∪ | – ∪ ∪ | – – – |
| मात्रासंख्या | १ २ २ | २ १ २ | १ १ १ | २ १ १ | २ २ २ |
| | ५ | ५ | ३ | ४ | ६ |

# १२. महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया

**अण्णा भाऊ साठे** (१९२०-१९६९) : लोकशाहीर, कथाकार, कादंबरीकार, नाटककार.

'वारणेचा वाघ', 'फकिरा', 'रूपा', 'गुलाम', 'चंदन', 'मथुरा', 'चिखलातील कमळ', 'रानगंगा', 'माकडीचा माळ', 'वैजयंता', 'वैर', 'पाझर', 'चित्रा', 'आग', 'अहंकार', 'आवडी', 'गुऱ्हाळ' इ. कादंबऱ्या; 'चिरानगरची भुतं', 'निखारा', 'पिसाळलेला माणूस', 'फरारी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'गजाआड' इत्यादी कथासंग्रह; 'इनामदार', 'पेंग्याचं लगीन', 'सुलतान' ही नाटके; 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवासवर्णन प्रसिद्ध.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या ओघवत्या लोकभाषेतून प्रस्तुत काव्यरचना केली आहे. महाराष्ट्रावरील त्यांचे प्रेम शब्दाशब्दांतून व्यक्त होते. प्रस्तुत कविता ही 'कविता व माझा रशियाचा प्रवास' या पुस्तकातून घेतली आहे.



कंबर बांधून ऊठ घाव झेलाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

महाराष्ट्र मंदिरापुढती । पाजळे याशीची ज्योती
सुवर्ण धरा खालती । निल अंबर भरले वरती
गड पुढे पोवाडे गाती । भूषवी तिला महारथी
तो अरबी सागर लागे जयाचे पाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

ही मायभूमि धीरांची । शासनकर्त्या वीरांची
घामाची आणि श्रमाची । खुरप्याची आणि दोरीची
संतांची, शाहीरांची । त्यागाच्या तलवारीची
स्मरून धुरंधर आता त्या शिवराया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

पहा पर्व पातले आजचे । संयुक्त महाराष्ट्राचे
साकार स्वप्न करण्याचे । करी कंकण बांधून साचे
पर्वत उलथून यत्नाचे । सांधू या खंड की त्याचे
या सत्यास्तव मैदानि शिंग फुंकाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

धर ध्वजा करी ऐक्याची । मनीषा जी महाराष्ट्राची
पाऊले टाक हिंमतीची । कणखर जणु पोलादाची
घे आण स्वातंत्र्याची । महाराष्ट्रास्तव लढण्याची
उपकार फेडुनी जन्मभूमीचे जाया
महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया ।।

## स्वाध्याय

**प्र. १. वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) **महाराष्ट्राची सांस्कृतिक वैशिष्ट्ये**

(आ) **कवितेत आलेली महाराष्ट्र भूमीतील व्यक्तिवैशिष्ट्ये**

**प्र. २. असत्य विधान ओळखा.**

(१) धुरंधर शिवरायांना स्मरावे. (२) असत्यास्तव शिंग फुंकावे.

(३) स्वातंत्र्याची आण घ्यावी. (४) जन्मभूमीचे उपकार फेडावे.

**प्र. ३. कवितेतून व्यक्त झालेली 'महाराष्ट्राबद्दलची कृतज्ञता' हा विचार स्पष्ट करा.**

**प्र. ४. महाराष्ट्राची बलस्थाने तुमच्या शब्दांत सांगा.**

**प्र. ५. काव्यसौंदर्य.**

(अ) 'धर ध्वजा करी ऐक्याची । मनीषा जी महाराष्ट्राची' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य लिहा.

(आ) कवितेतून व्यक्त होणाऱ्या रसाचे तुमच्या शब्दांत सोदाहरण वर्णन करा.

**प्र. ६. अभिव्यक्ती.**

(अ) तुम्हांला जाणवलेल्या महाराष्ट्रातील अभिमानास्पद बाबींचे वर्णन करा.

FH1XXI

## भाषाभ्यास

**वृत्तांतील लघुगुरूक्रम ठरवण्याचे काही नियम आहेत.**

(१) 'पुस्तक' या शब्दांतील लघुक्रम (–∪∪) असा आहे, कारण 'पु' हे अक्षर लघू असले, तरी पुढच्या 'स्त' या जोडाक्षराचा आघात मागील लघु स्वरावर येतो. त्यामुळे त्याच्या २ मात्रा धराव्या लागतात. जर असा आघात येत नसेल, तर जे अक्षर ऱ्हस्व आहे ते ऱ्हस्वच राहते.

(२) जोडाक्षरातील शेवटचा वर्ण ऱ्हस्व असेल, तर ते जोडाक्षर ऱ्हस्व मानावे.
उदा., भास्कर (–∪∪) दीर्घ असेल, तर दीर्घ उदा., इच्छा (––).

(३) लघु अक्षरावर अनुस्वार येत असेल किंवा त्यानंतर विसर्ग येत असेल तर ते गुरू मानावे.
उदा., नंतर (–∪∪) दु:खी (––).

(४) कवितेच्या चरणातील शेवटचे अक्षर लघू असले तरी दीर्घ उच्चारले जाते. त्यामुळे ते गुरू किंवा दोन मात्रांचे मानतात.

मराठी पद्यरचनेत अक्षरवृत्ते, छंदवृत्ते, मात्रावृत्ते किंवा जातिवृत्ते असे तीन प्रकार आढळतात.

| अक्षरवृत्ते | छंदवृत्ते | मात्रावृत्ते |
|---|---|---|
| प्रत्येक चरणातील अक्षरांची संख्या सारखी, लघुगुरूक्रमसुद्धा सारखा असतो. | चरणातील अक्षरांची संख्या समान असते; पण लघुगुरूक्रम नसतो. | अक्षरांची संख्या सारखी नसते; पण मात्रांची संख्या मात्र सारखी असते. |

# १३. थोडं 'आ' भारनियमन करूया

**मंगला गोडबोले** (१९४९) : प्रसिद्ध लेखिका. 'अशी घरं अशी माणसं', 'कुंपण आणि आकाश', 'सहवास हा सुखाचा', 'अळवावरचे थेंब', 'सोबत', 'भलं बुरं', 'आरंभ' इत्यादी पुस्तके व कथासंग्रह ; 'गोंदण' ही कादंबरी; 'नीरू आणि नेहा' हे बालसाहित्य प्रसिद्ध.

वरकरणी गंमतीदार मात्र अंतर्यामी विचार करायला लावणारा हा लेख आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक कशाप्रकारे विनोद निर्माण करतो, यावर लेखिकेने प्रस्तुत पाठातून प्रकाश टाकला आहे. प्रस्तुत पाठ हा 'शुभेच्छा' या ललितलेखसंग्रहातून घेतला आहे.

गोऱ्या साहेबाच्या आणि त्याच्या भाषेच्या प्रभावाखाली, दबावाखाली मोठ्या झालेल्या आमच्या पिढीवर 'गोऱ्यांचे शिष्टाचार' या गोष्टीची अंमळ जास्तच मुद्रा उमटली. ती माणसं कशी शिष्टाचाराला चोख असतात, ती माणसं कशी 'थँक्यू /प्लीज'चा जप करतात, त्यांचे व्यवहार आपल्या व्यवहारांसारखे धसमुसळे नसतात. साधं घोटभर पेय दिलं तरी हातभर थँक्यू म्हणतात, यांसारखे गुण नेहमी गायले गेले. त्यामुळे थँक्यू म्हणता येणं हा सुसंस्कृतपणाचा कडेलोट आहे, असं काही काळ वाटून गेलं. 'तू कसली ग माझी थँक्यू ? मीच तुझी थँक्यू.' त्याला थँक्यू दिलेस का पण? 'तुला कितीही थँक्यू केलं तरी कमीच.' अशी वाक्य हौसेने बोलण्याचा तो काळ होता; पण ते कुणी, कुणाचे, कितीदा मानावेत याला काही सुमार? अति झाल्याने, अस्थानी झाल्याने, कृत्रिम झाल्याने ते खोटे वाटायला लागतात, हेही लोकांच्या कसं लक्षात येत नाही?

रोजच्या व्यवहारात पाहायला गेलं तरी माणसं अगदी क्षुल्लक कारणांसाठी एकमेकांचे आभार मानताना दिसतात. नुकतं बोलायला लागलेल्या मुलालाही सर्वांत पहिल्यांदा थँक्स-थँक्यू वगैरे म्हणायला शिकवतात. हातावर चॉकलेट ठेवलं, थँक्यू. पापा घेतला, थँक्यू. उंचावरून – जिथे त्याचा हात पुरत नाही – तिथली वस्तू काढून दिली, थँक्यू.

तो आभार मानत होता, कारण त्याला लहानपणापासून तसं शिकवलेलं होतं. आभार न मानण्याचा मॅनरलेसपणा त्याच्या खाती रुजू होणार नव्हता. सर्व नात्यांना, सर्व निमित्तांना लागू होतील अशी आभारकार्ड आताही मिळताहेत, पुढे ती आणखी वाढतील. जन्मल्या जन्मल्या आईबापांचे आभार मानणारं कार्ड आणि वर गेल्यावर खालून वेळच्या वेळी आपल्याला नीट वर पोचवणाऱ्यांचे आभार कार्ड अजून माझ्या पाहण्यात आलेलं नाही. लवकरच तसं आल्यास आश्चर्य वाटायला नको.

तसे आमचे जुने आकाशवाणीवालेही बऱ्यापैकी आभारबाज होतेच. विशेषतः आपल्या आवडत्या कार्यक्रमांमध्ये तर आभारांचा मारा होई. गाणं कळवलंत म्हणून आभार, हवं ते गाणं ऐकवलंत म्हणून आभार, पत्राची दखल घेतली म्हणून आभार, आभाराच्या पत्राला उत्तर म्हणून परत आभार, अशी चैन तेही करत. सध्याच्या चॅनलवाल्यांनी त्यांना चारीमुंड्या चीत केलेलं आढळतं. एकेकदा मनात येतं, की या सर्व चॅनेलवाल्यांनी एक मार्ग काढावा. रोज सकाळी प्रत्येक चॅनेलवरचे कार्यक्रम सुरू करताना आणि रोज रात्री पडदा मिटवताना एकदा सर्वांचे सर्व गोष्टींबद्दल घाऊक आभार मानून टाकावेत किंवा कोणताही कार्यक्रम गळत असला, तरी ठरावीक वेळानंतर एक आभाराची कॅप्शन.. तळटीप फिरवत राहावी. जसे–

- आजच्या दिवसभरात किंवा अमुकअमुक सत्रामध्ये ज्यांनी ज्यांनी आमच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेतला त्यांचे आभार. त्यांनी तोंड उघडल्याबद्दल आणि योग्य वेळी ते बंद केल्याबद्दल धन्यवाद.
- आजच्या दिवसभरात ज्यांनी ज्यांनी सूत्रसंचालन केलं त्या त्या सगळ्या सूत्रसंचालकांचे आभार. त्यांना

नटवणाऱ्यांचे आभार. नटल्यामुळे ते सुंदरच दिसत होते असं मानणाऱ्यांचे आभार.

- आजच्या दिवसभरात आमच्या वाहिनीवर ज्यांनी ज्यांनी नृत्य केले, गाणी म्हटली, वाद्ये वाजवली त्यांचे शतश: आभार.
- आजच्या दिवसभरात ज्यांनी ज्यांनी आपापल्या रिमोट कंट्रोलची बटणं फिरवली आणि किमान तीस सेकंद आमचा चॅनेल पाहिला त्यांना कोटी कोटी प्रणाम.
- आजच्या दिवसभरात ज्यांनी ज्यांनी मुलाखती दिल्या आणि हुकमी 'मागे वळून पाहिलं' त्यांचे आम्ही ऋणी आहोत. त्यांच्या दुखऱ्या मानांचे शतश: आभार.
- आज दिवसभर वीजपुरवठा नियमित करून लोकांपर्यंत आमचे कार्यक्रम पोचवणाऱ्या वीजमंडळाचे आभार.
- आजच्या दिवसभरात आमच्या वाहिनीवरच्या विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन पैठण्या, हिऱ्यांचे हार, घड्याळं, मिक्सर, सूटिंग, मोटारी, विमाने, सॅटेलाईट, ताजमहाल, कुतुबमिनार इत्यादी छोटीमोठी बक्षिसं जिंकणाऱ्या दर्शकांचे मन:पूर्वक आभार. ही बक्षिसं लावणाऱ्यांचे आभार, हरणाऱ्यांचे आभार, बघून जळणाऱ्यांचे आभार इ. इ. इ.

साक्षात पु. ल. देशपांडे यांनी एके ठिकाणी म्हटलंय, की आदराचा कप्पा हा अंगावरच्या कोटावर दर्शनी भागी लावण्याची गरज नसते. आदर हा मनात तुडुंब भरून राहू शकतो आणि तशा अवस्थेत तो कृतीत सहजासहजी उतरतो. आभाराबाबतही त्यांचे हे निरीक्षण बव्हंशी लागू पडतं. मुळामध्ये आपले संस्कार आणि संस्कृती ही दिखाऊगिरीच्या पक्षातली नाही. भावना दडवून ठेवाव्यात, अनमोल दागिन्यासारख्या बासनात गुंडाळून खोल कप्प्यात ठेवाव्यात, त्या मुखर करण्याची गरज नाही, शब्दबंबाळपणा-प्रदर्शन अजिबात नको, असं ऐकत-शिकत आपण लहानाचे मोठे होतो. आईच्या आजारपणात आपल्या मित्रमैत्रिणींनी मदत केली आणि आपण चुकून आभार मानायला गेलो, तर प्रत्युत्तर म्हणून आपल्या पाठीत एक सणसणीत धपका मिळतो. 'जादा आगाऊपणा केलास तर याद राख' अशी धमकीही मिळते. तेव्हाच उभयपक्षी  जीव शांत होतात. नाहीतर मनामध्ये खूप वेळ आभाराच्या संवादाची उजळणी केली, तरी वास्तवात उलटंच होत असतं. खूप जवळच्या गहिऱ्या नात्यात शब्दांनी आभार मानताना उभयपक्षी अवघडलेपणा येतो. गहिरेपणा उणावून नसती औपचारिकता आल्यासारखी वाटते. 'यात नव्याने काय सांगायचं?', 'हे सांगायला विशिष्ट दिवसच हवा का?' किंवा 'हे तर सर्वथा माझ्या मनामध्ये असतंच की' असं वाटून शब्दांतली ताकद निघून जाते. मग एखादा स्पर्श, एखादा कटाक्ष हाही आभाराच्या पानभर भाषणाचं काम क्षणात करून टाकतो. ऑपरेशनच्या गुंगीमधून नुकता नुकता बाहेर येणारा रुग्ण डॉक्टरांचा हात घट्ट धरतो, परीक्षेत भलामोठा पराक्रम गाजवून आलेला गुणवंत विद्यार्थी गुरूंच्या पाया पडतो, तेव्हा ते त्याच्या पाठीवर थरथरत्या हाताने क्षणभर थोपटल्यासारखं करतात. तेव्हा त्या कृतीत आभारच सुचवले जातात. फरक एवढाच की ते रूढ 'आभारप्रदर्शन' नसतं. ह्या मनाने त्या मनाला दिलेली पोचपावती असते.

आयुष्यात बऱ्याच गोष्टी या संयुक्त व्यवहारातून होत असतात. लेखक आणि प्रकाशक, गायक-वादक, कलाकार-रसिक, दिग्दर्शक आणि नटमंडळी ही जोडीजोडीनेच कामं करत असतात, करणार असतात. व्यापाराचं, अर्थकारणाचं टोक कदाचित दोघांपैकी एखाद्याच्या हातात जास्त पक्कं असेल, तर हा व्यवहाराचा भाग झाला. अंतिम उत्पादन, कलाकृती उत्तम व्हायला हवी असेल, तर प्रत्येकाने आपापली भूमिका चोख बजवावी लागते. तो अलिखित नियम असतो. सहभागी झालेली मंडळी प्रौढ, समंजस असतील तर त्यांना याची स्पष्ट कल्पना असते. 'आमचा' सिनेमा, 'आपलं' पुस्तक, 'आमचं' नाटक असे शब्दप्रयोगही ते सर्रास करत असतात. तेव्हा चांगलं हस्तलिखित दिल्याबद्दल प्रकाशकानं लेखकाचे

आभार मानणं याची फारशी गरज नाही. लेखकाला एवढीच कृतज्ञता वाटली, तर तो पुढचं, याहून चांगलं हस्तलिखित त्याच प्रकाशकाला देऊ करेल. आपली निष्ठा कृतीनं सिद्ध करेल. दोघंही एकमेकांच्या उपकाराच्या ओझ्याखाली दबण्यापेक्षा नव्या जोमानं पुढच्या कामाला लागणं पसंत करतील.

पण हे सगळं कधी? पुढचं काम करायचं असलं तर! आभार मानणं, उपचार पाळणं एवढंच काम ज्यांना करायचं असतं त्यांनी ती चैन का करू नये? तशा चैनीचे दोन-तीन आविष्कारही मला बघायला मिळालेले आहेत. 'अतिपरिचयात अवज्ञा' म्हणतात तशी या आभार, धन्यवाद, अभिनंदन, शुभेच्छा वगैरे शब्दांची अलीकडे फार फरफट झालेली दिसते आणि कित्येक माणसं ते वापरताना गल्लत करतात. गेल्यासारखं समोरच्याचं काहीतरी मानून टाकायचं एवढं खरं. एका लग्नाच्या स्वागतसमारंभाला गेले होते, तर स्टेजवरच्या नवरदेवाला खालून येणारा मित्र गदागदा हलवून म्हणाला, 'थँक्स फॉर मॅरिंग हं. लग्न केल्याबद्दल मन:पूर्वक आभार?'

अशा वेळी फार वाटतं. भारनियमन खूप झालं, त्याविषयी खूप लिहून बोलून झालं. आता थोडं (आ) भारनियमन करायला लागूया. त्या शब्दांमधला जिव्हाळा आणि भावनांची ऊब संपेपर्यंत ते ताणायला नकोत. अति ताणल्याने मनं शुष्क व्हायला नकोत. सगळं घाईनं संपवायला नको.

नाही म्हणायला, त्यातल्या त्यात आभाराची काटकसर आपण कुठे करतो? तर एखादं काम पैसे देऊन करून घेतलेलं असतं तेव्हा. कारण का? तर आपण वट्ट पैसे मोजलेले असतात. मग वरती आभार मानायची गरज काय? डॉक्टर, वकील, आर्किटेक्ट्स हे आपल्या मते दाबून फिया घेतात. तेव्हा त्यांनी काम केलं तर विशेष काय झालं, असं आपल्याला वाटत असतं. आजच्या काळात हे कमालीचं गैर आहे. मोबदला घेणारा मनुष्य तरी इमानानं काम करेल याची आज काय हमी आहे? शस्त्रक्रियेची दाबून फी घेणाऱ्या तज्ज्ञाने आपल्या पोटातला हवा तोच (म्हणजे, खरा तर, नको तो) अवयव कापून काढला आणि वर चाकू-सुरी-कात्री खुणेसाठी आपल्या पोटात मागे ठेवली नाही तर त्याचे आठवणीने आभार मानायला नकोत? प्लंबर, इलेक्ट्रिशियन ही मंडळी सांगितलेल्या वेळीच घरी कामाला आली आणि त्यांनी जुनं काम करताना नवीन काम निर्माण करून ठेवलं नाही, तर त्याबद्दल त्यांची आरती ओवाळायला नको? इस्त्रीवाल्याने दिलेल्या तारखेला कपडे दिले, तर त्यांना घसघशीत पुष्पहार घालायला नको? बँकेमध्ये आपल्याच कष्टाच्या पैशातलं शंभर नोटांचं बंडल आपल्यासमोर मोजून, बरोब्बर शंभर नोटा पुरवणाऱ्या कारकुनांचे तर कृतज्ञतापूर्वक चौकाचौकांत पुतळे उभारावेत असं मला वाटतं. नाहीतर आपण ती नोटांची गड्डी मोजायला जाणार... त्रासणार... नेमके आपण सत्त्याऐंशी-अठ्ठ्याऐंशी किंवा एक्याण्णव-ब्याण्णववर आलो की आपल्या हातावर माशी बसणार...नाहीतर कानात खाज सुटणार... शेवटी आपल्या नव्याण्णव किंवा एकशे एक नोटा हातात आल्याचं मानून पुन्हा 'एकी एक... दुर्की दोन' सुरू करणार. एवढे पैसे मोजण्याचे कष्ट वाचवणाऱ्या त्या अश्राप जिवाला साधी आभाराचीही पावती नसावी अं? खऱ्याची दुनिया नाही हेच खरं!

कोणे एके काळी माझ्या एका अपत्याची टॉन्सिलची शस्त्रक्रिया झाली होती. अपत्य छोटं, शस्त्रक्रिया छोटी; पण आईच्या नजरेत मुलाचं कोणतंच ऑपरेशन किरकोळ असूच शकत नाही, तसंच माझं झालं होतं. पंधरा मिनिटांच्या शस्त्रक्रियेवर पंधरा दिवस आइस्क्रीमचा उतारा होता. आल्यागेल्या सर्वांना आइस्क्रीम! बिचाऱ्या डॉक्टरांचे निदान आभार तरी मानूया असा उदात्त विचार केला आणि शस्त्रक्रियेच्या दुसऱ्याच दिवशी त्या डॉक्टरांना सहज म्हणून, खुशाली कळवायला फोन केला. ते दवाखान्यात नव्हते. मी निरोप ठेवला. रात्री खूप उशिरा त्यांचा फोन आला. ''फोन का केला? सगळं ठीक आहे ना? तापबीप नाही ना आला पेशंटला? काही प्रॉब्लेम वाटतोय का? मी लगेच यायला हवंय का?''

ते बोलताना थांबेचनात. जरा श्वास घ्यायला थांबले, तेव्हा मी भसकन संवादात घुसत म्हटलं, ''तसं

काही नाहीये हो डॉक्टर... उलट आम्ही सगळे इतक्या एन्जॉय करतोय ना त्याच्या टॉन्सिल्स... सो वी थॉट, तुम्हांला थँक्स द्यावेत.''

''ओह्‌ नो... एवढ्यासाठी फोन कशाला करायचा? मी केवढा हादरलो होतो... पुन्हा असे फोन करत जाऊ नका हो. आम्हांला सवय नसते... नसतं टेन्शन येतं...'' ते खूप खरं बोलत होते, म्हणून मला त्यांचा राग आला नाही, दया आली. अशी ना तशी, आभाराच्या बाबतीत 'परी तू जागा चुकलासी' हीच आपली गत आहे म्हणायची.

आता थोडं (आ) भारनियमन करून काही सुधारणा करता आली तर बघू.

## स्वाध्याय

**प्र. १. काय घडते ते पाठाच्या आधारे लिहून वाक्य पूर्ण करा.**

(अ) आदर मनात तुडुंब भरून असल्यास ........................

(आ) खूप जवळच्या गहिऱ्या नात्यात शब्दांनी आभार मानल्यास ........................

(इ) मित्र-मैत्रिणीने आभार मानल्यास........................

(ई) लेखिकेच्या मते 'आ' भारनियमन केल्यास ........................

**प्र. २. पाठातील उदाहरणे शोधा.**

| | स्पर्शाने | कटाक्षाने |
|---|---|---|
| शब्दांशिवाय मानलेले आभार | | |

**प्र. ३. चूक की बरोबर ते ओळखा.**

(अ) आभार आणि अभिनंदन या शब्दांत माणसं अनेकदा गल्लत करतात.

(आ) भारतीय संस्कृतीत भावनांचे प्रदर्शन करणे आदर्श मानले जाते.

(इ) मनात आदर असेल तर तो कृतीत दिसतो.

(ई) आभार मानण्याचा अतिरेक चांगला नव्हे.

**प्र. ४. कारणे लिहा.**

**आकाशवाणीवरील आभारप्रदर्शनाची कारणे**

↓ ↓ ↓ ↓

**प्र. ५. पाठातील विनोद निर्माण करणारी वाक्ये शोधा.**

**प्र. ६. खाली दिलेल्या शब्दांसाठी मराठी भाषेतील शब्द लिहा.**

(१) कॅप्शन –

(२) टेन्शन –

(३) आर्किटेक्ट –

(४) ऑपरेशन –

**प्र. ७. खाली दिलेल्या शब्दांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) सुसंस्कृतपणाचा कडेलोट (२) घाऊक आभार

**प्र. ८. स्वमत.**

(अ) 'आभार मानणे', या शिष्टाचाराविषयीचे तुमचे मत लिहा.

(आ) पाठाच्या शीर्षकातून तुम्हांला समजलेला विनोद तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**उपक्रम :** दैनंदिन व्यवहारात शब्दांच्या रचनेमुळे निर्माण होणाऱ्या विनोदाची उदाहरणे शोधा व वर्गात त्याचे सादरीकरण करा.

## भाषाभ्यास

अक्षरगणवृत्ते यापूर्वी आपण पाहिली आहेत. आता आपण काही मात्रावृत्तांचा परिचय करून घेऊया.

**(१) दिंडी :** पहिल्या चरणात ९, दुसऱ्या चरणात १० मात्रा असतात. ३-२-२-२, ३-३-२-२ असे मात्रागणांचे गट पडतात. 'दिंडी' हे मराठीतील जुने वृत्त आहे.

उदा., घोष होता ग्यानबा तुकाराम
राऊळाची ही वाट सखाराम
करी भक्ती चित्तात नृत्यलीला
पहा दिंडी चालली पंढरीला
१ २ २ २ २ १ २ २ १ २ २
=९ =१०

**(२) आर्या :** आर्या हे देखील जुने वृत्त आहे. मोरोपंतांच्या आर्या प्रसिद्ध आहेत. आर्या वृत्तात ३० मात्रा असून १२+१८ असे गट पडतात.

उदा., सुश्लोक वामनाचा अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची
ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची
२२ २२२२ २२ २२ १२१२२२
=१२ =१८

चार चरण असतील तर पहिल्या आणि तिसऱ्या चरणात १२ मात्रा; दुसऱ्या आणि चौथ्या चरणात १८ मात्रा असतात.

# १४. आदर्शवादी मुळगावकर

**गोविंद तळवलकर** (१९२५-२०१७) : इंग्रजी व मराठीतले पत्रकार व लेखक. वृत्तपत्रीय अग्रलेखांकरिता विशेषत्वाने प्रसिद्ध असलेले ते एक स्तंभलेखक होते. 'अभिजात', 'अक्षय', 'ग्रंथ सांगाती', 'नियतीशी करार', 'परिक्रमा', 'मंथन', 'पुष्पांजली' (व्यक्तिचित्रे व मृत्युलेखसंग्रह) खंड १ व २, 'वैचारिक व्यासपीठे', 'व्यक्ती आणि वाङ्मय', 'सौरभ' (साहित्य आणि समीक्षा) खंड १ व २ इत्यादी साहित्य प्रसिद्ध.

श्री सुमंत मुळगावकर यांची कार्यपद्धती व कार्यकर्तृत्व याचा आढावा लेखकांनी प्रस्तुत लेखातून घेतला आहे. प्रस्तुत पाठ उद्योजक सुमंत मुळगावकर यांच्या अतुलनीय कार्याचा परिचय करून देणारा आहे. त्यांच्या गौरवार्थ मानवंदना देण्यासाठी लिहिलेला हा अग्रलेख आहे.

वृत्तपत्र केवळ बातम्या पुरवत नाही, तर सत्यशोधनाची व विश्लेषणाची संपूर्ण जबाबदारी त्या वृत्तपत्राच्या संपादकाची असते. ''फॅक्ट्स आर सेकेंड बट कॉमेंट्स आर फ्री'' या पॉल स्कॉट यांच्या सुप्रसिद्ध वचनानुसार घटनेवरील भाष्याचे स्वातंत्र्य संपादकाला अग्रलेखात घेता येते, म्हणूनच वृत्तपत्रातील अग्रलेख म्हणजे वृत्तपत्राच्या संपादकाने होऊन गेलेल्या बातमीवर अथवा घडामोडीवर केलेले परखड भाष्य होय. चालू घडामोडींचे ठळक वैशिष्ट्य हे रोजच्या अग्रलेखाचे विषय ठरतात. बहुश्रुतता, चिकित्सक विचार व निरीक्षणशक्तीचा कस लागतो. (१) चालू घडामोडीतील विशिष्ट घटना (२) राजकीय अग्रलेख (३) राजकीय, सामाजिक स्थित्यंतरे (४) एखाद्या व्यक्तीच्या कार्याचा गौरव (५) प्रसिद्ध व्यक्तीचे निधन अशा विषयांवर प्रसंगोचित अग्रलेख लिहिले जातात.

समाजमनावर ज्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सखोल ठसा उमटलेला असतो, अशा व्यक्तींच्या निधनानंतर समाजमनही हेलावते. अशा व्यक्तींच्याबाबत मृत्युलेख लिहून त्यांना, त्यांच्या समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाला संपादक अग्रलेखाच्या रूपाने मानवंदना देतात. त्या व्यक्तीच्या गौरवार्थ, सन्मानार्थ व मुख्यत: त्याच्या कर्तृत्वाचा, चरित्राचा, कार्याचा परिचय सामान्यांपर्यंत पोहोचवणे हा अग्रलेख लेखनाचा उद्देश असतो.



आदर्शवाद हे श्री. सुमंत मुळगावकर यांचे ध्येय होते आणि त्याबाबत ते तडजोड करत नसत. टेल्कोचा कारखाना आणि त्याचे उत्पादन हे याचे उत्तम उदाहरण. मुळगावकर यांच्या निधनाने या देशाच्या कारखानदारीच्या क्षेत्रातील एक सचोटीचा व अत्यंत कार्यक्षम असा सद्‌गृहस्थ हरपला. आदर्श, सचोटी, सज्जनपणा आणि कार्यक्षमता हे सर्व आजच्या काळात व वातावरणात टिकवणे अत्यंत कठीण आहे; पण मुळगावकर यांनी हे साध्य करून दाखवले. शास्त्र विषयाची पदवी घेतल्यावर त्यांनी लंडन येथे स्थापत्य विषयाची पदवी घेतली. तेथे पुस्तकी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष कारखान्यात काम करावे लागत असे व मगच पदवी मिळे.

मुळगावकर पदवी मिळवून परत आले तेव्हा मंदीची लाट होती. काही ठिकाणी प्रयत्न केल्यावर, मध्यप्रदेशात कटणी येथे त्यांना सिमेंट कारखान्यात काम मिळाले; पण पहिले सहा महिने विनावेतन काम करावे लागले, नंतर अगदी अल्प वेतनावर त्यांनी काम केले. युद्ध आले आणि मग येथे सिमेंटचे अधिक कारखाने उभे करणे निकडीचे बनले. ही जबाबदारी मुळगावकरांवर आली. ए. सी. सी. ची स्थापना झाली होती आणि मुळगावकरांनी उभारलेले कारखाने सुरू झाले; पण युद्धकाळातच तेव्हाच्या सरकारने तंत्रज्ञांचे एक मंडळ युरोप, अमेरिकेस धाडले. श्री. जे. आर. डी. टाटा आणि मुळगावकर त्यात होते. विटा एकमेकांना जोडण्याचा 'डिंक' म्हणजे सिमेंट, किती दिवस तयार करत राहणार? असे टाटांनी मुळगावकर

यांना विचारले आणि टाटा कंपनीत येण्याची सूचना केली. काही वर्षांनी मुळगावकर यांनी ती सूचना मानली आणि जमशेटपूर येथे त्यांनी कामाला सुरुवात केली. सुदैवाने मर्सिडिज-बेन्झ या नामवंत जर्मन कंपनीने तांत्रिक साहाय्य करण्याचे ठरवले आणि मग टेल्को मालमोटारी तयार करू लागली. थोड्याच दिवसांत देशी बनावटीची मालमोटार तयार व्हावयास हवी, ही सरकारची अट होती. ती पुरी करण्यात मुळगावकर यशस्वी झाले. जर्मनांना मालाच्या दर्जाबाबत कोणतीही कमतरता चालणार नव्हती. हे तर मुळगावकर यांनाही हवे होते. यामुळे टेल्कोच्या मालमोटारी पहिल्या दर्जाच्या तयार झाल्या आणि त्यात सतत सुधारणा होत गेली. कोणताही कारखाना सुनियंत्रित ठेवायचा असेल, तर त्याचा व्याप किती असावा, याचे मुळगावकरांचे गणित होते. यामुळे जमशेटपूर येथील कारखाना अवाढव्य वाढवून तो हाताबाहेर जाणार नाही, यावर कटाक्ष ठेवण्यात आला आणि पुणे येथे टेल्कोचा कारखाना स्थापन करण्याचे ठरले.

आज टेल्कोचा पुण्यातील कारखाना हा उत्पादन व व्यवस्थापन या दोन्ही दृष्टींनी पहिल्या दर्जाचा आहे. त्याच्या श्रेयाचे मानकरी मुळगावकर आहेत. युद्धकाळात व नंतर मुळगावकर यांच्या अनुभवास हे आले होते, की पहिल्या प्रतीचे तंत्रज्ञ, सुटे भाग आणि उत्पादनात सतत सुधारणा करण्यासाठी संशोधन विभाग याची आपल्याकडे नेहमीच कमतरता असते आणि हेळसांडही होते, म्हणून पुण्यात जेव्हा मुळगावकर यांनी टेल्कोचा कारखाना उभारण्याचे ठरवले, तेव्हा त्यांनी सर्वप्रथम महत्त्व दिले, ते सर्व थरांतील तंत्रज्ञ कंपनीने शिकवून तयार करण्यास. त्याचप्रमाणे त्यांनी संशोधन विभाग स्थापन केला आणि सुटे भाग तयार करण्याची व्यवस्था केली. यामुळे असे दिसले, की पुण्याचा कारखाना १९६६ साली स्थापन झाल्यावर साधारणत: बारा वर्षे मालमोटारीचे उत्पादन करत नव्हता. कोणत्याही कंपनीच्या संचालकांना हे अवघड वाटणारे होते; पण जे. आर. डी. टाटा यांना याचे रहस्य माहीत होते. ते म्हणत, की मुळगावकरांना कारखाना उभा करायचा नसून एक उद्योग स्थापन करायचा आहे. कारखाना व उद्योग यांतील तफावत टाटा जाणत होते आणि म्हणून मुळगावकर यांना हा एक आदर्श उद्योग उभा करता आला. मुळगावकर हे अतिशय सौम्य प्रवृत्तीचे गृहस्थ. ते मोजके बोलणारे आणि जसे देखणे तसेच टापटिपीचे. टेल्कोसारखा स्वच्छ कारखाना पाहताना आपण कारखान्यात आहोत असे वाटत नाही. आपल्या सर्व दर्जांच्या व्यवस्थापकांनी रोज कारखान्यात फेरी मारलीच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता आणि टेल्कोत ही परंपराच पडली आहे. कारखान्याचे अध्यक्षच कामगारांत मिसळत असल्याने इतर अधिकारीही मिसळतात आणि विचारांची देवाण-घेवाण होते. मुळगावकर यांची आणखी एक सवय होती. ते दौऱ्यावर असताना टेल्कोची मालमोटार दिसल्यास ती थांबवून ते ड्रायव्हरशी बोलत आणि मोटार कशी चालते, अडचणी काय येतात इत्यादी चौकशी करत.

केवळ एक व्यवसाय म्हणून मुळगावकर आपल्या कामाचा विचार करत नव्हते. त्यावर त्यांची श्रद्धा होती. त्याचा त्यांना ध्यास होता आणि आपण जो माल काढतो तो अधिकाधिक सरस व्हावा, यावर कटाक्ष असल्याने त्यांनी संशोधन विभागावर लक्ष केंद्रित केले होते. त्यांनी तंत्रज्ञ शिकवून तयार करणे, हे आपले कर्तव्य मानले होते. मोटारीच्या व्यवसायास त्यांनी दिलेली ही फार मोठी देणगी आहे. देशातल्या या व्यवसायात त्यांचे स्थान सल्लागार व मित्र असे होते. कारखाना आदर्श ठेवायचा, तर काही निर्णय कठोरपणे घ्यावे लागतात. सौम्य प्रवृत्तीचे मुळगावकर तसा तो घेत, कारण आपल्या कारखान्याची प्रतिष्ठा कशात आहे, एवढाच विचार करून ते निर्णय घेत असत. यामुळे कठोर निर्णय घेणे सोपे जाते, असे ते म्हणत.

मुळगावकर यांना त्यांच्या पत्नी श्रीमती लीलाबाई यांची उत्तम साथ होती आणि लीलाबाईंच्या सामाजिक सेवेच्या कामात मुळगावकर सहभागी असत. कोयना भूकंप असो वा दुष्काळ, अशा वेळी लीलाबाई जीव तोडून काम करत, त्यास मुळगावकर यांची साथ होती. टेल्कोच्या कारखान्याच्या

परिसरातील काही खेड्यांत शेतीसुधारणा, शिक्षण, आरोग्य या संबंधांत गाजावाजा न होता काही वर्षे काम चालू आहे. यामागे मुळगावकर यांची प्रेरणा होती. एक काळ शिकारी असलेल्या मुळगावकरांनी शिकार सोडली आणि कॅमेरा स्वीकारला. छायाचित्रण हा त्यांचा छंद होता आणि त्यांनी काढलेल्या उत्कृष्ट छायाचित्रांचे प्रदर्शनही होऊ शकते. त्यांचा दुसरा छंद झाडे लावण्याचा. पुण्यात कारखाना स्थापन करतानाच त्यांनी लाखएक झाडे लावली आणि यामुळे आज हा परिसर नयनमनोहर झाला आहे. एवढी झाडी असल्यामुळे असंख्य पक्षी येत असतात. टेल्कोने एक वृक्षपेढी स्थापन केली आहे. त्यामधून लाखांवर झाडे वाटली गेली. मुळगावकर यांची ही सामाजिक दृष्टी वाखाणण्यासारखी होती. एक चिनी म्हण अशी आहे, की तुम्हांला तीस वर्षांची योजना आखायची असेल, तर झाडे लावा आणि शंभर वर्षांची योजना करायची असेल, तर माणसे तयार करा. मुळगावकरांनी हे दोन्ही केले. मुळगावकरांचे जीवन समाधानी व कृतार्थ होते.

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य उदाहरण लिहा.**

(१) मुळगावकर यांचा आदर्शवाद

(२) मुळगावकर यांची सामाजिक दृष्टी

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**

मुळगावकर यांचे गुणविशेष

मुळगावकर यांची कर्तव्यदक्षता

**प्र. ३. खाली काही उदाहरणे दिली आहेत. या उदाहरणांवरून मुळगावकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे तुम्हांला जाणवलेले पैलू लिहा.**

(अ) मुळगावकरांनी केलेले सामाजिक कार्य.

(आ) आदर्श कारखान्यासाठी मुळगावकरांनी घेतलेले निर्णय.

**प्र. ४. वैशिष्ट्ये लिहा.**

(अ) लंडन येथील स्थापत्य विषयाची पदवी-

(आ) टेल्कोचा पुण्यातील कारखाना-

(इ) टेल्कोची परंपरा-

(ई) टेल्कोची मालमोटार-

**प्र. ५. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून, अर्थ न बदलता वाक्य पुन्हा लिहा.**

(अ) मुळगावकर अबोल प्रवृत्तीचे होते.

(आ) मुळगावकर पदवी घेऊन आले, तेव्हा भारतात मंदीची लाट होती.

(इ) मुळगावकरांचे जीवन असमाधानी नव्हते.

**प्र. ६. अधोरेखित केलेल्या अर्थाचा वाक्प्रचार पाठातून शोधून लिहा.**

(अ) प्रकृतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे यश वारंवार आजारी पडत होता.

(आ) शेतीत खूप कष्ट केल्यामुळे यावर्षी रामरावांच्या कष्टाला चांगले फळ मिळाले.

(इ) आवाक्याबाहेरचे काम समीरने सन्मार्गाने पूर्ण केले.

(ई) स्वत:च्या तत्त्वांशी समझोता करणे योग्य नव्हे.

**प्र. ७. स्वमत.**

(अ) पाठात उल्लेख असलेल्या चिनी म्हणीतील विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(आ) टेल्कोच्या मालमोटारीच्या ड्रायव्हरशी संवाद साधण्यामागे मुळगावकरांचे कोणते हेतू असावेत, असे तुम्हांस वाटते?

**उपक्रम :** तुमच्या परिसरातील लघुउद्योजकांची मुलाखत घ्या.

FHJ01T

## भाषाभ्यास

### ऱ्हस्व दीर्घ लेखनाबाबतचे नियम :

- **खालील शब्द वाचा.**

  कुस्ती, मुक्काम, पुष्कळ, शिस्त, दुष्काळ, पुस्तक, चिठ्ठी, डुक्कर, बिल्ला, चिक्की.

  वरील प्रत्येक उदाहरणात एक जोडाक्षर आहे. या जोडाक्षरयुक्त अक्षरापूर्वीच्या अक्षराचे नीट निरीक्षण करा. काय आढळले? या अक्षरांतील उकार, इकार हे ऱ्हस्व आहेत.

  **मराठी शब्दांत जोडाक्षर असल्यास जोडाक्षरापूर्वीचे इकार, उकार, सामान्यत: ऱ्हस्व असतात.**

  **लक्षात ठेवा :** तत्सम शब्दांतील जोडाक्षरापूर्वीचे इकार व उकार ऱ्हस्व व दीर्घ अशा दोन्ही प्रकारचे आढळतात. उदा., पुण्य, तीक्ष्ण, पूज्य

  **वर दिलेल्या वर्णनानुसार किमान दहा शब्द लिहा.**

- **खालील शब्द वाचा.**

  चिंच, लिंबू, बिंदू, तुरुंग, उंच, लिंग, अरविंद, अरुंधती, दिंडी, पिंड, किंकाळी, चिंता, पिंड, पुरचुंडी, पुंगी, धुंद, चिंधी

  वरील शब्द अनुस्वारयुक्त आहेत. यांतील अनुस्वारयुक्त अक्षराकडे नीट पाहिल्यास काय जाणवते? शब्द मराठी असो वा तत्सम. अनुस्वारयुक्त अक्षरे ऱ्हस्व आहेत.

  **मराठी व तत्सम शब्दांतील इकारयुक्त व उकारयुक्त अक्षरांवर अनुस्वार असल्यास सामान्यत: ती ऱ्हस्व असतात, म्हणजेच ह्या अनुस्वारयुक्त अक्षरातील इकार, उकार ऱ्हस्व असतात.**

  **वर दिलेल्या वर्णनानुसार किमान दहा शब्द लिहा.**

# १५. निरोप

**पद्मा गोळे** (१९१३-१९९८) : प्रसिद्ध कवयित्री. 'नीहार', 'स्वप्नजा', 'प्रीतिपथावर', 'आकाशवेडी', 'श्रावणमेघ' इत्यादी कवितासंग्रह; 'नवी जाणीव', 'रायगडावरील एक रात्र', 'स्वप्न' इत्यादी नाटिका; 'वाळवंटातील वाट' ही कादंबरी प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत रणांगणावर जाणाऱ्या आपल्या मुलाविषयीच्या आईच्या अंत:करणातील विविध भावनांचे चित्रण कवयित्रीने केले आहे.



बाळ, चाललास रणा
घरा बांधिते तोरण
पंचप्राणांच्या ज्योतींनी
तुज करिते औक्षण.

याच विक्रमी बाहूंनी
स्वतंत्रता राखायची,
खांद्यावरी या विसावे
शांति उद्याच्या जगाची.

म्हणूनिया माझ्या डोळा
नाही थेंबही दु:खाचा;
मीहि महाराष्ट्रकन्या
धर्म जाणते वीराचा.

नाही एकहि हुंदका
मुखावाटे काढणार.
मीच लावुनि ठेविली
तुझ्या तलवारीला धार.



अशुभाची साउलीहि
नाही पडणार येथे;
अरे मीहि सांगते ना
जिजा-लक्ष्मींशी नाते.

तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना
शक्ति देईल भवानी,
शिवरायाचे स्वरूप
आठवावे रणांगणी.

धन्य करी माझी कूस
येई विजयी होऊन,
पुन्हा माझिया हाताने
दूधभात भरवीन!

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय निवडा व विधान पुन्हा लिहा.**

(अ) कवितेतील आई आपल्या मुलाला औक्षण करत आहे, कारण ........................

(१) मुलाचा वाढदिवस आहे.
(२) तो रणांगणावर जाणार आहे.
(३) त्याने रणांगणावर शौर्य गाजवले आहे.
(४) त्याने क्रीडास्पर्धेत नैपुण्य प्राप्त केले आहे.

**प्र. २. खालील शब्दांतून सूचित होणारा अर्थ लिहा.**

(अ) अशुभाची साऊली (आ) पंचप्राणाच्या ज्योतींनी औक्षण

**प्र. ३. कवितेच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचा विषय | कवितेतील पात्रे | कवितेत उल्लेख आलेल्या थोर व्यक्ती | आईने व्यक्त केलेली इच्छा |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. ४. काव्यसौंदर्य.**

(अ) 'तुझ्या शस्त्रांना, अस्त्रांना शक्ति देईल भवानी, शिवरायाचे स्वरूप आठवावे रणांगणी', या काव्यपंक्तीतून व्यक्त होणारा अर्थ स्पष्ट करा.

(आ) 'धन्य करी माझी कूस, येई विजयी होऊन, पुन्हा माझिया हाताने दूधभात भरवीन', या काव्यपंक्तीतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(अ) कवितेतील वीर मातेच्या भावना तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) 'भारतभू ही वीरांची भूमी आहे', याबाबत तुमचे मत लिहा.

**उपक्रम :** सैन्यात भरती झालेल्या मुलाच्या आईची मुलाखत घेण्यासाठी प्रश्न तयार करा.

FHTL3G

### भाषा सौंदर्य

मुलींची कन्याशाळा, केसांची हेअरस्टाइल, ठंडा कोल्ड्रिंक, वटवृक्षाच्या झाडाखाली, शब्दाखाली अधोरेखित, हाय वे रोड, रायटिंगमध्ये लिहून द्या, शेवटी एन्ड मस्त केलाय, पिवळा पितांबर.

शब्दांच्या या रचनेची ही गंमत पाहा. खरं म्हणजे भाषिकदृष्ट्या व अर्थाच्या दृष्टीने ही रचना चुकीची आहे; परंतु आपण बोलताना सहजगत्या अशा चुका वारंवार करतो. इतर भाषांच्या प्रभावामुळे हे असे घडत असले, तरी बोलण्यातील भाषिक चुका आपण लक्षात घ्यायलाच हव्यात. आमच्या घरी वर्तमानपत्र दररोज येते अशा वक्तव्याला एखादी मुलगी सहजपणे आमच्याही घरी मासिक/साप्ताहिक रोज येते, असे म्हणते तेव्हा नक्कीच हशा पिकणार.

अशा विविध रचनांतील चुका लक्षात घेऊन टाळण्याची सवय आपण आपल्याला लावून घेतली तर सुयोग्य भाषिक रचनेचा वापर आपण बोलताना करू शकतो.

# भाषाशुद्धी आणि सावरकर

भाषासमृद्धीचा अत्यंत महत्त्वाचा व प्रभावी स्रोत म्हणजे त्या भाषेतील शब्दसंपत्ती होय. भाषासमृद्धीसाठी नेहमीच विविध स्तरांवर प्रयत्न होतात. त्यामध्ये स्वातंत्र्यपूर्वकाळात झालेल्या भाषाशुद्धीच्या चळवळीचे आद्य प्रणेते होते स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर!

भाषेमध्ये विविध शब्दांची भर पडते, ती इतर भाषांतील शब्द व समाजाच्या बदलत्या रूपातून आलेल्या शब्दांची! पण स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीतून अस्सल मराठी मातीचा वास असलेले अर्थवाही असे मराठी शब्द आपल्या स्वतंत्र प्रतिभेने आपणांस दिले आहेत. मराठी भाषेत परकीय भाषांतून आलेल्या अनावश्यक शब्दांच्या जागी सावरकरांनी मराठी शब्द रुळवण्याचा व रुजवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्यासाठी सावरकरांनी पुढील मार्गांचा अवलंब केला.

(१) मराठी भाषेत इतर भाषांतून आलेल्या शब्दांचे मराठीकरण करून.

(२) मराठी भाषेत आलेल्या परकीय शब्दांना मराठीतच असलेल्या पर्यायी पण मृतप्राय झालेल्या शब्दांचे पुनरुज्जीवन करून.

(३) संस्कृत वा अन्य भारतीय भाषांतून मराठीत सुगम शब्द रुळवून.

(४) सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मराठीत आलेल्या परकीय शब्दांना स्वत:च्या प्रतिभेने स्वत: तयार केलेले प्रतिशब्द देऊन मराठी भाषा समृद्ध करण्यात सावरकरांचा मोलाचा वाटा आहे.

भाषाशुद्धी चळवळीच्या प्रभावी प्रचारामुळे अन्य काही कवी वा लेखक हे सुद्धा भाषाशुद्धी चळवळीचे समर्थक झाले व त्यांनी आवर्जून परकीय शब्दांच्या जागी मराठी प्रतिशब्द उपयोगात आणण्यास सुरुवात केली. माधवराव पटवर्धनांसारखे कवी भाषाशुद्धीचे समर्थक झाले. या चळवळीमुळे प्रभावित होऊन अर्थवाही छटा असणारे प्रतिशब्द बरेच जण हिरिरीने निर्माण करू लागले. उदा., स्वातंत्र्यवीर सावरकरांचे थोरले बंधू बाबाराव सावरकर यांनी मराठी भाषेत रूढ असलेल्या 'नंबर' या इंग्रजी शब्दाला 'क्रमांक' हा सुंदर शब्द सुचवला. 'रेकॉर्ड' या मराठीत रूढ होण्यास सुरुवात झालेल्या शब्दाचा 'उच्चांक' हा प्रतिशब्द सावरकरांनी दिला. 'डेट अथवा तारीख' या दोन्ही परभाषा शब्दांना 'दिनांक' हा अर्थपूर्ण मराठी शब्द स्वा. सावरकरांनी स्वत:च निर्मिला आणि सतत उपयोगात आणून मराठी भाषेत रुळवला व रुजवला. हे आणि असे अनेक प्रतिशब्द सावरकरांनी मराठी भाषेला दिले. असे प्रतिशब्द उपयोगात आणत आपोआप अर्थाच्या छटेसह प्रचलित होत जातील असा सावरकरांचा आग्रह असे आणि ते तसे प्रतिशब्द प्रत्यक्षात मराठीत रुळल्याचे आज आपण पाहत आहोत.

'मराठी भाषेचे शुद्धीकरण आणि पर्यायी शब्दकोश' व 'भाषा शुद्धी व लिपिसुधारणा–लेख' या ग्रंथांतून मराठी भाषाशुद्धी चळवळीची माहिती व तत्संबंधी सावरकरांचे विचार समाविष्ट आहेत. देवनागरी लिपीची सुधारणा हाही सावरकरांच्या या चळवळीचा भाग होता. इतर वर्णाक्षरांप्रमाणेच 'अ'ची बाराखडी वापरून लिपीतील सहा अक्षरे कमी करणे, सर्व अक्षरे कानायुक्त करणे इत्यादी लिपिसुधारणेच्या काही सूचना. ही यादी मराठी भाषा समृद्धीबरोबरच विद्यार्थ्यांना भाषा समृद्ध करण्यास उपयुक्त ठरेल. भाषातज्ज्ञ सावरकरांनी मराठी भाषेला दिलेले शब्द–

दिनांक (तारीख), बोलपट (टॉकी), वेशभूषा (कॉश्च्युम), दिग्दर्शक (डायरेक्टर), चित्रपट (सिनेमा), मध्यंतर (इंटर्व्हल), उपस्थित (हजर), प्रतिवृत्त (रिपोर्ट), नगरपालिका (म्युन्सिपाल्टी), महापालिका (कॉर्पोरेशन), महापौर (मेयर), पर्यवेक्षक (सुपरवायझर), विश्वस्त (ट्रस्टी), त्वरित (अर्जंट), गणसंख्या (कोरम), स्तंभ (कॉलम), मूल्य (किंमत), शुल्क (फी), हुतात्मा (शहीद), निर्बंध (कायदा), शिरगणती (खानेसुमारी), विशेषांक (खास अंक), सार्वमत (प्लेबिसाइट), नभोवाणी (रेडिओ), दूरदर्शन (टेलिव्हिजन), दूरध्वनी (टेलिफोन), ध्वनिक्षेपक (लाऊडस्पीकर), विधिमंडळ (असेंब्ली), अर्थसंकल्प (बजेट), क्रीडांगण (ग्राउंड), प्राचार्य (प्रिन्सिपॉल), प्राध्यापक (प्रोफेसर), परीक्षक (एक्झामिनर), शस्त्रसंधी (सिसफायर), टपाल (पोस्ट), तारण (मॉर्गेज), संचलन (परेड), नेतृत्व (लीडरशिप), सेवानिवृत्त (रिटायर), वेतन (पगार) इत्यादी.

वरील लेखनासाठी बाबाराव सावरकर यांच्याबरोबर या भाषिक कार्यात सहभागी असलेल्या मा. चंद्रशेखर साने यांनी सहकार्य केले आहे, त्याबद्दल साने यांना धन्यवाद.

## ❁ 'बिग ५'च्या सहवासात (स्थूलवाचन)

**जयप्रकाश प्रधान** (१९५१) : प्रसिद्ध लेखक. 'ऑफबीट भटकंती' (भाग १), 'ऑफबीट भटकंती' (भाग २), 'ऑफबीट भटकंती' (भाग ३), 'अनोखी सफर', 'बातमी मागची बातमी' (बातम्या मिळविण्यामागचं रंजक नाट्य) इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. ऑफबीट भटकंती यांवर त्यांचे दृकश्राव्य कार्यक्रमही सादर होतात.

आफ्रिकेतील 'बिग ५' प्राण्यांची विविध वैशिष्ट्ये लेखकाने पाठातून व्यक्त केली आहेत. केनयाच्या अर्थव्यवस्थेविषयीची पाठात आलेली माहिती अत्यंत रंजक आहे. प्रस्तुत पाठ हा 'ऑफबीट भटकंती' भाग १ या पुस्तकांतून घेतला आहे.

जंगलांचा फेरफटका मारणं, त्यातील दुर्मीळ जनावरांचा शोध घेणं, त्यांची माहिती मिळवणं यात एक निराळंच 'थ्रिल' असतं. काही वर्षांपूर्वी दक्षिण आफ्रिकेतील 'क्रुगर नॅशनल पार्क'मधील तीन दिवसांच्या मुक्कामात याचा अनुभव घेतला होता. त्यामुळेच या वेळेस केनया व झिंबाब्वे इथल्या विविध पार्क्स (इथे जंगलांना पार्क म्हणतात) मध्ये मनसोक्त फिरायचे, 'बिग ५' प्राण्यांना जास्तीत जास्त जवळून पाहायचं यासाठी जवळजवळ बारा-तेरा दिवसांची सहल आयोजित करून घेतली. त्यामुळे आम्हांला 'जंगल लाइफ' खूप जवळून पाहता व अनुभवता आलं.

जंगल म्हटलं म्हणजे आपल्याकडचं जे चित्र समोर येतं, ते म्हणजे घनदाट झाडी व त्यात लपलेली जनावरं; पण आफ्रिकेत जंगलांचं स्वरूप निरनिराळं आहे. काही ठिकाणी उंच, घनदाट झाडांचं जंगल आहे, तर बऱ्याच ठिकाणी झुडपांचं व सुकलेल्या गवतांचं. ही झुडपं किंवा गवतही कमरेपेक्षा जास्त उंचीचं असू शकतं. पण घनदाट झाडीपेक्षा या झुडपांत किंवा गवतात जनावरांचा शोध घेणं त्यामानाने सोपं जातं. अर्थात जंगलांत फिरताना 'चिकाटी' आणि 'नशीब' या दोन बाबी फार महत्त्वाच्या असतात. चार-चार दिवस भटकंती करूनसुद्धा दुर्मीळ जनावरं दृष्टीसही पडत नाहीत; पण एखादा दिवस असा उजाडतो, की सिंह, लेपर्ड, चित्ता, पांढरा गेंडा या सर्वांचंच अगदी जवळून दर्शन होतं. त्यांच्या बारीकसारीक हालचाली पाहता येतात. कॅमेऱ्यात टिपता येतात. जणू साऱ्या श्रमाचं चीज होतं. तो क्षण अक्षरश: अत्यानंदाचा असतो.

केनयाच्या नैरोबी विमानतळावर उतरल्यानंतर 'आफ्रिकन क्वेस्टर' कंपनीच्या प्रतिनिधीनं 'जँबो' (म्हणजे हॅलो) म्हणत आमचं स्वागत केलं. आम्हीही त्याला 'मसुरी' (फाइन) असं प्रत्युत्तर दिलं. या सफरीत आम्ही माउंट केनया, सांबारू, ॲबरडटस्, लेक नकुरू व मसाईमारा इथल्या पार्कमध्ये फिरणार होतो. पहिला मुक्काम होता माउंट सफारी क्लबमध्ये. नयनरम्य परिसर व माउंट केनयाच्या उतारावर तो असून, ५, १९९ मीटर्स उंचीवरील माउंट केनयाचं शिखर इथून दिसतं. ते शिखर सर करणं ही सर्वच गिर्यारोहकांची इच्छा असते. ग्लेशिअर्स, रानटी हत्ती, म्हशी यांचे अडथळे पार करून त्यात यशस्वी होणारे धाडसी पर्यटकही मोठ्या प्रमाणात आढळून येतात. केनया सफारीत रोज सकाळ - संध्याकाळ प्रत्येकी सुमारे चार-पाच तासांचा गेम ड्राइव्ह (जंगलातील भटकंती) करण्याचा कार्यक्रम होता. संपूर्ण प्रवासासाठी इथे चांगल्या मजबूत मॅटॅडोर गाड्या उपलब्ध होत्या. थोडे जास्त पैसे मोजले तर फोरव्हीलर्सचीही व्यवस्था होती. जंगलातील खराब व अरुंद रस्त्यांवर त्यामुळे प्रवास बराच सुकर होतो. जंगलांत फिरताना या मोटारीचं छप्पर उघडण्यात येतं. त्या छपरातून जनावरांना अगदी जवळून पाहून त्यांचे मनसोक्त फोटोही काढता येतात. तसंच या प्रत्येक मोटारीत एक वायरलेस सेट असतो. त्यामुळे जंगलात फिरणाऱ्या सर्व वाहनांचा एकमेकांशी संपर्क राहतो. आणीबाणीच्या प्रसंगी तर त्याचा उपयोग होतोच पण कुठे काय जनावरं आहेत, तिथे लगेच जा - अशा प्रकारच्या सूचनाही एकमेकांना देता येतात.

माऊंट केनयावरून आम्ही वासोनैरो नदीच्या किनारी वसलेल्या 'सरोवा साभा लॉज'मध्ये पोचलो. या

वासोनैरो नदीला दोन महिन्यांपूर्वी महापूर आला होता. त्यात अनेक लॉजेस अक्षरश: वाहून गेली; पण त्यातून हे सरोवा लॉज बचावलं. या लॉजची रचना मोठी आकर्षक वाटली. जणू झाडावर उभारलेली पंचतारांकित झोपडी. या लॉजच्या समोरून जी वासोनैरो नदी वाहते तिचं वैशिष्ट्य म्हणजे त्यातील शेकडो मगरी. पुराच्या वेळेस या मगरी चिखलात लपून बसल्या आणि पाणी ओसरल्यानंतर परत बाहेर आल्या. किनाऱ्याच्या बाजूला निदान सहा फूट लांबीच्या अनेक अजस्र मगरी पडलेल्या दिसून येतात. इथे दुसऱ्या किनाऱ्यावर स्थानिक आदिवासींची वस्ती आहे. ते आदिवासी या मगरींची नजर चुकवून किनाऱ्याच्या कडेकडेने नदी ओलांडण्याचे धाडस पत्करतात; पण कधीकधी मोठा बाका प्रसंग उद्‌भवतो. सुस्त वाटणारी मगर एकदम चपळ बनून नदी ओलांडणाऱ्याला तोंडात पकडते. असा भयानक प्रसंग वर्षातून एखादं वेळेस दिसतो, असं तिथल्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी सांगितलं.

समुद्रसपाटीपासून सुमारे सात हजार फूट उंचावर असलेला व ७६७ चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा 'अॅबरडट्स नॅशनल पार्क' हा घनदाट जंगलासाठी प्रसिद्ध.त्यामुळे तिथे मोठ्या जनावरांचं दर्शन तसं दुर्मीळ आहे. यासाठी इथून थोड्या उंचावर जंगलात आर्क लॉज उभारण्यात आलं आहे. तिथे संपूर्ण लाकडाच्या खोल्या असून, त्याच्या सभोवताली पाण्याचं मोठं डबकं आहे. तिथे अनेक जनावरं पाणी पिण्यासाठी येतात, तसेच त्याच्या जवळ प्रचंड दलदल असून त्यात निराळ्या प्रकारचं खनिजयुक्त मीठ मोठ्या प्रमाणात मिसळण्यात येतं. ते जनावरांना आकर्षित करायला उपयुक्त ठरतं. या लॉजला बाहेरच्या बाजूला काचेच्या व उघड्या गॅलरीज असून , तिथून जनावरांचं दर्शन होतं व फोटोही काढता येतात. पर्यटकांसाठी इथे आणखी एक चांगली सोय करण्यात आली आहे. रात्रभर बाहेरच्या बाजूला फोकस लाइट असतात. गॅलरीतला बार चोवीस तास उघडा असतो; पण तुम्ही तुमच्या खोलीत झोपला आहात व दुर्मीळ जनावर पाणी पिण्यासाठी आलं तर तुम्हांला उठवण्यासाठी बेलची व्यवस्था करण्यात आली आहे. एकदा बेल वाजली तर हत्ती आले आहेत, दोन वेळा वाजली तर ऱ्हायनो, तीनवेळा लेपर्ड व चार वेळा बेल वाजली तर काहीतरी आगळं-वेगळं दृश्य आहे असं समजायचं. मात्र या डबक्यात एप्रिल-मे महिन्यांत केवळ एकदाच लेपर्ड आल्याची नोंद होती. हत्ती, जंगली म्हशी, हरणे आदींचा संचार मात्र मुक्तपणे होता. हत्ती व दुर्मीळ गेंड्यांचा वावर गॅलरीतून मस्त पाहता आला. अर्थात एप्रिल-मे महिन्यात इथे पाऊस चांगला पडतो. ठिकठिकाणी पाणी साचतं, झाडं हिरवीगार होतात. त्यामुळे जनावरांना पाण्यासाठी, खाद्यासाठी फार लांब जावं लागत नाही.

गुलाबी रंगाच्या व निदान दीड ते दोन लाख फ्लेमिंगोंचं वास्तव्य असलेला नकुरू तलाव व त्याच्या आजूबाजूचा पार्क हा संपूर्ण आफ्रिकेतील महत्त्वाच्या व दुर्मीळ पक्ष्यांचा परिसर म्हणून ओळखला जातो. या तलावाच्या किनाऱ्याला, फ्लेमिंगो पक्ष्यांची गुलाबी किनार अगदी लांबपर्यंत पसरलेली दिसते. त्यांच्याजवळ जाणं तसं कठीण. कारण ते लगेच उडून जातात; पण दुर्बिणीतून त्यांच्या हालचाली, पाण्यात तुरुतुरु पळणं, परेड खरोखरच पाहण्यासारखी असते. चव्वेचाळीस चौ.कि.मी. क्षेत्रफळाचा नकुरू तलाव हा खाऱ्या पाण्याचा आहे. त्या निळ्याभोर पाण्यात फ्लेमिंगो आपलं अन्न शोधत असतात. फ्लेमिंगो मूळचे इथलेच; पण फेब्रुवारी-मार्च महिन्यांत मात्र त्यांचं स्थलांतर टांझानियात होते. त्यांच्याखेरीज निदान ४५० जातींचे पक्षीही या पार्कमध्ये आढळून येतात. त्यामुळे पक्षीप्रेमींच्या दृष्टीने हा पार्क म्हणजे मोठा खजिनाच म्हणावा लागेल.

अत्यंत दुर्मीळ असा पांढरा गेंडा नकुरू पार्कमध्ये दिसण्याची शक्यता आहे असं गाइड फरीदने आम्हांला आधीच सांगितलं होतं. त्याचबरोबर काळे गेंडेही इथे आहेत. फ्लेमिंगो पक्ष्यांची रांग पाहून परतत असताना फरीदने अचानक गाडी झुडपात घुसवली. सुरुवातीला तीन-चार काळे गेंडे दिसले. त्यांच्या मागे पांढरा गेंडा चरत होता. त्याची कातडी अगदी पांढरी होती. ही पांढरी कातडी चांगलीच उठून दिसत होती. काळे व पांढरे मिळून जवळजवळ ८० गेंडे या पार्कमध्ये आहेत. पांढऱ्यांची संख्या मात्र जेमतेम १५ ते २० इतकीच आहे.

संपूर्ण आफ्रिकेत ‘बिग ५’ हा शब्द प्रयोग फार पूर्वीपासून परिचित आहे. हे पाच बिग कोण? सिंह, लेपर्ड-चित्ता, गेंडा, हत्ती व जंगली म्हैस. ते आकाराने मोठे आहेत. म्हणून त्यांना ‘बिग ५’ म्हटलं जात नाही, तर या पाचही प्राण्यांची जमिनीवरून शिकार करणं अत्यंत कठीण असतं म्हणून त्यांना ‘बिग ५’ असं संबोधलं जातं. त्यांपैकी गेंडा, हत्ती व जंगली म्हैस यांचं मनसोक्त दर्शन आत्तापर्यंत झालं होतं. राहिलेल्या दोन पण सर्वांत महत्त्वाच्या ‘बिग’चे दर्शन होणार की नाही? हा महत्त्वाचा प्रश्न होता.

लेक नकुरू ते मसाईमारा हा जवळजवळ ३५० कि. मी. चा प्रवास, आतल्या अत्यंत खराब रस्त्यामुळे त्रासदायकच वाटला. त्यात मसाईमारा येथील मारा सरोवा कॅम्पमध्ये दुपारचं जेवण घेऊन आणखी सव्वापाच हजार फूट उंचीवरच्या मारा सरिना लॉजला आम्हांला जायचं होतं. वस्तुत: तिथे जाण्यासाठी नैरोबीहून विमानाची सोय आहे. पण त्रास झाला तरी मोटारीनेच जा, कारण त्या गवतात दुर्मीळ प्राणी दिसण्याची शक्यता अधिक असा सल्ला माहितगारांनी दिला होता.

दुपारचं जेवण आटोपून आम्ही मारा सरिना लॉजमध्ये कूच केलं. जाता जाता फरीदने गाडी एकदम थांबवली आणि जवळजवळ कमरेएवढ्या वाढलेल्या सुक्या गवतात घुसवली. ‘बहुधा तिथे सिंह दिसतो आहे’ या त्याच्या वाक्याने मी एकदम सावध झालो. जयंताने कॅमेरा सरसावला आणि उघड्या टपातून आम्ही आजूबाजूला पाहू लागलो. मोटार जोरात जात होती आणि अचानक थांबली...

समोर वनराज गवतात मस्त आराम करत होते. थोडं पुढे गेलो तर त्यांचं सारं कुटुंबच समोर आलं. दोन-तीन सिंहिणी व त्यांची दहा बाळं. शेजारीच एक म्हैस मारली होती. दोन सिंहिणी व चार-पाच बछडे अद्याप त्या म्हशीच्या सांगाड्यातच बसून ताव मारत होते...काहींचं भोजन पूर्ण झालं होतं तर काहींची भूक अद्याप भागली नव्हती. फरीदच्या अंदाजानुसार ही म्हैस त्यांनी काही तासांपूर्वीच मारली असावी. कारण निम्मे कुटुंबीय अद्याप ताटावरून उठले नव्हते...

‘आंधळा मागतो एक आणि देव देतो दोन’ अशी आमची स्थिती झाली होती. किती फोटो काढू, कसं शूटिंग करू यात आम्ही मग्न होतो. शिकार केल्यानंतर खाण्याचा पहिला मान सिंहाचा. त्यामुळे खाऊन तृप्त झाल्याने सिंह सुस्तावला होता. त्याला बहुधा ‘मी पाणी पिऊन येते. तोपर्यंत बछड्यांना सांभाळ’ असं सांगून एक सिंहीण निघून गेली. जाताना ती सिंहाच्या जवळ जाऊन एक मिनिटभर थांबली... त्यांच्यात खरोखरच असाच संवाद झाला असेल का? आता सर्व सिंह कुटुंबीय आमच्या मोटारीच्या सावलीत अगदी मोटारीला खेटून पहुडलं. फरीदने गाडी केव्हाच बंद केली होती. अजिबात हालचाल न करण्याच्या सूचना तो आम्हांला खुणांद्वारे करत होता. समजा, सिंह किंवा सिंहिणीने जेमतेम दोन-तीन फूट उंचावरील उघड्या छताच्या दिशेने उडी घेतली असती तर... सारंच चित्तथरारक होतं. आम्हांला लवकर पोहोचायचं होतं. हे तर आम्ही कधीच विसरून गेलो होतो. एक बछडा सिंहाच्या आयाळीशी खेळण्याचा प्रयत्न करत होता. सिंहाने ते थोडावेळ सहन केलं. पण नंतर एक हलकासा पंजा मारून, ‘त्रास देऊ नकोस’ म्हणून बछड्याला सुनावलं. हे सर्व नाट्य जवळजवळ अर्धा-पाऊण तास चाललं होतं... जणू डिस्कव्हरी चॅनेल...फरक एवढाच होता, की या वेळी आम्ही केवळ तिघं त्याचे साक्षीदार होतो. अखेर फरीदने गाडी सुरू केली. सिंह, दोन सिंहिणी, सहा-सात बच्चे थोडे बाजूला झाले. त्यांना काहीही इजा पोहोचणार नाही अशा दक्षतेने फरीदने तिथून गाडी काढली.

पुढच्या प्रवासात जंगलाच्या या राजाची जी वैशिष्ट्यं समजली ती फारच उद्बोधक वाटली. दिवसाचे जवळजवळ वीस तास सिंह हा आळसटून पडलेला असतो. बहुतेक शिकार सिंहिणीच करतात. मात्र कुठेही त्या अडचणीत असतील, तर मात्र तो त्यांच्या मदतीला धावतो. तो क्वचित शिकारही करतो. वस्तुत: सिंह तासाला ६० कि. मी. च्या वेगाने पळू शकतो. पण त्याचा स्टॅमिना खूपच कमी असतो. त्यामुळे त्याला शिकार करायची असेल तर पहिल्या २०० मीटर्सच्या टप्प्यातच तो सावज पकडतो. अन्यथा सोडून देतो. त्याचं कुटुंब हे सर्वसाधारणत: तीस जणांचं असतं व आयुष्य १५ ते २० वर्षं. सिंहाला जंगलात तसा एकही शत्रू नाही. तरस (हायना) त्याची पिल्लं पळवतात व खातात. मात्र मोठ्या सिंहावर किंवा सिंहिणीवर हल्ला

करण्याची कोणाचीच हिंमत होत नाही; पण विशेष म्हणजे नैसर्गिकरीत्या मेलेल्या सिंहाचा सांगाडा शक्यतो कधीच मिळत नाही, कारण वृद्धत्वाने किंवा आजाराने सिंह मरायला टेकला की त्याचा वास तरसांना बरोबर येतो व ते त्याचा पुरता फडशा पाडतात. सिंहाचा एकमेव शत्रू म्हणजे मनुष्यप्राणी. त्या भागातही मनुष्यप्राण्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळेच सिंहांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे....

'बिग ५'च्या दर्शनाच्या बाबतीत या वेळी आमचं ग्रहमान चांगलं अनुकूल आहे याची झलक तर मिळाली होती. मारा सरिना लॉज अगदी उंचावर बांधलं आहे. प्रत्येक खोलीतून समोरच्या जंगलातला परिसर मस्त दिसतो. खोलीत पाऊल टाकलं आणि थोड्या अंतरावर हत्तीच्या कळपाचं दर्शन झालं. बबून (अजस्र माकडं) पासून सावध राहण्याच्या सूचना आधीच देण्यात आल्या होत्या. तिथल्या तीन दिवसांच्या मुक्कामात रोज निदान पाच-सहा तासांचा गेम ड्राइव्ह करायचा होता. त्यासाठी साधारणत: पाच-सहा गाड्या एकदम बाहेर पडतात व शक्यतो बरोबर राहतात. एखादी गाडी जंगलातील चिखलात फसली, रस्ता चुकला किंवा काही बाका प्रसंग निर्माण झाला तर मदत मिळावी हा त्यामागचा हेतू.

एकदा दुपारच्या वेळेस रस्त्यावर पाच-सहा गाड्या उभ्या होत्या व सर्वांचं लक्ष थोड्या दूरवर असलेल्या झाडाकडे होतं. आम्हीही त्या तांड्यात सामील झालो. कॅमेरा, दुर्बीण त्याच झाडाच्या दिशेने रोखली तर झाडाच्या फांदीवर एक लांबलचक लेपर्ड बसला होता. शेजारीच त्याने मारलेलं हरिण लटकत होतं. लेपर्डच्या मानेत जबरदस्त ताकद असते. त्यामुळेच मारलेलं जनावर ओढत तो झाडावर चढवू शकतो. लेपर्ड व चित्ता यांच्यात फरक आहे. लेपर्डची शेपटी लांब असते व टोकापासून मध्यापर्यंत त्याच्यावर ठिपके असतात. लेपर्ड सर्वसाधारणपणे सूर्यास्ताच्या वेळेस किंवा रात्रीच्या वेळेस शिकार करतो. त्याची दृष्टी व श्रवणेंद्रिय फार तीक्ष्ण असते. त्याचं आयुष्य साधारणत: वीस वर्षांपर्यंत असतं. त्याच्या कातड्याला आंतरराष्ट्रीय बाजारात जबरदस्त मागणी आहे.

एके दिवशी संध्याकाळच्या सुमारास आम्ही मोटारीने लॉजच्या मागच्या बाजूस गेलो. तिथून एक छोटी नदी वाहत होती. त्या ठिकाणी काही जनावरं दिसतात का याचा शोध घ्यायचा होता. आमच्याबरोबर आणखी एक गाडी होती. आम्ही पुढे निघून जात होतो. इतक्यात वायरलेसवरून संदेश आला, की लगेच मागे फिरा. सुमारे पाचशे मीटर्स मागे आलो तर समोर चित्तीण व तिची तीन बाळं उभी होती. तिच्या हालचाली कमालीच्या मोहक होत्या. बच्चेकंपनीही आईबरोबर रुबाबात उभं राहून जणू आम्हांला फोटोसाठी पोज देत होते. चार-पाच मिनिटं हे फोटो सेशन झालं आणि समोरच्या गवतात सर्व कुटुंब गायब झालं. चित्ता हा जगातील सर्वांत चपळ प्राणी. तो तासाला १०० कि. मी. च्या वेगाने पळतो. पण त्याचा हा वेग पहिल्या ५०० मीटर्सपर्यंतच असतो. त्याचं शरीर गोंडस, लवचीक, छाती भरदार व मुख्य म्हणजे पाय लांब असतात. शिकार करण्याची त्याची पद्धत निराळी असते. तो आपल्या सावजाच्या जवळ दबकत, दबकत जातो आणि एकदम हल्ला चढवतो. त्या जनावराला गुदमरून टाकून तो त्याला मारतो व शिकार लगेच खायची नसेल तर पालापाचोळ्याने झाकून ठेवतो. अन्यथा तरस त्या आयत्या मिळालेल्या शिकारीवर डल्ला मारतात.

केनयाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने चार प्रकारच्या उत्पन्नांवर आधारित आहे. ते म्हणजे- (१) पर्यटन (२) कॉफी (३) चहा (४) फुलं (गुलाब). त्यात पर्यटनाचा क्रमांक पहिला आहे. केनया सरकार पर्यटन क्षेत्र विकसित करायचा खूपच प्रयत्न करत आहे. पर्यटकांनी जंगलात फिरताना काय दक्षता घ्यावी याचे नियम करण्यात आले आहेत. उदा. मोटारीतून फिरताना शक्यतो मुख्य रस्ता सोडून आत जाऊ नये, अगदी दुर्मीळ प्राणी दिसला तरच झुडपांत शिरावं, पण परत लवकरात लवकर मुख्य रस्त्यावर यावं, जनावरांच्या जवळ बोलू नये, टाळ्या वाजवू नयेत व त्यांना खायलाही घालू नये. सिंह, गेंडा, लेपर्ड-चित्ता यांच्या सभोवताली पाचपेक्षा जास्त वाहनांनी थांबू नये, जनावरांचा पाठलाग करू नये व त्यांना त्रास देऊ नये इत्यादी... या नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांना दंड करून त्वरित पार्कबाहेर काढण्याचे अधिकार रेंजर्सना आहेत. सरकार याबाबत अतिशय दक्ष असल्यानेच केनया सफरीला येणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे.

## स्वाध्याय

**प्र. १. केनया पार्कमध्ये फिरण्याचे थ्रिल खालील मुद्दा विचारात घेऊन लिहा.**

'गेम ड्राइव्ह'

**प्र. २. टिपा लिहा.**

(१) केनयातील पर्यटन क्षेत्राबाबत तेथील सरकारची भूमिका.

(२) 'बिग ५'चे थोडक्यात वर्णन.

**प्र. ३. पाठाच्या आधारे सिंहाचे कुटुंब व लेखकाचे कुटुंब यांच्या भेटीचा प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा.**

## प्रवासवर्णन लिहूया.

प्रवासवर्णन म्हणजे एखाद्या स्थळाला भेट देऊन आल्यानंतर त्या ठिकाणचे घेतलेले अनुभव व त्या ठिकाणी पाहिलेल्या स्थळांचे बारकाव्यांसह निरीक्षण शब्दबद्ध करणे होय.

- **प्रवासवर्णन कसे लिहावे?**

प्रवास वर्णन लिहिताना त्यात खालील मुद्द्यांचा विचार व्हावा.

**(१) प्रवासाचे ठिकाण :**

ठरवलेल्या ठिकाणची भौगोलिक, ऐतिहासिक वैशिष्ट्ये, तेथील हवामान स्थिती, नियोजित ठिकाणी पोहोचण्याचे मार्ग या सगळ्याच्या पूर्वतयारीविषयी थोडक्यात माहिती घेणे आवश्यक आहे.

**(२) नेमके काय पाहिले :**

जिथे भेट देणार तिथले लोकजीवन, संस्कृती, वेशभूषा, बोलीभाषा खाद्यपदार्थ आणि अर्थातच निसर्ग, ऐतिहासिक, भौगोलिक महत्त्व इत्यादी.

**(३) सूक्ष्म निरीक्षण :**

प्रवास करताना निरीक्षणातून लक्षात आलेले छोटे बारकावे, तपशिलांची नोंद करून ठेवावी. लेख लिहिताना अशी काही निरीक्षणे नोंदवल्यास आपल्या लिखाणाला वेगळे परिमाण मिळते.

**(४) सहज संवादात्मक लेखन :**

प्रवासवर्णनाची शैली ही उत्कंठावर्धक तरीही सहज असावी. लिखाणातला ओघ कायम राहील याचे भान ठेवावे.

**(५) संस्मरणीय प्रसंग :**


प्रवासाचा आनंद घेता-घेता घडणाऱ्या अनपेक्षित घटना, प्रसंग, क्वचितप्रसंगी आलेल्या अडचणी, त्यांवर केलेली मात याचा उल्लेख प्रवासवर्णन लिहिताना जरूर करावा.

प्रवासवर्णन म्हणजे प्रवासाच्या तयारीपासून सुरू होणारा हा सिलसिला प्रवास संपून, मूळ जागी येऊन स्वस्थता मिळेपर्यंत अव्याहतपणे आपसूक सुरूच असतो. प्रवासातील वेगळेपण, निरनिराळ्या व्यक्ती, आलेले हटके अनुभव, काही अद्भुत गोष्टी या सर्वांची एक सुंदर अनुभूती तयार होते. सखोल निरीक्षणातून ती उठावदार बनते. त्यातून प्रवासवर्णन हा एक बोलका, अक्षरबद्ध नजारा तयार होतो. त्यामुळेच निरीक्षणे, माहिती, वैशिष्ट्ये, आलेल्या अडचणी आणि विलक्षण अनुभव तसेच केलेली धमाल, या सर्व गोष्टी सहजपणे लिहिल्या की प्रवासवर्णन तयार होते.

# १६. वनवासी

**तुकाराम धांडे** (१९६१) : प्रसिद्ध कवी. विविध साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंकांतून कथा व ललित लेखन. निसर्ग व माणूस हा त्यांच्या लेखनाचा आवडता विषय. 'वळीव' हा कवितासंग्रह प्रसिद्ध.

आदिवासी, त्यांचे डोंगरदऱ्यांतील जीवन, निसर्ग, निसर्गाविषयीचे प्रेम व त्यांमधील अतूट नाते यांचे वर्णन प्रस्तुत कवितेतून कवीने केले आहे. 'वळीव' या कवितासंग्रहातून प्रस्तुत कविता घेतली आहे.



आम्ही डोंगरराजाची
पोऱ्हं कळसू आईची
आम्ही उघडी बोडकी
बाळं परवरा माईची.

घेऊ हातावं भाकर
वर भाजीला भोकर
खाऊ खडकावं बसून
देऊ खुशीत ढेकर.

खेळू टेकडी भवती
पळू वाऱ्याच्या संगती
वर पांघरू आभाळ
लोळू पृथ्वीवरती.

आम्ही वाघाच्या लवणाचे
आम्ही वांदार नळीचे
गाव वहाळापल्याड
आम्ही उंबर माळीचे.

बसू सूर्याचं रुसून
पहू चंद्राकं हसून
बोलू वाज तिंकिड्याशी
नाचू घोंगडी नेसून.

डोई आभाळ पेलीत
चालू शिंव्हाच्या चालीत
हिंडू झाडा-कड्यांवरी
बोलू पक्ष्यांच्या बोलीत.

आम्ही सस्याच्या वेगानं
जाऊ डोंगर यंगून
हात लाऊन गंगना
येऊ चांदण्या घेऊन.

## स्वाध्याय

**प्र. १. खालील शब्दसमूहांतील अर्थ स्पष्ट करा.**

(१) पांघरू आभाळ–

(२) वांदार नळीचे–

(३) आभाळ पेलीत–

**प्र. २. शोध घ्या.**

(अ) 'हात लाऊन गंगना येऊ चांदण्या घेऊन' या काव्यपंक्तीत व्यक्त होणारा आदिवासींचा गुण–

(आ) कवितेच्या यमकरचनेतील वेगळेपण–

**प्र. ३. काव्यसौंदर्य.**

(१) 'बसू सूर्याचं रुसून पहू चंद्राकं हसून', या काव्यपंक्तीतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

(२) 'डोई आभाळ पेलीत चालू शिंव्हाच्या चालीत', या पंक्तीतील कवीला अभिप्रेत असलेला अर्थ सांगा.

**प्र. ४. अभिव्यक्ती.**

'आदिवासी समाज आणि जंगल यांचे अतूट नाते असते', याविषयी तुमचे विचार लिहा.

### भाषा सौंदर्य

लिखित मजकूरासाठी योग्य विरामचिन्हांचा वापर महत्त्वपूर्ण असतो. विरामचिन्हांच्या चुकीच्या वापरामुळे संपूर्ण वाक्याचा अर्थ बदलू शकतो व भाषेचा बाजही बिघडू शकतो. भाषा योग्य स्वरूपात अर्थवाही होण्यासाठी विरामचिन्हांच्या योग्य वापराचा अभ्यास व सराव होणे आवश्यक आहे.

- **खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) ते बांधकाम कसलं आहे

(२) आकाशकंदील पूर्ण झाल्यावर दादांनी तो खांबावरच्या खिळ्याला टांगला

(३) गुलाब जास्वंद मोगरा ही माझी आवडती फुले आहेत

(४) अरेरे त्याच्याबाबतीत फारच वाईट झाले

(५) आई म्हणाली सोनम चल लवकर उशीर होत आहे

FX3H54

# १७. ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ

**बाळ ज. पंडित** (१९२९-२०१५) : प्रसिद्ध लेखक. क्रिकेट सामन्यांचे समालोचक. 'पहिले शतक', 'कुमारांचे खेळ', 'क्रिकेटमधील नवलकथा' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

ऑलिंपिक सामन्यांची सुरुवात का व कशी झाली? हे सामने भरवण्यामागील उद्दिष्टे कोणती? ऑलिंपिक वर्तुळांचा अर्थ काय? या सर्वांचा आढावा प्रस्तुत पाठातून लेखकांनी घेतला आहे. प्रस्तुत पाठातून जागतिक ऑलिंपिक क्रीडास्पर्धांविषयीची माहिती दिली आहे.

मनुष्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात क्रीडेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सर्व स्तरांवर खेळले जाणारे क्रीडासामने हे जगभरातील क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेणारे ठरतात.

संपूर्ण जगभरातील क्रीडासामन्यांत 'ऑलिंपिक क्रीडासामन्यांना' एक मानाचे स्थान आहे. विजयाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आपल्याला आवडणाऱ्या खेळावर लक्ष केंद्रित करून, त्यांत पारंगत होऊन आपल्या देशाला 'ऑलिंपिक विजयाचे मानकरी' होण्यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील राहूया.



ऑलिंपिक गावाकडे आमची मोटार भरधाव वेगाने जात होती. गर्दी प्रचंड असली तरी रहदारीला अडचण मुळीच नव्हती. येण्याजाण्यासाठी वेगवेगळे रस्ते होते. खेळांचे मैदान जवळ येऊ लागले, तसे आमचे डोळे समोरील क्षितिजाकडे लागले. खूपच उंच अशा स्तंभावर एक भलामोठा ध्वज फडफडत असलेला आम्हांला दिसला. ऑलिंपिक सामन्यांचे ते स्वतंत्र निशाण होते. ध्वजावरील पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर लाल, पिवळ्या, निळ्या, हिरव्या व काळ्या रंगांची वर्तुळे एकमेकांत गुंफलेली होती. जणू पाच मित्रच हातांत हात घालून आपल्या मैत्रीची साक्ष जगाला देत होते! ही पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंड आणि त्यांची शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे विशाल अंतराळ. या ध्वजावर ऑलिंपिकचे ब्रीदवाक्य लिहिलेले आहे- 'सिटियस, ऑल्टियस, फॉर्टियस.' म्हणजे गतिमानता, उच्चता, तेजस्विता. प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त गतिमान होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अधिकाधिक उंची गाठण्याची शिकस्त केली पाहिजे आणि बलसंवर्धनासाठी जास्तीत जास्त श्रम केले पाहिजेत, असा संदेश हा ध्वज खेळाडूंना देत असतो. या ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तिदायक मशाल सतत तेवत असते. ऑलिंपिक सामने म्हणजे क्रीडापटूंसाठी आणि क्रीडाशौकिनांसाठी एक पर्वणीच असते. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राष्ट्रांतील सुमारे पाच ते सहा हजार खेळाडू या सामन्यांमध्ये भाग घेतात. स्त्री-खेळाडूंचीही संख्या दोन हजारांच्या आसपास असते. प्रेक्षागारात सुमारे सत्तर ते ऐंशी हजार प्रेक्षक बसण्याची सोय असते. याशिवाय सुमारे पंचवीस हजार लोकांना हे सामने उभे राहून पाहता येतात. पोहण्याच्या शर्यतीसाठी चार-पाच तलावही बांधलेले असतात.

खेळांचे विशाल मैदान, त्याभोवतालचे प्रचंड प्रेक्षागार, रहदारीसाठी मुद्दाम बांधलेल्या अनेक सडका, लोहमार्ग, पुरुष व स्त्री-खेळाडू यांच्या निवासासाठी बांधलेल्या असंख्य खोल्या असलेल्या इमारती, वसतिगृहे, प्रेक्षकांच्या श्रमपरिहारासाठी सुसज्ज अशी विशाल उपाहारगृहे-असे हे एक मोठे गावच असते! याला 'ऑलिंपिक व्हिलेज' असे म्हणतात. 'ऑलिंपिक व्हिलेज' वसवण्याची कल्पना इ. स. १९५६ मध्ये मेलबोर्न येथे मांडण्यात आली. पहिले 'ऑलिंपिक व्हिलेज' तिथलेच. ऑलिंपिक

सामने दर चार वर्षांनी होतात. हे सामने पाच दिवस चालत. इ. स. पूर्व ७७६ मध्ये हे सामने झाल्याची पहिली नोंद ग्रीस देशाच्या इतिहासात सापडते. त्या वेळी स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या खेळाडूंचा, ऑलिव्ह वृक्षाच्या फांदीची माळ घालून, गौरव करण्यात येत असे. ग्रीस देशातील अनेक शहरे परस्परांतील भेदभाव विसरून या यशस्वी स्पर्धकांचे प्रचंड स्वागत करत. या सामन्यांतील खेळाडूंना राष्ट्रीय सणसमारंभाच्या वेळी मानाचे स्थान मिळत असे. पुढे ग्रीक सत्तेचा ऱ्हास झाला आणि त्याबरोबर इ. स. पूर्व ३९४ मध्ये हे सामने बंद पडले.

मैत्रीचा मंत्र सांगणाऱ्या या ऑलिंपिक सामन्यांची त्यानंतर इ. स. १८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली. त्या वर्षी फ्रान्स देशात एक 'ऑलिंपिक काँग्रेस' भरवण्यात आली होती. त्या काँग्रेसला अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. कुबर टीन नावाच्या फ्रेंच क्रीडातज्ज्ञाने या काँग्रेसमध्ये ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन केले. शरीरसंपदा वाढवण्यासाठी, बलसंवर्धन करण्यासाठी आणि प्रामुख्याने देशादेशांतील मैत्री वाढून त्यांच्यात मित्रत्वाची स्पर्धा व्हावी यासाठी प्राचीन ऑलिंपिक सामन्यांप्रमाणेच यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा भरवाव्यात असे ठरले. १८९६ पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात. त्या निमित्ताने जगात सद्‌भावना, समता, मैत्री, विश्वबंधुत्व, शिस्त व ऐक्य या भावना वाढीस लागतात.

या सामन्यांत निरनिराळ्या एकवीस खेळांची तरतूद आहे. पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात. या सामन्यांच्या व्यवस्थेसाठी एक आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती नेमलेली असते. या स्पर्धांत भाग घेणाऱ्या प्रत्येक देशाचे एक ते तीन प्रतिनिधी या समितीत असतात. या समितीमध्ये खेळांची व्यवस्था त्या त्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघाकडे असते. ऑलिंपिक सामन्यांसाठी लागणारा खर्च फारच मोठा असतो. हा सर्व पैसा स्पर्धक देश उभा करतात.


क्रीडेच्या क्षेत्रात जातिभेद नाही, धर्मभेद नाही की वर्णभेद नाही. येथे सर्वांना समान संधी मिळते. अमेरिकेतील जेसी ओवेन्स हा वंशाने आफ्रिकी खेळाडू. १९३६ मध्ये बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत त्याने चार अजिंक्यपदे मिळवली. इतकेच नव्हे, तर त्या चारही बाबतींत त्याने नवे उच्चांक प्रस्थापित केले. अमेरिकेच्या यशाचा तो मोठा शिल्पकार ठरला. अमेरिकेनेच नव्हे, तर साऱ्या जगाने या खेळाडूचा त्या वेळी केवढा गौरव केला! केवढे कौतुक केले! ओवेन्सचा वर्ण, त्याचा देश हे सर्व विसरून साऱ्या जगाने त्याची प्रशंसा केली.

एमिल झेटोपेक हा झेकोस्लोव्हाकियाचा खेळाडू. १९५२ साली त्याने हेलसिंकीचे मैदान गाजवले. तेथे त्याने ५,००० मीटर धावणे व मॅरेथॉन या लांब पल्ल्याच्या शर्यतीत नवीन विक्रम केले व नवा इतिहास घडवला. जगातील एक 'मानवी रेल्वे इंजिन' अशी झेटोपेकने ख्याती मिळवली. यामुळे जगातील सर्व लोकांना झेटोपेकबद्दल तर अभिमान वाटलाच; पण त्याबरोबर झेकोस्लोव्हाकिया देशाबद्दलही त्यांच्या मनात आदर निर्माण झाला.

आफ्रिकेतील इथियोपियाचा अबेबे बिकिला या खेळाडूने तर अनवाणी पायाने मॅरेथॉन-लांब पल्ल्याची शर्यत जिंकली! एवढे मोठे अंतर त्याने २ तास १५ मिनिटांत काटले. फॅनी बँकर्स या स्त्री-खेळाडूने तर १९४८ साली ऑलिंपिकचे मैदान दणाणून सोडले. १०० व २०० मीटरच्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवला. भारताने हॉकीच्या स्पर्धेत अनेक वर्षे अजिंक्यपद टिकवले. सुप्रसिद्ध भारतीय हॉकी खेळाडू ध्यानचंद यांचे नाव कित्येक वर्षे जगात सर्वांच्या जिभेवर नाचत होते. ऑलिंपिकच्या मैदानावर खेळाडू खेळत असतात, तेव्हा खेळाडूंना पराक्रमाचा व प्रयत्नवादाचा संदेश देणारा ध्वज डौलाने फडकत असतो. त्या ध्वजावरील पाच खंडांची पाच वर्तुळे समतेचा व विश्वबंधुत्वाचा संदेश जगाला देत असतात; तर त्याच्या शेजारीच क्षुद्र विचारांचा अंधकार घालवणारी ज्योत तेवत असते.

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. २. योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) पहिले ऑलिंपिक व्हिलेज········· येथे वसले.
(अ) ग्रीस (आ) मेलबोर्न (इ) फ्रान्स (ई) अमेरिका

(२) ········· पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात.
(अ) १८९६ (आ) १९५६ (इ) इ. स. ७७६ (ई) इ. स. पूर्व ३९४

**प्र. ३. खालील वाक्य वाचा. अधोरेखित केलेल्या शब्दांबाबत माहिती भरून तक्ता पूर्ण करा. एखाद्या शब्दाला खालील मुद्दे लागू नसतील तर तिथे– हे चिन्ह लिहा. उदा., 'व' यासाठी लिंग, वचन, विभक्ती सगळीकडे – हे चिन्ह येईल.**

(१) पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात.

| अ. क्र. | शब्द | मूळ शब्द | शब्दजात | प्रकार | लिंग | वचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | पुरुषांसाठी | | | | | | |
| (२) | व | | | | | | |
| (३) | स्त्रियांसाठी | | | | | | |
| (४) | वेगवेगळे | | | | | | |
| (५) | सामने | | | | | | |
| (६) | होतात | | | | | | |

**प्र. ४. स्वमत.**

(१) 'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व' ही संकल्पना स्पष्ट करा.

**उपक्रम :** सन २०१६ साली झालेल्या ऑलिंपिक सामन्यातील सुवर्ण, रजत व कांस्यपदक मिळवणाऱ्या खेळाडूंची माहिती आंतरजालाचा वापर करून खालील तक्त्यात लिहा.

| अ. क्र. | व्यक्तीचे नाव | देश | खेळाचे नाव | पदक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

# १८. हसरे दुःख

**भा. द. खेर** – भालचंद्र दत्तात्रय खेर (१९१७–२०१२) : कथालेखक, कादंबरीकार. विपुल व विविध स्वरूपाची वाङ्‌मयीन निर्मिती. 'सुखाचा लपंडाव', 'प्रायश्चित्त', 'शुभमंगल', 'नंदादीप', 'वादळवारा' या कादंबऱ्या; 'यज्ञ', 'अमृतपुत्र' या चरित्रात्मक कादंबऱ्या; 'अधांतरी', 'द प्रिन्सेस' हे अनुवादित साहित्य; 'आईन्स्टाईनचे नवे विश्व', 'गीताज्ञानदेवी', 'अपरोक्षानुभूति' हे ग्रंथलेखन प्रसिद्ध. केसरी या वृत्तपत्राचे २५ वर्षं उपसंपादक, तसेच सह्याद्री मासिकाचे व्यावसायिक संपादक.

प्रस्तुत पाठात चार्ली व त्याच्या आईमधील प्रेम, तसेच चार्लीच्या रंगमंचावरील पदार्पणाचे वर्णन केले आहे. हा पाठ 'हसरे दुःख' या पुस्तकातून घेतला आहे.



रंगमंचावरील पडदा दूर झाला. प्रेक्षागृह एकदम शांत झालं. वाद्यवृंदाचे स्वर घुमू लागले. प्रेक्षागृहातली कुजबूज एकदम थांबली.

रंगमंचावरील प्रकाशाच्या झगमगाटात लिली हार्ले एकतानतेनं गात उभी असलेली दिसली. तेव्हा साऱ्या प्रेक्षागृहाची नजर तिच्यावर खिळून राहिली आणि वाद्यवृंदाशी जेव्हा तिच्या कंठातले स्वर एकरूप झाले तेव्हा सारे श्रोते जिवाचा कान करून ऐकू लागले. सुरेल स्वरांची एक अलौकिक तेजोमय श्रीमूर्ती साकार झाली. साऱ्या श्रोत्यांचं भान हरपून गेलं.

लिली हार्लेचा पाच वर्षांचा धाकटा मुलगा चार्ली विंगमध्ये उभा होता. आपल्या आईच्या गाण्याशी त्याची तंद्री लागली होती. तिच्याकडे मोठ्या प्रेमानं बघत तो निश्चल उभा होता.

लिली हार्लेचं गाणं ऐन रंगात आलं. तिच्या गोड गळ्यातून तारसप्तकातले स्वर सहजतेनं बाहेर पडायला लागले. तिच्या कंठमाधुर्यानं श्रोते डोलू लागले. फुलून गेले. लिली हार्लेचा तारसप्तकातला तो मधुर स्वरविलास चालला असतानाच तिचा आवाज एकदम चिरकला. काही केल्या कंठातून आवाज फुटेना. स्वर आतल्या आत विरून जाऊ लागले. स्वरांनी वाद्यवृंदाची साथसंगत सोडून दिली. काही केल्या काही होईना. बसके स्वर कंठातून बाहेर येईनात.

आपल्या कंठातून स्वर प्रगट करण्याची तिची धडपड चालूच होती. विद्ध झालेल्या एखाद्या चंडोल पक्ष्यानं आपले पंख फडफडून उंच आकाशात झेप घेण्याची धडपड करावी, अशासारखं ते केविलवाणं दृश्य दिसत होतं.

त्या दिवशी कित्येक श्रोते प्रेक्षागृहात गर्दी करून बसले होते. लिली हार्लेचे ते फार चाहते होते. 'काय झालं?... एकदम असं काय झालं?' अशी त्यांची आपापसात कुजबूज सुरू झाली.

परंतु तिच्या आवाजाला एकदम काय झालं होतं, हे तिचं तिलाही कळत नव्हतं. मग श्रोत्यांना कुठून कळणार?

काही काळ त्या श्रोत्यांनी दम धरला; परंतु लिली हार्लेचा दम आता पुरता निघून गेला होता.

काही काळानंतर श्रोत्यांना दम धरवेना. काही तरी विपरीत घडलं होतं खास !

मग प्रेक्षागृहातील साऱ्या श्रोत्यांत कुजबूज सुरू झाली. श्रोते आरडाओरडा करू लागले. आरडाओरडा वाढू लागला. कित्येक श्रोत्यांना तिचं ते गाणं तोंडपाठ होतं. ते भसाड्या आवाजात तिचं गाणं म्हणू लागले. त्यांच्या त्या म्हणण्याला शिट्ट्यांची आणि आरोळ्यांची साथ सहजच मिळाली.

विंगमध्ये उभ्या असलेल्या चार्लीला काहीच कळेना. कावऱ्याबावऱ्या मुद्रेनं तो गोंधळून आईकडे बघत उभा होता. स्टेजवरच्या प्रकाराची स्टेज मॅनेजरलाही काही कल्पना नव्हती. त्यामुळे तो आतल्या बाजूला काहीतरी काम करत बसला होता. यापूर्वी असा प्रकार कधीच घडला नव्हता. नृत्य असो, संगीत असो किंवा नाट्य असो, लिली हार्लेकडे कधीच बघावं लागत नसे. प्रेक्षागृहात, म्युझिक हॉलमध्ये किंवा कँटिनमध्ये लिली हार्ले एकदा उभी राहिली म्हणजे मॅनेजर निर्धास्तपणानं दुसरीकडे बघायला मोकळा होत असे. ती उभी राहीपर्यंत काय ती त्याला धावपळ करावी लागे. लिली नृत्य करण्यात जशी निष्णात होती तशी पियानो वाजवण्यातही वाकबगार होती. नृत्य करताना तिच्या पदन्यासात जशी जादू होती तशीच तिच्या हातांच्या बोटातही एक प्रकारची विलक्षण जादू होती. मध्यम उंचीच्या लिली हार्लेची लांबसडक बोटं पियानोच्या पांढऱ्याशुभ्र पट्ट्यांवर नाचायला लागली म्हणजे पियानोतून स्वरही बेहोशीनं नर्तन करायला लागत आणि ती गायला लागली, की तिच्या कंठातून जे स्वर्गीय स्वर बाहेर पडत ते त्या पियानोतील स्वरांमध्ये एकरूप होऊन जात. कित्येक विनोदी प्रहसनात ती काम करायची, तेव्हा प्रेक्षागृहात हास्यलहरी उठायच्या, त्या मॅनेजरच्या कानावर हमखास पडायच्या. लिली हार्लेच्या स्टेजवरच्या कामाकडे कधीच लक्ष द्यावं लागायचं नाही.

त्यामुळे त्या दिवशी जेव्हा प्रेक्षागृहातून आरडाओरडा आणि आरोळ्या यांचा आवाज स्टेज मॅनेजरच्या कानी पडला तेव्हा तो धावतपळत आला आणि विंगमध्ये चार्लीच्या शेजारी येऊन उभा राहिला. गोंधळून जाऊन तो रंगमंचावरील लिली हार्लेकडे बघत होता.

लिली हार्लेची मुद्रा पांढरी पडली होती. आजवर तिच्या गोड चढ्या गळ्यानं तिला कधीही दगा दिला नव्हता. हुकमी आवाजामुळे तिची सतत प्रगती होत गेली होती. ती अधिकाधिक नाव मिळवत चालली होती. चांगल्यापैकी पैका कमवत होती; परंतु विद्युल्लता चमकावी आणि क्षणार्धात घनदाट अंधकारात विलीन होऊन जावी, असा प्रकार घडला होता. आजपर्यंत तिची एवढी अवहेलना कधी झाली नव्हती. त्या अपमानित अवस्थेत स्टेजवर थांबणं तिला मुळीच शक्य नव्हतं.

ती मुकाट्यानं विंगमध्ये परतली.

स्टेज मॅनेजर चार्लीबरोबर तिथेच उभा होता. त्याला काय बोलावं हे समजेना आणि नेमकं काय झालं आहे, हे चार्लीला समजेना.

रडवेल्या स्वरात लिली हार्लेच म्हणाली, ''माफ करा... माझा आवाज काही केल्या बाहेर फुटला नाही. मी तरी काय करणार? मी गाण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. पूर्वी असं कधी झालं नव्हतं.''

मॅनेजरला ते माहीत का नव्हतं?

त्यानं 'पिनॅफोर अँड अयोलान्ध' आणि 'मिकाडो' या नाटकातल्या तिच्या भूमिका बघितल्या होत्या. सलव्हन कंपनीतले ऑपेरा बघितले होते. तिनं गायलेलं शास्त्रीय संगीतही ऐकलं होतं.

मग आताच तिच्या आवाजाला एकदम काय झालं होतं ते मॅनेजरलाही कळलं नाही; परंतु त्याला काहीतरी निर्णय घेणं भागच होतं.

तो म्हणाला, ''ठीक आहे. तुम्ही थोडी विश्रांती घ्या.''

थोडा विचार करून मॅनेजर पुढे म्हणाला, ''पण मॅडम, आपला कार्यक्रम काही झालं तरी पुढे चालूच राहायला हवा! नाहीतर आपली नाचक्की होईल.''

लिलीनं मॅनेजरकडे उदासवाण्या दृष्टीनं बघितलं. तिचे नीलवर्ण बोलके नेत्र पाणावले होते. तिच्या पाणीदार नेत्रात आता कारुण्याची छटा दिसत होती. हातात तिनं आपला कोट धरून ठेवला होता. जणू आपला तो नाटकातला कोट तिनं कायमचा आपल्या अंगावरून उतरवून हातात पकडून ठेवला होता.

आपल्या हातांच्या मुठी जुळवून ती मॅनेजरकडे बघत केविलवाण्या मुद्रेनं त्याला म्हणाली, ''मी हा कार्यक्रम कसा काय पुढे चालू ठेवणार? मला तर ते आता स्टेजवरही येऊ देणार नाहीत!''

मॅनेजर एकदम म्हणाला, ''छे, छे! तुम्ही आता स्टेजवर जायची गरज नाही; परंतु तुमचं ते अपुरं राहिलेलं गाणं कुणीतरी स्टेजवर जाऊन म्हणायला हवं! या तुमच्या छोट्या चार्लीला तुमचं ते गाणं येतं. त्याला ते गाणं म्हणताना मी ऐकलंय. तुमची हरकत नसेल तर मी याला स्टेजवर घेऊन जातो.''

यावर लिली काहीच बोलली नाही. तिनं चार्लीकडे एकदा निरखून बघितलं. त्याला जवळ घेतलं. त्याच्या काळ्याभोर कुरळ्या राठ केसांतून हात फिरवला.

चार्लीला घेऊन स्टेज मॅनेजर केव्हा स्टेजवर गेला हेही तिला कळलं नाही.

प्रेक्षकांना उद्‌देशून मॅनेजर म्हणाला, 'हा चार्ली... लिली हार्लेचा मुलगा. याच्या आईची प्रकृती एकदम बिघडली...तेव्हा तिचं अपुरं राहिलेलं गाणं आता हा पुरं करील! आपण ते शांतपणानं ऐकून घ्यावं...धन्यवाद!'

मग चार्लीकडे बघून मॅनेजर म्हणाला, ''हं...चार्ली...आता प्रेक्षकांना तू जॅक जोन्स म्हणून दाखव.''

एवढं बोलून मॅनेजरनं चार्लीची पाठ थोपटली आणि तो विंगमध्ये निघून गेला.

चार्ली स्टेजवर सहजपणानं उभा होता. त्याला प्रेक्षकांची यत्किंचितही भीती वाटली नाही. तशी भीती वाटण्याचं त्याचं वयही नव्हतं. त्याच्या तोंडावर फुटलाइट्सचा झगमगीत प्रकाश पडला होता. त्यामुळे समोरचा प्रेक्षकवर्ग त्याला धूसर दिसत होता.

चार्लीनं गाणं म्हणायला सुरुवात केली–

'Round about the market, don't you see.'

त्याच्या त्या गाण्याबरोबर वाद्यवृंदही साथ देऊ लागला. सारं थिएटर त्या स्वरांनी भरून गेलं. जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे सारे श्रोते एकदम शांत झाले आणि चार्लीचं ते गाणं कौतुकानं ऐकायला लागले. त्याचं गाणं ऐकताना ते इतके भारावले, की त्यांनी स्टेजवर पैशांची उधळण सुरू केली.

पैशांची ती बरसात पाहून चार्लीनं आपलं गाणं मधेच थांबवलं आणि तो प्रेक्षकांना उद्‌देशून म्हणाला, 'मी आधी हे पैसे गोळा करतो आणि मग राहिलेलं गाणं म्हणून दाखवतो.'

असं म्हणून तो स्टेजवरचे पैसे भराभर गोळा करायला लागला.

त्याच्या त्या धिटाईच्या बोलण्यानं प्रेक्षकांत मोठा हशा पिकला. ते त्याला आणखी प्रोत्साहन देऊ लागले.

एवढ्यात स्टेज मॅनेजर चार्लीजवळ आला आणि आपल्या जवळचा हातरुमाल बाहेर काढून त्यात तो पैसे गोळा करू लागला. तो स्वत:साठीच पैसे गोळा करतो आहे, असं चार्लीला वाटलं. चार्ली लगेच त्याच्याजवळ गेला. एव्हाना मॅनेजर पैसे गोळा करून विंगच्या दिशेनं निघूनही गेला होता. चार्लीनं ताबडतोब त्याचा पाठलाग केला.

ते दृश्य बघून प्रेक्षकांमध्ये हास्यकल्लोळाची लाट उसळली.

त्याच वेळी मॅनेजरनं ते सारे पैसे चार्लीच्या आईजवळ दिले, तेव्हा कुठे चार्लीच्या जिवात जीव आला.

चार्ली पुन्हा स्टेजवर आला आणि उरलेलं गाणं म्हणायला लागला–

'Since Jack Jones has come into a little bit of cash
Well, 'e don't know where'e are...'

गाणं संपलं तेव्हा प्रेक्षकांनी अक्षरश: थिएटर डोक्यावर घेतलं. प्रेक्षकांशी त्याचं आता चांगलं नातं जुळलं होतं. त्यांच्यावर त्यानं चांगलीच छाप टाकली होती.

गाणं संपल्यावर चार्लीनं प्रेक्षकांना नाचूनही दाखवलं. नकलाही करून दाखवल्या.

त्याची आई 'आयरिश मार्च-साँग' चांगलं म्हणायची. आपल्या आईचं ते रणगीत चार्लीनं हुबेहूब म्हणून दाखवलं. ते म्हणताना त्यानं अगदी आपल्या आईसारखा आवाज काढला. श्रोत्यांनीही त्याच्या आवाजात आवाज मिळवला. तेही त्याच्याबरोबर गाऊ लागले.

ते गाणं गाताना त्याच्या आईचा आवाज क्वचित प्रसंगी मधूनच चिरकायचा. ते गाणं गाताना चार्लीनंही तसाच चिरकलेला आवाज काढला. त्या हुबेहूब नकलेमुळे सारे प्रेक्षक स्तिमित झाले आणि मग पुन्हा जोरदार हशा पिकला. प्रेक्षकांनी ओरडून त्याला शाबासकी दिली. पुन्हा एकदा स्टेजवर पैशांचा पाऊस पडला.

लिली हे सारं दृश्य विंगमधून डोळे भरून बघत होती. तिच्या पाच वर्षांच्या लाडक्या पोरानं सारा कार्यक्रम निभावून नेला होता. तिच्यावर आलेला वाईट प्रसंग या चिमुकल्यानं सावरला होता. तिला आपल्या या लहानग्याचं अपरंपार कौतुक वाटलं.

आपले डोळे पुसून तिनं समोर बघितलं. चार्ली पैसे गोळा करण्याच्या उद्योगात मग्न होता.

लिली स्टेजवर आली आणि चार्लीला बरोबर घेऊन पुन्हा विंगमध्ये जायला निघाली. तिला बघून प्रेक्षकांनी टाळ्यांचा गजर केला.

काही वेळानं झगमगीत दिवे विझले. थिएटर हळूहळू रितं झालं. त्या रात्रीच्या कार्यक्रमावर पडदा पडला; परंतु लिलीच्या मनावरचा पडदा काही केल्या दूर होत नव्हता. आज हे असं काय झालं, असा प्रश्न ती आपल्या मनाला पुन: पुन्हा विचारत होती; पण त्या प्रश्नाचं उत्तर तिला देता येत नव्हतं. तो प्रश्न तिच्या विचारांच्या आवर्तात गरगर फिरत होता; पण तिला उत्तर मिळत नव्हतं.

मात्र तिच्या हुकमी सुरेल आवाजानं उलटवलेला हा डाव तिच्या मानी मनाला मुळीच सहन होत नव्हता. आपल्या त्या आवाजाच्या बळावर ती आजवर स्टेजवर पाय रोवून उभी होती; परंतु त्या दिवशी तिचा तो खंबीर पाय लटपटत होता. तिच्या त्या लटपटणाऱ्या पायाला हात देऊन स्थिर करायला त्या दिवशीचे प्रेक्षक मुळीच तयार नव्हते. प्रेक्षक किंवा श्रोते कलावंत माणसाला मानत नाहीत. ते मानतात फक्त त्याच्या कलेला ! हे त्रिकालाबाधित सत्य लिली हार्लेला त्या दिवशी समजलं. त्या वेळी रंगमंचावरील लिली हार्ले लुप्त झाली. मागे उरली ती हॅना चॅप्लिन ! सर्वसामान्य स्त्री !

त्या रात्री चार्लीनं रंगमंचावर पहिलं पदार्पण केलं ते कायमचं आणि त्या रंगमंचावरून त्याच्या आईचा पाय निघाला तोही कायमचाच !

## स्वाध्याय

**प्र. १. आकृतीत दिलेल्या प्रसंगाबाबत माहिती लिहून आकृतिबंध पूर्ण करा.**

(१) लिली हार्लेच्या गायनाचा प्रेक्षागृहावर होणारा परिणाम

(२) प्रेक्षागृहातील विपरीत घटना

**प्र. २. खाली दिलेल्या घटनांचा परिणाम लिहा.**

| घटना | परिणाम |
|---|---|
| (१) चार्लीने जॅक जोन्स म्हणायला सुरुवात केली. | (१) |
| (२) प्रेक्षागृहात वाद्यवृंदाचे स्वर घुमू लागले. | (२) |
| (३) प्रेक्षागृहातील आरोळ्या स्टेज मॅनेजरने ऐकल्या. | (३) |

**प्र. ३. (अ) कंसातील वाक्प्रचारांचा खाली दिलेल्या वाक्यांत योग्य उपयोग करा.**

(अवेहलना करणे, चेहरा पांढरा फटफटीत पडणे, पदार्पण करणे, स्तिमित होणे)

(१) आंब्याच्या झाडाचे मालक समोरून येताना दिसताच कैऱ्या पाडणाऱ्या मुलांच्या चेहऱ्यावर भीती पसरली.

(२) शालेय स्नेहसंमेलनात प्राचीने स्टेजवर पहिले पाऊल टाकले.

(३) दिव्यांग मुलांची प्रदर्शनातील चित्रे पाहून प्रमुख पाहुणे थक्क झाले.

(४) गुणवान माणसांचा अनादर करू नये.

**(ब) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) तिच्यावर आलेला वाईट प्रसंग या चिमुकल्याने सावरला.

(२) तिच्या गोड गळ्याने कधीही दगा दिला नाही.

(३) नर्तकीचे नृत्य प्रेक्षणीय होते.

(४) सवाई गंधर्व महोत्सव प्रसिद्ध गायकाच्या गायनाने रंगला.

**प्र. ४. स्वमत.**

(१) चार्लीच्या तुम्हांला जाणवलेल्या गुणांचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.

(२) स्टेज मॅनेजरच्या जागी तुम्ही आहात अशी कल्पना करून त्या प्रसंगात तुम्ही कसे वागाल ते सविस्तर लिहा.

(३) 'हसरे दु:ख' या शीर्षकाचा तुम्हांला समजलेला अर्थ तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ५. 'हसरे दु:ख' या पाठातील पाठ्यांशाचे नाट्यीकरण करून वर्गात सादरीकरण करा.**

## अपठित गद्य आकलन.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

(अ) चौकटी पूर्ण करा.

अश्मयुगातील माणसाने दगडाचा उपयोग करून बनवलेल्या वस्तू– ☐ ☐ ☐ ☐

अश्मयुगात माणसाने आपले जीवन सुखाचे करून घेण्यासाठी चुलीसाठी तीन दगड मांडण्यापासून मृताचे थडगे बांधण्यापर्यंत दगडाला नानातऱ्हांनी वापरले. त्यांची भांडीकुंडी केली. औते-हत्यारे बनवली आणि त्याचे दागदागिने देखील घडवले. खडक कोरून किंवा दगडाच्या भिंती रचून आपल्या निवाऱ्याची सोय केली. माणसाच्या प्राथमिक गरजा भागल्यानंतर त्याला आपल्या सृजनशीलतेला आणि पूजावृत्तीला वाट करून दिल्याशिवाय राहवले नाही. फुरसद मिळाली तशी तो लेणी खोदू लागला; शिल्पे कोरू लागला, घरांना कलात्मक आकार देऊ लागला. शिल्प आणि स्थापत्य या दोन्ही कला झऱ्याप्रमाणे अशा दगडातून फुटल्या आणि विज्ञानाचा उगम झाला. एक सबंध युग दगडाने माणसाचे जीवन परोपरीने सुखाचे केल्यामुळे आणि माणसाच्या सृजनशीलतेला कला आणि विज्ञान यांचे उमाळे आल्यामुळे त्याला दगडच देव वाटून त्याने तो पूजला.

(आ) माणसाला दगडच देव वाटण्याचे कारण उताऱ्याच्या आधारे व तुमच्या मते स्पष्ट करा.

## भाषाभ्यास

### अनुस्वार लेखनाबाबतचे नियम :

- **खालील शब्द वाचा.**

'रंग', 'पंकज', 'पंचमी', 'पंडित', 'अंबुज' हे शब्द तत्सम आहेत. हे आपण पर-सवर्णानेसुद्धा लिहू शकतो, म्हणजे अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिक वापरून लिहू शकतो. उदा., रङ्ग, पङ्कज, पञ्चमी, पण्डित, अम्बुज असे. विशेषत: जुने साहित्य वाचले तर असे लेखन दिसते; परंतु आजकाल अशी पर-सवर्णाने लिहिण्याची पद्धत जुनी झाली आहे. त्याऐवजी अनुस्वारच वापरले जातात. खालील शब्द बघा कसे दिसतात!

'निबन्ध', 'आम्बा', 'खन्त', 'सम्प', 'दङ्गा' हे शब्द बघायला विचित्र वाटतात ना! कारण हे तत्सम नाहीत. पर-सवर्ण लिहिण्याची पद्धत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावेत.

**मराठीत स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.**

- **खालील शब्द वाचा.**

'सिंह', 'संयम', 'मांस', 'संहार.' या शब्दांचा उच्चार खरे तर खूप वेगळा आहे ना? या शब्दांचे 'सिंव्ह', 'संय्यम', 'मांव्स', 'संव्हार' उच्चार असे होतात आणि तसेच ते करायचे असतात; पण लिहिताना हे शब्द तसे लिहू नयेत.

**य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.**

**पर-सवर्णाने लिहा.**

घंटा, मंदिर, चंपा, चंचल, मंगल

**अनुस्वार वापरून लिहा.**

जङ्गल, चेण्डू, सञ्च, गोन्धळ, बम्ब

# १९. प्रीतम

**माधुरी शानभाग** (१९५२) : प्रसिद्ध लेखिका व विज्ञानाच्या प्राध्यापिका. 'स्वप्नाकडून सत्याकडे', 'रिचर्ड फेनमन' एक अवलिया संशोधक, 'सी. एन. आर. राव' अनोख्या रसायनाने बनलेला माणूस, 'ए. पी. जे. अब्दुल कलाम एक व्यक्तिवेध', 'जे आर डी एक चतुरस्र माणूस', 'ब्रेनवेव्ह्ज', 'लेटर्स टु अ यंग सायंटिस्ट' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. त्यांच्या अनेक विज्ञानकथाही प्रसिद्ध आहेत.

प्रस्तुत पाठात प्रीतम नावाच्या मुलाची कौटुंबिक परिस्थिती, भावनिक स्थिती याचे वर्णन केले आहे. आई-वडिलांच्या प्रेमाला पारखे झालेल्या प्रीतमला लेखिकेच्या वात्सल्याने व आपलेपणाच्या वर्तनाने उभारले. तसेच विद्यार्थी व शिक्षक यांच्यातील नाते याचे हृदयस्पर्शी वर्णन प्रस्तुत पाठात आले आहे.

दुसरीच्या वर्गावरती मी नेहमीप्रमाणे हजेरी घेत होते. जोशी, कुलकर्णी, देशपांडे, पाटील या नामावलीत प्रीतम लुथरा हे वेगळे नाव माझ्या चटकन लक्षात आले.

'हजर.' एक किरकोळ मुलगा उठून उभा राहिला. किडकिडीत अंगकाठी, रया गेलेला युनिफॉर्म आणि खांदे पाडून दीनवाणे भाव चेहऱ्यावर असलेला प्रीतम मान खाली घालून हळूच माझ्याकडे बघत होता.

त्याच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकत मी पुढचे नाव उच्चारले. त्या वर्गाला मी पहिल्यांदाच वर्गशिक्षिका म्हणून शिकवत होते. ते वेगळे नाव म्हणूनच माझ्या लक्षात राहिले. थोडे दिवस गेले अन् उमजत गेले, की प्रीतम अगदी एकलकोंडा, घुमा, अबोल, कुणाशीही न मिसळणारा असा मुलगा आहे. तो कधीही कुठल्याही उपक्रमांमध्ये भाग घेत नाही. कसाबसा काठावरती पास होतो. वर्गात शिकताना खूपदा खिडकीबाहेर रिकाम्या आकाशाच्या तुकड्याकडे टक लावून बघत राहतो.

एकदा त्याच्या निबंधात इतक्या चुका निघाल्या, की मी त्याला थांबवून घेतले अन् म्हटले, ''नीट मराठीही लिहिता येत नाही तुला. तुझ्या आईवडिलांना मला ताबडतोब भेटायला सांग. तू दिवसेंदिवस आळशी होत चालला आहेस. तुझ्या पालकांना तुझा बेजबाबदारपणा कळायलाच हवा. साधे शब्द लिहिता येत नाहीत.'' घाबरत, अडखळत एकेक शब्द उच्चारत धीर एकवटून बोलल्यासारखा प्रीतम म्हणाला, ''बाई, माझे वडील सैन्यात जवान आहेत. ते दूर सरहद्दीवर असतात. चार वर्षांपूर्वी माझी आई वारली. मग मी त्यांच्याबरोबर एक वर्ष बंगालात होतो. त्यापूर्वी मी पंजाबीत शिकलो. याच वर्षी मी इथे मामा-मामींकडे आलो. मला मराठी नीट येत नसल्याने बाकी विषयही कळत नाहीत.''

''तुला आणखी कुणी नातेवाईक नाहीत ?'' माझा आवाज आता एकदम खाली आला होता.

''नाही बाई.''

''मग तुझ्या मामांनाच मला भेटायला सांग.''

''नको. नको. माझ्याबद्दल तक्रार गेली तर मामी खूप टाकून बोलते. मग मामा मला मारतात. मी नापास झालो, तर बाबांना सांगून ते मला बोर्डिंगात ठेवणार. तिकडे मुलांना खूप त्रास देतात. बाबांनी वारंवार विनंती केल्यामुळे मामांनी मला ठेवून घेतले आहे.'' त्याचे बोलके डोळे आता भीतीने भरले होते. माझ्याकडे याचना करत होते.

''आधीच मामीची तीन लहान मुले तिला खूप त्रास देतात. त्यात माझा त्रास नको.''

एरव्ही शब्दही न बोलणारा प्रीतम आजूबाजूला मुले नाहीत म्हणून भडाभडा बोलत सुटला होता.

त्याच्या विचित्र आडनावाचा, अबोलपणाचा, काही कळत नसल्याचा खुलासा कळला तसे माझ्या

काळजात काहीतरी लक्कन हलले. मी चटकन त्याला जवळ घेतले. क्षणभर त्याने अंग चोरून घेतलेले मला कळले. सात-आठ वर्षांच्या मानाने त्याचा देह खूपच किरकोळ, सुकल्यासारखा होता. मी त्याच्या चेहऱ्यावरून हात फिरवत म्हटले, ''प्रीतम, मला यातले काही ठाऊक नव्हते. असं कर, उद्यापासून दुपारच्या सुटीत लवकर डबा खा अन् खेळण्याऐवजी माझ्याकडे ये. मी तुला मराठी शिकवेन अन् मग बाकी विषयही तुला सहज समजतील.''

मी त्याला शिकवू लागले तसे तो मन लावून शिकू लागला. सुटीच्या दिवशी तो घरी यायचा. मी आणि आई दोघीच राहत होतो. मलाही वडील नव्हते. त्यामुळे पोरकेपणाचे काही समान धागे मला प्रीतमजवळ खेचत होते. त्याची भाषा सुधारली तसे इतरही विषय त्याला समजू लागले. त्याचा परीक्षेतला नंबर दहाच्या आसपास येऊ लागला. तसे त्याचे वडील पैसे पाठवत म्हणून मामामामी त्याला खायला घालत; पण आपण एखाद्या घरात उपरे आहोत, नको आहोत हे मुलाला चटकन समजते. ही नाकारलेपणाची भावना त्याला मिटवून खुरटून टाकत होती. माझ्या चार शब्दांनी, अधूनमधून कुरवाळण्याने त्याला जणू संजीवनी मिळाली. त्याची प्रकृतीही सुधारली. माझे कुठलेही काम तो आनंदाने करायचा. किंबहुना मी काम सांगितले, तर ते त्याला फार आवडायचे. अधूनमधून एखादा खास पदार्थ मी त्याला द्यायची, वाढदिवसाला लहानशी भेट द्यायची, तेव्हा त्याचा आनंद वेगळाच आहे, हे मलाही जाणवायचे.



दोन वर्षांनी माझे लग्न ठरले. सुदैवाने त्याच गावात मी राहणार होते. फक्त लग्न दुसऱ्या गावी होते. शाळेतल्या मुलांनी मी जाण्यापूर्वी एक छोटासा समारंभ करून मला भेट दिली. मी जरी नोकरी सोडणार नव्हते तरी त्यांनी समारंभपूर्वक मला केळवण केले. वर्गातला मॉनिटर उभा राहिला आणि ज्यांनी ज्यांनी पैसे दिले त्यांची नावे त्याने वाचली. त्यात अर्थातच प्रीतमचे नाव नव्हते. प्रीतम उठून सावकाश माझ्याजवळ आला आणि त्याने लहानसे पुडके माझ्या हातात ठेवले. मी ते उघडले तर त्यात दोन हैदराबादी खड्यांच्या जुन्या बांगड्या होत्या. त्यांतले एक-दोन खडे पडलेले होते आणि सोबत एक स्वस्त, उग्र वासाची अर्धवट भरलेली अत्तराची बाटली होती. त्या जुन्या बांगड्या बघून सगळीजणं हसायला लागली. प्रीतम ओशाळवाणा झाला. मी मुलांना दटावत चटकन त्या बांगड्या हातात चढवल्या अन् अत्तराची बाटली उघडून मनगटावर अत्तर लावले, वास घेतला अन् हसणाऱ्या एक दोघांना वास घ्यायला सांगितले अन् म्हटले, ''बघा, किती छान सुगंध आहे.''

माझ्या बोलण्यावर त्यांना 'हो' म्हणावेच लागले.

प्रीतमचा चेहरा उजळला. तो हळूच जवळ येऊन म्हणाला, ''बाई, माझ्याकडे पैसे नव्हते, म्हणून माझ्या आईच्या वापरलेल्या बांगड्या अन् अत्तर मी तुम्हांला दिले. तिची तेवढीच आठवण माझ्यापाशी आहे. खास माझ्या स्वत:च्या वस्तू आहेत त्या.''

मी चटकन त्याच्या केसावरून हात फिरवत म्हटले, ''प्रीतम, तुझी भेट, त्यामागच्या भावना मला समजल्या. मला आवडली तुझी भेट. दुसरे कुणी हसले तरी तू वाईट वाटून घेऊ नको.''

त्याच्या माझ्यातला अतूट धागा असा अधिकाधिक चिवट होत गेला. मी कधी कधी त्याच्या वर्गाला शिकवत नव्हते, तरीही ते धागे फुलत आमच्यामध्ये नाते विणत राहिले.

तो चांगल्या रीतीने मॅट्रिक झाला अन् मग होस्टेलला राहून बारावी झाला. त्याला एन. डी. ए. मध्ये प्रवेश मिळाल्याचे त्याने मला पत्राने कळवले. दरवर्षी त्याचे नव्या वर्षाच्या शुभेच्छा देणारे पत्र येई. मी माझ्या वाढत्या संसारात गुरफटले होते त्यामुळे उत्तर पाठवेनच असे नव्हते; पण तो अगदी काटेकोर होता.

ट्रेनिंग संपवून सेकंड लेफ्टनंट म्हणून तो नियुक्त झाला. 'पासिंग आऊट परेड' साठी त्याने मला पुण्याला यायला विशेष निमंत्रण दिले. जायचे यायचे तिकिटही पाठवले आणि मी गेले. स्टेशनवर फुले घेऊन प्रीतम उभा होता. इतका देखणा, भरदार दिसत होता, की मीच आता त्याच्या खांद्याखाली येत होते. त्या दिवशी आई-वडिलांना विशेष जागी बसवतात. त्याचे वडील येऊ शकले नव्हते. त्या जागी त्याने मला बसवले होते. माझ्या हातातल्या त्या बांगड्या त्याने बघितल्या अन् माझे हात हातात घेत त्यावर त्याने डोके टेकवले. त्यावर पडलेले पाणी मला कळले. त्याला जेव्हा छातीवर बिल्ला लावला गेला तेव्हा मी जोराने टाळ्या वाजवल्या.

मला निरोप देताना तो म्हणाला, ''बाई, तुम्ही येणार म्हणून मला खात्री होती. गेल्या जन्मी मी नक्कीच तुमचा मुलगा होतो.''

चार वर्षांनी त्याच्या लग्नाची पत्रिका तिकिटासह माझ्या हातात पडली. मध्यंतरी त्याचे वडील वारल्याचे त्याने कळवले होते. माझ्या सर्व अडचणी बाजूला सारून मी लग्नाला गेले. त्याच्या आयुष्यातला हा सर्वांत महत्त्वाचा प्रसंग मी हजर राहून पाहावा, अशी त्याची इच्छा मला जणू टेलिपथीने कळली.

त्याच्या सासरच्या लोकांनी त्याच्या आईसाठी म्हणून घेतलेली साडी त्याने मला घ्यायला लावली अन् माझ्या पुढ्यात जोडीने वाकताना त्याने पत्नीला सांगितले, ''या बाई म्हणजे माझ्या एकुलत्या एक कुटुंबीय आहेत. त्या भेटल्या नसत्या तर कॅप्टन लुथरा नावाचा आज कुणी अस्तित्वात नसता.'' मी देऊ केलेल्या बांगड्या परत करत तो म्हणाला, ''त्या तुमच्याजवळ आहेत ही भावना मला पुरेशी आहे. तुमच्याजवळच त्या असू दे. केव्हाही मुलगा म्हणून हाक मारा, मी धावत येईन.''

## स्वाध्याय

**प्र. १. तुलना करा.**

| शाळेतील प्रीतम | सेकंड लेफ्टनंट प्रीतम |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |

**प्र. २. कारणे लिहा.**

(अ) प्रीतमला मराठी नीट येत नसे, कारण····

(आ) पोरकेपणाचे समान धागे लेखिकेला प्रीतमकडे खेचत होते कारण····

**प्र. ३. प्रतिक्रिया लिहा.**

(अ) प्रीतमच्या निबंधातील चुका बघून त्याच्या वर्गशिक्षिकेची प्रतिक्रिया–

(आ) अबोल प्रीतम भडभडा बोलल्यानंतर वर्गशिक्षिकेची प्रतिक्रिया–

**प्र. ४. लेखिकेच्या कृती व तिच्या कृतीतून अभिव्यक्त होणारे गुण यांची जुळणी करा.**

| उदाहरण | गुण |
|---|---|
| (अ) बाईंनी प्रीतमला जवळ घेतले. | (१) कार्यनिष्ठा |
| (आ) दुपारच्या सुट्टीत बाईंनी प्रीतमला मराठी शिकवले. | (२) संवेदनशीलता |
| (इ) प्रीतमने दिलेल्या बांगड्या बाईंनी हातात चढवल्या. | (३) निरीक्षण |
| (ई) एका दृष्टिक्षेपात बाईंनी अंदाज केला. | (४) ममत्व |

**प्र. ५. प्रीतमला स्वत:बद्दल जाणीव असलेली पाठातील वाक्ये शोधा व लिहा.**

**प्र. ६. खालील वाक्प्रचारांचा योग्य अर्थ लिहा.**

(अ) रया जाणे.

(१) शोभा जाणे. (२) शोभा करणे. (३) शोभा येणे.

(आ) संजीवनी मिळणे.

(१) जीव घेणे. (२) जीवदान मिळणे. (३) जीव देणे.

**प्र. ७. कंसांत दिलेल्या सूचनेप्रमाणे वाक्यांचे रूपांतर करा.**

(१) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी. (आज्ञार्थी करा.)

(२) हा तलाव अतिशय सुंदर आहे. (उद्‌गारार्थी करा.)

(३) बापरे! रस्त्यावर केवढी ही गर्दी! (विधानार्थी करा.)

(४) नेहमी खरे बोलावे. (नकारार्थी करा.)

**प्र. ८. स्वमत.**

(अ) प्रीतम आणि त्याच्या बाई यांच्यातील भावनिक नातेसंबंधांविषयी तुमचे मत सविस्तर लिहा.

(आ) तुमच्या जीवनातील शिक्षकाचे स्थान स्पष्ट करा.

**उपक्रम :** (१) 'प्रीतम' या कथेचे नाट्यरूपांतर करा. वर्गात सादरीकरण करा.


(२) कथेची मध्यवर्ती कल्पना तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

FXV5A2

# २०. आपुले जगणे... आपुली ओळख!

**संदीप खरे** (१९७३) : प्रसिद्ध कवी. 'मौनाची भाषांतरे', 'नेणिवेची अक्षरे', 'तुझ्यावरच्या कविता', 'अग्गोबाईऽऽ ढग्गोबाईऽऽ' हे काव्यसंग्रह प्रसिद्ध. स्वरचित कवितांचे अनेक म्युझिक अल्बम प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. हिंदी व मराठी चित्रपट व मालिकांसाठी गीतलेखन. शासनाच्या विविध पुरस्कारांनी सन्मानित.

दैनंदिन जीवनात वागताना काय करावे व काय करू नये, याविषयीचे भाष्य कवीने सोप्या शब्दांत कवितेतून व्यक्त केले आहे. प्रस्तुत कविता 'अग्गोबाईऽऽ ढग्गोबाईऽऽ' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.



आपुले जगणे... आपुली ओळख ! उपरे, अर्धे जोडु नको
दिवा होऊनि उजळ जगाला... चाकू होऊन कापु नको !

नित्य घडावे वाचन, लेखन... क्षण कार्याविण दवडु नको
नित्य परवचा, व्यायामाविण झोप घ्यावया पडु नको !

पावित्र्याची पांघर वस्त्रे, होऊन पटकुर पसरु नको
शोभेहुनही श्रेष्ठ स्वच्छता, आदिमंत्र हा विसरू नको !

नम्र रहावे, सौम्य पहावे; उगा कुणास्तव अढी नको
उगा कुणाला खिजवायला करू तयावर कडी नको !

नको फुकाची 'हांजी हांजी'... लोचट, बुळचट काहि नको
परंतु दिसता उदात्त काही; ताठर माथा मुळि नको !

पेल शक्तीने गोवर्धन तू, कंस होऊनी छळु नको
नको उगाचच वाद परंतु कुणि धमकवता पळु नको !

अपुल्या अपुल्या दु:खासाठी नयनी अश्रु ठेवु नको
पण दुसऱ्यास्तव वाहो करुणा; व्यर्थ कोरडा राहु नको !

तुडवित राने खुशाल जावे, नव्या पथाला भिउ नको
ज्यावर श्रद्धा प्राणाआतुन ते केल्याविण राहु नको !

जेथे वाटा, तेथे काटा ! उगा भेदरुन अडु नको
करता हिंमत, जगात किंमत ! भेकड, गुळमुळ रडु नको !


कर्तृत्वाचे घडवी वेरुळ, कर्तव्याला मुकु नको
मातेसह मातिचे देणे फेडायाला चुकु नको !

## स्वाध्याय

**प्र. १. खालील कोष्टक पूर्ण करा.**

| मानवाने करायच्या गोष्टी | मानवाने टाळायच्या गोष्टी |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |
| (४) | (४) |

**प्र. २. आकृती पूर्ण करा.**




**प्र. ३. खालील शब्दसमूहांचा अर्थ स्पष्ट करा.**

(अ) पटकुर पसरु नको.

(आ) व्यर्थ कोरडा राहु नको.

(इ) कर्तृत्वाचे घडवी वेरुळ.

**प्र. ४. काव्यसौंदर्य.**

(अ) 'पावित्र्याची पांघर वस्त्रे, होऊन पटकुर पसरु नको', या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(आ) 'शोभेहुनही श्रेष्ठ स्वच्छता, आदिमंत्र हा विसरू नको', या ओळीत दडलेल्या अभियानाची गरज तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**प्र. ५. स्वमत.**

(अ) स्वकर्तृत्व घडवताना कवितेतील विचार कसा मार्गदर्शक ठरेल, ते सविस्तर लिहा.

(आ) आपल्या जगण्यातून आपली ओळख व्हावी, यासाठी पाळायची पथ्ये कवितेच्या आधारे लिहा.

# ❁ विश्वकोश (स्थूलवाचन)

विश्वकोशाची ओळख करून देणारा हा पाठ आहे. आपल्या ज्ञानविषयक गरजा आणि व्यावहारिक सोयी यांच्या दृष्टीने सर्वविषयसंग्राहक मराठी विश्वकोश अधिक उपयुक्त आहे. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात. हे संदर्भ पाहणे, या संदर्भांचा अभ्यास करणे या भाषासमृद्धीच्या दृष्टीने अत्यंत आनंददायी प्रक्रिया आहेत. हा आनंद मिळावा, विश्वकोश पाहण्याची गरज कळावी व विश्वकोश अभ्यासण्यासाठी सवय लागावी या हेतूने स्थूलवाचन विभागात समावेश असलेला हा पाठ महत्त्वपूर्ण आहे.

तुमच्या शाळेच्या अथवा तुमच्या गावातील सार्वजनिक ग्रंथालयात तुम्ही गेलात तर अनेक 'जाड-मोठ्ठी पुस्तके' असलेलं काचेचं कपाट तुमचं लक्ष वेधून घेईल. मराठीच्या विविध साहित्यसंपदेसोबत मराठी विश्वकोश, मराठी व्युत्पत्तीकोश, मराठी चरित्रकोश, मराठी शब्दकोश असलेली ही ग्रंथसंपदा हा प्रत्येक वाचनालयाचा 'मानबिंदू'! या पाठात आपण मराठी विश्वकोशाचा परिचय करून घेऊया.

मानव्यविद्या, विज्ञान व तंत्रज्ञान यांतील सर्व विषयांचे अद्ययावत ज्ञान एका व्यापक योजनेखाली संकलित करणारा असा हा मराठी विश्वकोश! मराठी विश्वकोशामध्ये मानव्यविद्या शाखेअंतर्गत धर्म व तत्वज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, साहित्य, इतिहास, दृश्यकला, भूगोल आणि क्रीडा या विषयांचा समावेश केला आहे. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान शाखेअंतर्गत भौतिकी, रसायनशास्त्र, गणित-सांख्यिकी, जीवशास्त्र, अभियांत्रिकी, कृषिविज्ञान, माहिती तंत्रज्ञान संगणकविज्ञान, वास्तुकला, भूविज्ञान आणि वैद्यक या विषयांचा समावेश केला आहे. कोणताही एक महत्त्वाचा विषय अन्य अनेक विषयांशी संलग्न असतो. अशा अनेक विषयांची एकत्र माहिती मिळाली, तर तो विषय नीट समजून घेता येतो.

मुख्य विषय व त्याचे संलग्न विषयांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी मराठी विश्वकोश उपयोगी पडतो.

शिक्षणाचा प्रसार जसा झपाट्याने वेग घेऊ लागला, भाषासमृद्धीची वाटचाल जशी दमदार होऊ लागली, तशी 'भाषा' सर्वार्थाने खुलू लागली. भाषा-भाषांमध्ये आदानप्रदान होऊन अनेक नवे शब्द मराठीत रूढ झाले. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे समाजाच्या वैज्ञानिक व तांत्रिक गरजा वाढू लागल्या. अनेक नवे शब्द अस्तित्वात आले. शब्दांना नवीन आयाम प्राप्त झाले. त्याचबरोबर सर्वविषयसंग्राहक विश्वकोशाची गरज निर्माण झाली.

उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा होत गेलेला अधिकाधिक स्वीकार, मराठीमध्ये निर्माण झालेली संदर्भग्रंथाची तीव्र गरज आणि शासनव्यवहाराची भाषा म्हणून राज्यपातळीवर मराठीला मिळालेली मान्यता या पार्श्वभूमीवर मराठी भाषेतील सर्वविषयसंग्राहक विश्वकोशाची गरज अधोरेखित झाली.

मराठी विश्वकोशाच्या निर्मितीमध्ये पहिले संपादक म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. तसेच मराठी विश्वकोशाचा परिचय करून घेताना ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचेही कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात त्यांनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. तथापि त्यानंतरच्या काळात विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात ज्ञानविकासाच्या क्षेत्राचा ज्या वेगाने विकास झाला, हा विकास लक्षात घेऊन विद्यमान ज्ञानक्षेत्रांचा सर्वांगीण परिचय करून देणारा 'मराठी विश्वकोश' हा आश्वासक प्रयत्न आहे.

● **विश्वकोश असा तयार झाला...**

(१) विषयवार तज्ज्ञांच्या समितीची रचना केली गेली.

(२) प्रत्येक विषयाच्या नोंदीची शीर्षके निश्चित केली गेली.

(३) मुख्य, मध्यम, लहान नोंदीतील मुद्द्यांची टाचणे तयार केली गेली.

(४) नोंदींच्या मर्यादा आखून टाचणांमध्ये तशा सूचना दिल्या गेल्या.

(५) प्रत्येक विषयातील मुख्य, मध्यम, लहान व नाममात्र नोंदींच्या याद्या तयार केल्या गेल्या.

(६) अकारविल्ह्यानुसार या याद्या लावण्यात आल्या.

१९७६ यावर्षी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने मराठी विश्वकोशाचा पहिला खंड प्रकाशित केला. आत्तापर्यंत विश्वकोशाचे वीस खंड प्रकाशित झाले आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी कुमार विश्वकोशाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग १ व भाग २ प्रकाशित करण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी विश्वकोशाच्या वीस खंडातील माहिती मोबाईल ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

● **विश्वकोश यासाठी पाहावा....**

(१) आपल्या ज्ञानविषयक गरजा मराठीतून भागवण्यासाठी.

(२) जागतिक ज्ञानक्षेत्राचे क्षितिज विस्तारताना आपल्या विविध विषयांतील कुतूहलास इष्ट वळण लागण्यासाठी.

(३) अभिव्यक्तीला योग्य चालना मिळण्यासाठी.

(४) सर्व प्रकारचे प्रगल्भ व सूक्ष्म ज्ञान मराठी भाषेतून मिळण्यासाठी.

● **विश्वकोश असा पाहावा...**

(१) शब्द अकारविल्ह्यांनुसार (अनुज्ञेय) पाहावेत.

(२) बाराखडीतील स्वर व व्यंजन यांच्या स्थानानुसार अनुक्रमे दिलेला शब्द पाहावा.

एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाप्रमाणे मराठी भाषेतील सर्वविषयसंग्राहक विश्वकोश तुमच्या ज्ञानात, तुमच्या भाषिक समृद्धीत निश्चित भर घालणारा आहे. भाषा व त्यासंबंधीचे संदर्भ.... यांची गंमत अनुभवण्यासाठी विश्वकोश पाहण्याची सवय लावून घ्यायला हवी.

तुमच्या माहितीसाठी तुम्हांला आवडणारी 'शब्दकोडी' व फॅशन्सपैकी 'केशरचना' या शब्दांचे संदर्भ विश्वकोशाचा आधार घेऊन येथे देत आहोत.

तुम्हांला आवडणारे कोणतेही शब्द... त्यांचे अर्थ.... संदर्भ विश्वकोशातून शोधा व भाषेचे अनोखे अंग जाणून घ्या. विश्वकोश आता www.marathivishwakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### १) शब्दकोडे

● **पुढील पानावरील शब्दकोडे दिलेल्या वाक्यांच्या आधारे सोडवा.**

(१) 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहाचे कवी.

(२) एका साहित्यिकाचे आडनाव 'श्रीपाद कृष्ण....'

(३) तुरुंगात असतानादेखील ज्यांची काव्यप्रतिभा बहरून येई, असे साहित्यिक(देशभक्त).


(४) 'सुधारक' चे संपादक.

(५) कवी यशवंत यांचे आडनाव.

(६) विनोदी साहित्य लिहिणाऱ्या एका साहित्यिकाचे आडनाव.

(७) मालतीबाई बेडेकर यांनी वापरलेल्या टोपणनावातील आडनाव.

(८) कवी कुसुमाग्रज यांचे आडनाव.




‘आर्थर विन’ याने २१ डिसेंबर १९१३ च्या न्यूयॉर्क वर्ल्डच्या अंकात अशा प्रकारचे पहिले शब्दकोडे प्रसिद्ध केले.

‘हाच तो चहा’ हे वाक्य दोन्हीकडून जरी शब्द वाचले तरी एकसारखेच बनते. अशा प्रकारच्या शाब्दिक करामतीवर आधारित हे कोडे असावे, असा अंदाज आहे.

मुलांनो, विविध वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यांमध्ये येणारी शब्दकोडी तुम्ही सोडवता आणि भाषेची गंमत अनुभवता.

| |
|---|
| (१) फ्रेंच भाषा शब्दकोड्यांसाठी सर्वांत सोईस्कर भाषा. |
| (२) कॅनडामध्ये फ्रेंच व इंग्रजी शब्द योजून द्विभाषिक शब्दकोडे लोकप्रिय. |
| (३) रशियामध्ये शब्दकोड्याचा वापर प्रचारासाठीही. |
| (४) शब्दकोड्यासाठी चिनी भाषेचा अपवाद. |

शब्दकोड्यांचे प्रकार

- वर्तुळाकार
- बदामाच्या आकाराची
- फुलीच्या खुणेच्या आकाराची
- शास्त्रीय किंवा गुप्त लेखनाची
- चौकोनांची कोडी
- चित्रचौकटी
- साम्याकारी
- अनियमित आकाराची

अशा कल्पनांवर आधारलेले अनेक प्रकार रूढ आहेत. संगणकीय खेळांमध्ये विविध प्रकारच्या शाब्दिक कोड्यांचा समावेश होतो.

| |
|---|
| (१) प्रसिद्ध विधान अथवा अवतरण देऊन त्यांचे लेखक ओळखण्यास सांगणे. |
| (२) एका शब्दातील अक्षरे फिरवून नवीन शब्द तयार करणे. |
| (३) काही शब्दांतील रिकाम्या अक्षरांच्या जागा भरणे. |

## (२) केशभूषा



आजकाल केसांच्या वेगवेगळ्या स्टाईल्स करणे, तुम्हांला सर्वांना आवडते; पण मुलांनो, तुम्हांला आश्चर्य वाटेल, की पौराणिक काळापासून आकर्षक केशरचनेचे आकर्षण सर्व समाजात होते.

**केशभूषेत अंतर्भूत असणाऱ्या गोष्टी**

- केस कापणे
- धुणे
- नीट करणे
- विंचरणे
- कुरळे करणे
- सरळ करणे


**उद्देश**

- केशभूषेचा मुख्य उद्देश → आकर्षकता किंवा सौंदर्य वाढवणे
- केशभूषेचा सामाजिक उद्देश → सामाजिक संकेतानुसार प्रतीकात्मक केशभूषा

आदिम लोक केसांना मातीचा लेप लावून आपला पराक्रम व गुणवैशिष्ट्ये दाखवण्याकरिता त्यात विजयचिन्हे आणि पदके लावत.

केशभूषेचा उगम यातून झाला असावा.

केस इतरांना दिसू न देण्याच्या पुरातन स्त्रीच्या प्रयत्नातून केशबंधाची कल्पना पुढे आली असावी.





अजिंठा, वेरूळ, कोणार्क, खजुराहो येथील शिल्पाकृतींत आढळणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या केशरचना उल्लेखनीय आहेत. या प्राचीन केशरचनांचे अनुकरण भारतीय स्त्रिया करताना आढळतात.

## स्वाध्याय

**प्र. १. टीप लिहा.**

(१) विश्वकोशाचा उपयोग–

(२) विश्वकोशाची निर्मितिप्रक्रिया–

**प्र. २. 'शब्दकोडे सोडवल्यामुळे भाषिक कौशल्य वाढते', याविषयी तुमचे मत लिहा.**

**प्र. ३. विश्वकोश पाहण्याचे तुम्हांला लक्षात आलेले फायदे लिहा.**

**प्र. ४. केशभूषेचे उद्‌देश सांगून त्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, ते स्पष्ट करा.**

**प्र. ५. विश्वकोशाचा उपयोग तुम्हांला मराठी भाषेतील ज्ञान प्राप्त करण्यासाठी कसा होऊ शकेल, ते लिहा.**

### भाषा सौंदर्य

विश्वकोश अकारविल्ह्यांनुसार (अनुज्ञेय) पाहावा हे आपल्याला कळले. त्यासाठी संपूर्ण वर्णमाला (आता ॲ व ऑ हे स्वर धरून) आपल्याला क्रमाने मुखोद्‌गत असायला हवी. त्या योग्य वर्णांची आणि त्यांची उच्चारस्थाने, परिपूर्ण आकलनही असावयास हवे. (उदा., स्वर, स्वरादी, व्यंजन, महाप्राण, मृदू व्यंजने, कठोर व्यंजने, अनुनासिके).

**खालील कोडे सोडवा व त्याच्या शेवटच्या रकान्यातील वर्णांचे विशेष ओळखा.**

(१) पैसे न देता, विनामूल्य.
(२) पाणी साठवण्याचे मातीचे गोल भांडे.
(३) जिच्यात रेतीचे प्रमाण खूप जास्त असते अशी जमिनीची जात.
(४) रहस्यमय.
(५) खास महाराष्ट्रीयन पक्वान्न. पोळ्या, मोदक, करंज्या यांमध्ये हे भरतात.


| | | | |
|---|---|---|---|
| (१) | | | |
| (२) | × | | |
| (३) | | | |
| (४) | × | | |
| (५) | | | |

वरील कोडे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे उत्तर तुम्हांला सोडवायचे आहे. हे कोडे सोडवल्यावर तुम्हांला निश्चितच भाषेचे सौंदर्य व गंमत लक्षात येईल. अशा कोड्यांचा अभ्यास करा. त्यातील भाषिक वैशिष्ट्ये समजून घ्या व अशी विविध वैशिष्ट्यांची कोडी तयार करण्याचा तुम्ही स्वत: प्रयत्न करा.

# मैत्री तंत्रज्ञानाशी



**वडील :** (सोनालीच्या आईशी बोलताना.) ''अगं, लाईटबिल भरण्याची अंतिम तारीख आजच आहे; पण आज माझी ऑफिसमध्ये महत्त्वाची मीटिंग आहे. काय करावं बरं?''



**सोनाली :** ''बाबा, एवढी काळजी कशाला करता, लाईट बिलच भरायचंय ना? आणा इकडे, मी भरते एका मिनिटांत, तेही उन्हातान्हात बाहेर न जाता, धावपळ न करता.''



**सोनाली :** ''अगं आई, एवढं आश्चर्यानं काय पाहतेस? आपल्याकडे संगणक आहे, आंतरजाल आहे. आता आपण ऑनलाईन बिल घरच्या घरी भरू शकतो. चल आई, मी तुला ऑनलाईन बिल कसे भरायचे ते दाखवते.''




**आई :** (मुलगी ऑनलाईन बिल भरते. आई-वडील तिच्या कृतींचे निरीक्षण करतात.) ''शाबास बाळा! किती आत्मविश्वासाने संगणक हाताळतेस. बाजार करणं, बिलं भरणं, खरेदी करणं, वस्तू विकणं, असे ऑनलाईन व्यवहार मलाही शिकव.''

* **कमी वेळात, कमी कष्टात ऑनलाईन प्रक्रियेद्‌वारे तुम्ही कोणकोणती कामे करू शकता? त्यांची यादी करा.**
* **ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी सध्या उपलब्ध असलेले विविध ॲप्स कोणते? त्यांचा वापर कसा करावा याविषयीची माहिती मिळवा.**

# ♦ उपयोजित लेखन


## १. पत्रलेखन

आपल्या मनातील भावना, विचार, मते मुद्देसूदपणे, सुसंबद्ध पद्धतीने अपेक्षित व्यक्तीपर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे उत्तम माध्यम म्हणजे पत्रलेखन होय.





यापूर्वीच्या इयत्तांमध्ये अनौपचारिक व औपचारिक पत्रलेखनाचे काही प्रकार तुम्ही अभ्यासले आहेत.

स्वपरिचय, मागणी व तक्रार या औपचारिक पत्रप्रकारांचा यावर्षी आपण अभ्यास करणार आहोत.




✻ कृतिपत्रिकेत एखादी सूचना, आवाहन, निवेदन, जाहिरात इत्यादी प्रकारांपैकी एक कृती दिलेली असेल, ती कृती, विषय समजून घेऊन तुम्हांला पत्रलेखन करायचे आहे.




**औपचारिक पत्राची मांडणी**

१. पत्राच्या सुरुवातीला उजव्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचे नाव, हुद्दा, पिनकोडसह पत्ता, दिनांक, ई-पत्ताही असावा.
२. डावीकडे योग्य मायना लिहावा. संबंधित व्यक्तीचे नाव, हुद्दा, पत्ता लिहावा.
३. कृतीत विशेषनाम दिले असेल तरच ते लिहावे. अन्यथा प्रति, प्रेषक याठिकाणी 'अ. ब. क.' असा उल्लेख करावा.
४. औपचारिक पत्रात पत्राचा 'विषय' लिहिणे आवश्यक आहे.
५. विषयानंतर त्या खाली महोदय/महोदया असे लिहून पत्रलेखनास सुरुवात करावी.
६. विषयानुसार लेखन व भाषा असावी.
७. शेवटी योग्य ते संबोधन वापरून समारोप करावा.

**लक्षात घ्या, औपचारिक पत्रलेखन ही एक कला आहे, तसेच ते शास्त्रही आहे.**

**नमुना १**

- **खालील निवेदन वाचा–**

संबंधित विषयासाठी स्व–परिचय पत्र तयार करा.

अभिनव विद्यालय, लातूर.

आंतरशालेय क्रीडास्पर्धा

क्रीडास्पर्धेतील कबड्डी संघात प्रवेश मिळणेबाबत

स्पर्धा दि.२६, २७, २८ डिसेंबर

क्रीडा विभाग प्रमुख

**स्वपरिचय पत्राचे मुद्दे**

| | |
|---|---|
| (१) संपूर्ण नाव | (५) उंची– वजन– |
| (२) पत्ता | (६) शैक्षणिक पात्रता |
| (३) संपर्क क्रमांक | (७) इतर आवडणारे खेळ |
| (४) जन्मतारीख | (८) पूर्वी प्राप्त केलेले यश |

**नमुना २**

**रसिक कला मंडळ**

समर्थनगर, पुणे

आकाशकंदील आणि पणत्या तयार करण्याची कार्यशाळा

दि.४ व ५ नोव्हेंबर सायं–४ ते ७

प्रवेश नि:शुल्क

प्रथम येणाऱ्यास प्राधान्य

वस्तू खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध

**स्थळ** रानडे सभागृह, समर्थनगर, पुणे

कार्यशाळेत तयार झालेल्या वस्तू खरेदीची मागणी करणारे पत्र संबंधित मंडळाला लिहा.

किंवा

तुम्ही खरेदी केलेल्या वस्तूंमध्ये काही वस्तू सदोष आढळल्या, याविषयी तक्रार करणारे पत्र संबंधित मंडळाला लिहा.

**विद्यार्थ्यांसाठी :**

स्वपरिचय पत्र हा कृतिपत्रिकेतील लेखन विभागात (मूल्यमापनात) समाविष्ट नाही. मात्र, विद्यार्थ्यांसाठी हा प्रकार/घटक उपयुक्त असल्याने, त्याचा अभ्यास करावा.

# २. बोलीभाषांचा परिचय

'दर बारा कोसांवर भाषा बदलते', या उक्तीनुसार वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या बोलींचा कमी-अधिक प्रभाव असतो.

'एखाद्या विशिष्ट लोकसमुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेले आणि त्यामुळे प्राय: मुद्दाम शिकावे न लागणारे व विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सहजगत्या उपयोगी पडणारे ध्वनिरूप साधन म्हणजे बोली.' प्रसिद्ध भाषाशास्त्रज्ञ ना. गो. कालेलकर यांनी केलेली बोलीभाषेची ही व्याख्या.

**बोलीभाषेचे पैलू**

- समृद्ध भाषेचा सांस्कृतिक ठेवा
- म्हणी
- शब्दसंग्रह
- भाषासमृद्धी
- परिसरानुसार बोलीभाषेचे प्राबल्य
- बोलीभाषेची उपयुक्तता
- सहज भाषेचा आविष्कार

**आधुनिक काळात बोलीभाषांकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वागतशील.**

✻ पाठ्यपुस्तकात आपण प्रातिनिधिक स्वरूपात पावरी व कातकरी या बोलीभाषांचा परिचय व्हावा म्हणून त्यातील गद्यउतारे व त्यांचे प्रमाणभाषेतील रूपांतरे समाविष्ट केली आहेत. विद्यार्थ्यांनी या बोलीभाषेतील उताऱ्यांच्या अभ्यासाबरोबर आपल्या परिसरातील बोलीभाषांचा अभ्यास करावा, त्यांतून भाषिक समृद्धी व साहित्याचा परिचय असा दुहेरी आनंद मिळवावा.

## १. पावरी बोली

हांजपल्ली टाईम. आश्रम शालान् पटांगणम् पुऱ्या खेलता ओता. राजेश नावान् पुर्यो एखलूज् झेंडान् खांबह् लागीन बठलू ओतो. तेरी आई हाते खतायलू ओतू. तेरू बाबू, आप्पू दिहूँ आश्रम शालाम मेकीन आवलू ओतू. पाचवीन् वर्गाम् तेरं नाव आपलं ओतं. तिन्हा आवनू नि ओतो शू आयहि विचार करीन कयतू ओतू, ''आई, बाबाहो नाहा करीन कय... तोहों सोडीन मेहे शिकनेहे नि जाणू चेतहो.'' आई मुंडोपर, डिलोपर आथ फिरविन कयली, ''बेटा, तोंहो खुप मोटू अयनू चेतहं. तु खुप मोटु सायेब व्हवनू जूवे यं आयहीन् हिवणं चेतहं... बेटा. आईन् हिवणं पुरं नि कन्यूके? हवं के... अन्तू खुप शिकनू पंडहे. तिन्हानं करता थोडा दिहं आई दखू सेटू सेहे? नि बेटा, मी कायम तोहं हातेज सेहे. आईन्-बेटान् इन्द्र नात्र गारा-पानीअहाल रयतलं. इनू दुय्यहं केदिहि अलग अयतलं देखलं के? नि ने..... राजेश अगल कयत्लू, ''आई मे हे रूटू कुण कुहनिन् खावाड हे? मेहे हुवणीखेर कुण थापडीन हुवाडहे? मारं वगे कुण रयहे? मेहे पेटोहाते कुण लागाड हे'' खुप विचार करीन पुसतु. आई आहती कयलं, ''पुऱ्या शिकीन खूप मोटू अयणेन् करता तोहज् मोटू अयणू पडहे. आईन् आंगल सुडीन रयणू पडहे. सोतान् पायपर उबं रयणू पडहे...'' ''पुण आई मी एखलू केहेकं रयहि?'' राजेश कयत्लू. ''तू एखलू काहरी शेऽ बेटा? देड-दुर्दहव तारा भाई तोहं हाते अहते...उठते...जा खेलणेह...'' राजेश हाते वर्गामार्दन संतोषह खेलणेहे हाततू ओतू. राजेशह तेरी चुक मोन्दु पौडी अती. डुला नुसला... ने उठतु उठतु पुऱ्या हाते खेलणेहे गायब अय गयलू.

**रूपांतर**

संध्याकाळची वेळ. आश्रम शाळेच्या पटांगणात मुले खेळत होती. राजेश मात्र झेंड्याच्या खांबाला टेकून एकटाच बसला होता. तो आपल्या आईवर रागावला होता. त्याचे वडील, आप्पांनी आज दुपारीच त्याला आश्रमशाळेत पोहोचवलं. पाचवीच्या वर्गात त्याचं नाव घातलं. त्याला यायचं नव्हतं. तो आईला विनवून म्हणाला, ''आई... आप्पाला नको म्हणून सांग ना... तुला सोडून मला नाही जायचं शिकायला...'' आई त्याच्या पाठीवरून, डोळ्यावरून मायेने हात फिरवत म्हणाली, ''बाळ, तुला खूप मोठ्ठं व्हायचं आहे. तू खूप मोठ्ठा साहेब व्हावा, हे आईचं स्वप्न आहे... बाळ, आईचं स्वप्न पूर्ण नाही करणार? हो ना.. मग त्यासाठी खूप शिकावं लागेल. त्यासाठी आईपासून थोडे दिवस दूर जावं लागेल. तुला काय वाटतं? मी तुझ्यापासून दूर आहे? नाही बाळ, मी सदैव तुझ्याजवळच आहे. माय-लेकरू यांचं नातं चिखल-पाण्यासारखं असतं. या दोघांना कधी वेगळं झालेलं पाहिलं आहे? नाही ना...'' राजेश पुढे म्हणाला, आई मला भाकर चुरून कोण खाऊ घालणार? मला झोपतांना कोण थोपटणार? माझी बाजू कोण घेणार? मला पोटाशी कोण धरणार?'' अनेक प्रश्न विचारले. आई हसत म्हणाली, ''बाळ, शिकून मोठं होण्यासाठी आताच तुला मोठं व्हावं लागेल. आईचं बोट सोडून जगावं लागेल, स्वावलंबी व्हावं लागेल...'' ''पण आई मी एकटा-कसा राहू?'' ''तू एकटा कुठे आहेस बाळ तुझे दीड-दोनशे भाऊ तुझ्या सोबत असतील... उठं बरं...जा खेळायला...'' राजेशच्या वर्गातला संतोष त्याला खेळायला बोलावत होता. राजेशला आपली चूक लक्षात आली. त्याने आपले डोळे पुसले आणि उड्या मारत खेळणाऱ्या मुलांमध्ये गायब झाला.

**– संजीव गिरासे.**

## २. कातकरी बोली

भुकणे मरूणा ये दिवस नाग्याना सहन करहताहात. पण त्यावर उपाय भेटता नाही. काम करूनी तयारी असून काम नाही. भुकने दिवस काढुला लागत. पहिला लढा नंतरने आर्थिक मंदिना ते पारतंत्र दिवस ब्रिटीसाहने सत्तेना, नाहि मार्गदर्शन, नाहि हितचिंतक ये परिस्थितीत कण्या देवधर्मनी कना उपास तपास, शाळेना तर नाव नाही. गावातल्यासाठी शाळा, गाववाल्यासाठी देवला आपण फक्त त्याहने साठी ढोराने सारखी काम करायचा भेटना ती खायचा, नायतन आर्धेच भुकवर निजी जायचाये पण दिवस जातील, चांगला दिवस येतील देवलातले मिटिंगीत आखलेले पुढाऱ्याही शब्द त्याला आठवतात. ''चाला उठा जागा हया!''

### रूपांतर

भुकेने मरणे हे दिवस नाग्याला सहन होत नव्हते; पण त्यावर उपाय सुचत नव्हता. काम करण्याची तयारी असून, काम नाही. भुकेले राहून दिवस काढावे लागत होते. पहिले युद्ध, नंतर आर्थिक मंदी त्यात पारतंत्र्याचे दिवस, ब्रिटिशांच्या सत्तेचे मार्गदर्शन नाही, कोणी हितचिंतक नाही. या परिस्थितीत कसले देवधर्म नी कसले उपासतापास. शाळेचे तर नावच नाही. गावातल्यांसाठी शाळा. गाववाल्यांसाठी मंदिर. आपण फक्त त्यांच्यासाठी जनावरासारखे काम करायचे, मिळेल ते खायचे, नाहीतर अर्धपोटी झोपी जायचे. हे पण दिवस जातील. चांगले दिवस येतील. देवळातील सभेमध्ये पुढाऱ्यांनी काढलेले शब्द त्याला आठवत होते. 'चला उठा, जागे व्हा!'

– **अनिल वाघमारे.**

**विद्यार्थ्यांसाठी :**

वरील दोन्ही बोलीभाषांतील उतारे त्या भाषांचा परिचय व्हावा, आपापल्या परिसरातील बोलीभाषांचा अभ्यास करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून पाठ्यपुस्तकात समाविष्ट केले आहेत. कृतिपत्रिकेमध्ये बोलीभाषेवरील कृती किंवा रूपांतर विचारणे अपेक्षित नाही. मात्र, विद्यार्थ्यांना हा घटक उपयुक्त असल्याने त्याचा अभ्यास करावा.

# ३. कथालेखन

उपयोजित लेखनप्रकारांमध्ये 'कथालेखन' हा घटक विद्यार्थ्यांच्या सृजनशील लेखनाला वाव देणारा आहे. कल्पना, नवनिर्मिती, स्वभाषेत प्रकटीकरण हे या वयोगटाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहेत. कथालेखनाच्या योग्य सरावाने भावी कथालेखक घडू शकतील.

कथाविषयानुसार कथांचे विविध प्रकार पडतात.

उदा.,

(१) शौर्यकथा

(२) विज्ञान कथा

(३) बोधकथा


(४) जातक कथा

(५) ऐतिहासिक कथा

(६) रूपककथा

(७) विनोदी कथा इत्यादी.

कथालेखनाचे महत्त्वाचे घटक जाणून घेण्यासाठी खालील मुद्द्यांचा अभ्यास करून कथालेखन तंत्र जाणून घेऊया.




**खालील मुद्द्याचा सविस्तर विचार करूया.**

**(१) कथाबीज–**

कथालेखन ही कल्पकतेवर आधारलेली कला आहे. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथालेखन करताना कथाबीजाच्या विषयास अनुसरून दैनंदिन निरीक्षण, वाचन, अनुभव, सृजनशील कल्पना, भावना यांचा विचार करून कथाबीज फुलवावे.

**(२) कथेची रचना–**

कथेला प्रारंभ, मध्य व शेवट असावा. कथेची सुरुवात आकर्षक असावी. वाक्यांची रचना पाल्हाळीक नसावी. अर्थपूर्ण छोटी छोटी वाक्ये असावीत. कथेचा मजकूर उत्कंठावर्धक असावा. कथेतील आशयाला काहीतरी वळण असेल तर उत्कंठा अधिक वाढते. कथा नेहमी भूतकाळातच लिहावी.

**(३) कथेतील घटना व पात्रे–**

कथाबीजानुसार कथेतील पात्रे व घटना निवडाव्यात, त्या कथाबीजाला पुढे नेऊ शकतील. घटना घडण्याचे स्थळ सुसंगत निवडावे. पात्र, घटना व स्थळांच्या वैशिष्ट्यांचे बारकावे जाणून घेऊन वर्णन करावे. वर्णन चित्रदर्शी असावे.

**(४) पात्रांचे स्वभाव विशेष–**

कथेतील आशयाला समर्पक असे पात्रांच्या स्वभाव विशेषांचे व त्या अनुषंगिक वर्तनांचे वर्णन करावे. उदा., राग आला तर– त्याने हाताच्या मुठी करकचून आवळल्या इत्यादी.

**(५) कथेतील संवाद व भाषा–**

कथेत निवडलेल्या परिसराला कथाबीजाला अनुसरून कथेची भाषा असावी. आलंकारिक भाषेचा वापर करून कथेची परिणामकारकता वाढवता येते. विरामचिन्हांचा योग्य वापर करावा. संवादाची परिणामकारकता विरामचिन्हांमुळे निर्माण होते. पात्रांच्या तोंडी पात्राच्या वैशिष्ट्यांच्या गरजेनुसार ग्रामीण भाषा व बोलीभाषा यांचा वापर सहजतेने करायला हवा. कथेमध्ये वाक्प्रचार, म्हणी यांचा सुयोग्य वापर करावा.

**(६) शीर्षक, तात्पर्य–**

संपूर्ण कथेचा आशय, कथेतील मूल्य/संदेश व्यक्त करणारे शीर्षक असावे. कथेतून मिळणारा संदेश/मूल्य किंवा कथेतील वैशिष्ट्यपूर्ण आशय प्रतिबिंबित करणारे तात्पर्य असावे.

**कथालेखन पूर्णत: सृजनशील कल्पकतेवर अपेक्षित आहे. कथाबीज विस्तारासाठी, अपूर्ण कथा पूर्ण करण्यासाठी वेगळा नावीन्यपूर्ण विचार किंवा कल्पना करणे अपेक्षित आहे.**

**विद्यार्थ्यांनो, तुमच्या सृजनशील कल्पनेला खूप धुमारे फुटू शकतात. त्यांना फक्त निरीक्षण व कल्पकतेने अभिव्यक्त करा.**

## कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती

(१) कथाबीजावरून (दिलेल्या विषयांवरून) कथालेखन.

(२) मुद्द्यांवरून कथालेखन.

(३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

(४) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे किंवा उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) दिलेल्या शीर्षकावरून कथालेखन.


कथालेखनासाठी वरीलपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.


# कथालेखन नमुना

- खालील अपूर्ण कथा वाचा. तुमच्या विचार व कल्पनेने कथा पूर्ण करा.

प्रकाश आणि अन्वर जीवश्चकंठश्च मित्र. एकाच वर्गात, एकाच बाकावर बसणारे, एकत्र डबा खाणारे सच्चे सोबती. दिवाळीची सुट्टी लागली आणि अन्वर आईबरोबर गावाला गेला. आता सुट्टी संपेपर्यंत हे मित्र भेटणार नव्हते. दिवाळीची सुट्टी संपायला दोन दिवस होते. प्रकाशला अन्वरच्या भेटीची ओढ लागली होती. सुट्टीतला अभ्यास पूर्ण करण्यासाठी प्रकाशने दप्तर काढले. पुस्तकात त्याला अन्वरने लिहिलेली चिठ्ठी मिळाली. त्याने उत्सुकतेने चिठ्ठी वाचायला घेतली आणि.....

- तुम्ही लिहिलेल्या कथेला योग्य शीर्षक द्या.
- कथा तयार करताना व लिहिताना तुम्ही कोणकोणत्या गोष्टी विचारात घेतल्या? ते लिहा.





# ४. जाहिरात

'जाहिरात' या शब्दातच तिचा अर्थ सामावलेला आहे. इंग्रजीत 'जाहिरात'साठी Advertisement हा शब्द आहे. यातील 'Ad' चा अर्थ 'कडे' आणि 'verfo' चा अर्थ 'वळणे' किंवा 'लक्ष वेधून घेणे' असा आहे. म्हणूनच लोकांचे लक्ष एखाद्या गोष्टीकडे वेधून घेते ती जाहिरात होय. यादृष्टीने विविध क्षेत्रांतील निर्मित वस्तू, उत्पादने यांची ग्राहकाकडून मागणी निर्माण करणारी जाहिरात ही एक कला आहे.

आजच्या संगणक व माहिती-तंत्रज्ञानाच्या युगातील इंटरनेट व मोबाईल क्रांतीमुळे जाहिरातक्षेत्राची कक्षा अधिक विस्तारत चालली आहे.

कला, क्रीडा, शिक्षण, आरोग्य, व्यापार, दळणवळण, प्रसारमाध्यम, मनोरंजन अशा सर्वच क्षेत्रात जाहिरातीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, म्हणूनच 'युग' आहे जाहिरातींचे...' असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

### • जाहिरातक्षेत्रातील भाषेचा वापर

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्त्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्त्वाची ठरते.

### • जाहिरातीची भाषा-

(१) आकर्षक मजकूर.

(२) साधी, सोपी, सरळ, आकर्षक, स्पष्ट व ओघवती भाषा.

(३) बुद्धीला फारसा ताण न देणारी.

(४) ग्राहकाच्या मनात विश्वासार्हता निर्माण करणारी.

(५) शब्दांचा गैरवापर न केलेली.

(६) लोकभावनांची जोड, जाण असणारी.

(७) वेचक, अर्थपूर्ण, प्रसन्न व परिणामकारक.


(८) लयबद्ध व वाचकांशी सुसंवाद साधणारी.


(९) विनोदाची झालरही असणारी.

(१०) मानवी भावभावनांची संवेदनशीलता जाणणारी व जपणारी.


उदाहरणादाखल जाहिरातीचे काही नमुने आपण पाहिले, तर त्यातून जाहिरातकलेची विविध रूपे आपल्या लक्षात येऊ शकतात.


## आजचे युग जाहिरातीचे युग





**लोकांच्या मनात एखाद्या वस्तूविषयी आवड निर्माण करणे हा जाहिरातीचा हेतू.**




**जाहिरातलेखनाच्या मूल्यमापनाच्या कृती.**


- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन.
- दिलेल्या मुद्द्यांवर जाहिरात लेखन.

या व्यतिरिक्त वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.

## जाहिरात लेखन नमुना

नमुना क्र.१


• खालील जाहिरात वाचून त्याखालील कृती करा.




(अ) कृती करा.




(आ) शब्दजाल पूर्ण करा.




(इ) वरील जाहिरात अधिक आकर्षक बनवण्यासाठी तुम्ही कोणकोणते बदल सुचवाल?

नमुना क्र. २

- **खाली दिलेल्या शब्दांवरून आकर्षक जाहिरात तयार करा.**

शब्द– छत्री, रेनकोट, पाऊस

**लक्षात घ्या.**

✻ कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय समजणे अपेक्षित.
✻ शब्दरचना व वाक्यरचना समजण्यास सोपी असणे आवश्यक.
✻ आलंकारिक व काव्यमय शब्दांचा वापर– जाहिरात आकर्षक होण्यास मदत.
✻ काळानुरूप जाहिरातीतील भाषा वापरणे आवश्यक.

**दिलेल्या रिकाम्या जागी जाहिरातीचा आकर्षक नमुना तयार करून लिहा.**

# ५. मुलाखत

एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून तिचे विचार, जीवनकार्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे मुलाखत होय.

स्वत: कमीत कमी बोलून समोरच्या व्यक्तीला बोलते करण्याची कला मुलाखतकाराने संपादन करावी लागते.

**मुलाखतकाराने लक्षात ठेवावे**

- पूर्वज्ञान
- मुलाखतीचा हेतू
- व्यक्तीविषयी माहिती

**मुलाखतकाराने घ्यावयाची काळजी**

- वातावरणात कृत्रिमता नसावी.
- शब्दांत जवळीक
- कमी बोलणे
- सहज संवाद
- योग्य आदर

**मुलाखतीचे दोन भाग**

- प्रत्यक्ष मुलाखत घेणे
- शब्दबद्ध करणे

## मुलाखतीची वैशिष्ट्ये

| मुलाखत घेताना | मुलाखत लिहिताना |
|---|---|
| (१) प्रश्नोत्तर स्वरूपात संवाद. | (१) सुरुवातीस प्रास्ताविक/परिच्छेद. |
| (२) मोकळे वातावरण. | (२) नेमके प्रश्न-उत्तर सविस्तर. |
| (३) समोरच्या व्यक्तीचा मान राखत संवाद. | (३) मूळ आशयाला धक्का न लावता आकर्षक संपादन. |
| (४) व्यक्तीला बोलते करणे. | |

मुलाखत घेणे, मुलाखत देणे, मुलाखत वाचणे व मुलाखत ऐकणे या आनंददायी प्रक्रिया आहेत.

बालमित्र चित्रकला स्पर्धेत तुमच्या शाळेतील चि. अमित/कु. अमिता घोलप यास/हीस राज्य पातळीवर प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यासंदर्भात त्याची/तिची मुलाखत घ्या.

# मुलाखत लेखन नमुना

विद्यार्थी मित्रांनो,

खालील मुलाखत ही काल्पनिक असली, तरी त्यातील विषय व त्याचे गांभीर्य महत्त्वाचे आहे. व्यसनाधीनता हा सुदृढ व निकोप जीवनाला लागलेला शाप असतो. त्यापासून जाणीवपूर्णक अन् निर्धाराने दूर असलेल्या व्यक्तींनाच सुखी व निरामय जीवनाचा सूर गवसतो. हा आनंदी जीवनाचा मंत्र जाणून घ्या व कोणत्याही लोभाला कधीच बळी पडू नका. स्वत:चे व पर्यायाने समाजाचे निकोप मनच राष्ट्रप्रगतीसाठी आवश्यक असते.

नमस्कार! आज व्यसनमुक्ती दिन. त्या निमित्ताने सोनेगाव या गावात व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करणारे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शैलेश वाघ यांची अक्षय चौधरी यांनी घेतलेली ही मुलाखत वाचा. त्यांच्या 'मुक्तानंद' व्यसनमुक्ती केंद्राबाबत अधिक जाणून घेऊया.

प्रश्न : सर नमस्कार, 'मुक्तानंद' हे केंद्र स्थापन करण्याची गरज का भासली?

उत्तर : अनेक पालक नेहमीच माझ्याकडे व्यसनमुक्तीबाबत सल्ला घेण्यास व मुलांवर उपचार करण्यास येत. त्यांची गरज व इच्छा ओळखून मी हे केंद्र स्थापन केले.

प्रश्न : डॉक्टर, ही किशोरवयीन मुले व्यसनाधीनतेकडे का वळली असतील, असे तुम्हांला वाटते?

उत्तर : छान प्रश्न विचारला. व्यसनाधीन होण्याची कारणे बरीच आहेत. काही मुले अबोल, आत्मविश्वासाची कमतरता, शैक्षणिक अपयश, कौटुंबिक ताणतणाव, प्रेमभंग यांमुळे मानसिक नैराश्याच्या भावनेला बळी पडून त्यातून बाहेर पडण्यासाठी मित्रपरिवाराचा आधार घेतात. त्यात संधी मिळाल्यास ती व्यसनांकडे आकर्षित होतात.

प्रश्न : मुले एकदम व्यसनाधीन बनतात की सुरुवातीला दुसरे काही सेवन करतात?

उत्तर : खरं तर, सुरुवातीला गंमत व नंतर सवय म्हणून व्यसन केले जाते. या गोष्टी 'स्लो पॉइझनिंग' आहेत हे त्यांना कळत नाही.

प्रश्न : डॉक्टर, या मुलांमध्ये काही वेगळी अशी लक्षणे आढळतात का?

उत्तर : त्यांना झोप येत नाही, त्यांचे हात-पाय थरथरतात, त्यांना भीती वाटते, कायम अस्वस्थता जाणवत असते; पण ते स्वत:हून कबूल करत नाहीत. दीर्घ संवादानंतरच ती व्यसनाधीनता लक्षात येते.

प्रश्न : व्यसनाधीनतेचे वैयक्तिक आणि सामाजिक दुष्परिणाम होतात का?

उत्तर : किशोरवयीन मुलांमधील व्यसनाधीनता त्यांच्यासाठी व समाजासाठीही घातक असते.

प्रश्न : डॉक्टर, या परिस्थितीत आपण कोणता सल्ला द्याल?

उत्तर : पालकांनी मुलांशी मोकळा संवाद साधावा. विचार, मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावे. घरातील वातावरण सुसंवादी व मैत्रीपूर्ण असावे. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याची सर्वांनीच जाण ठेवावी.

# ६. संवाद लेखन

संवाद लेखन या घटकाचे प्रमुख उद्दिष्ट विद्यार्थ्यांना सुसंवादी बनवणे. ‘संवाद कौशल्य’ हा प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा अपरिहार्य पैलू आहे. उत्कृष्ट संवाद साधणारी व्यक्ती त्यांच्या कार्यक्षेत्रात स्वत:चे वेगळेपण सिद्ध करते. विशिष्ट विषयावर व्यक्त केलेली मतमतांतरे, त्या विषयावरचे चिंतन व विषयानुरूप सुसंगत असे संभाषण म्हणजे संवाद होय.

**संवाद**

**हे असावे**

(१) संवाद कोणाकोणात सुरू आहे, याची स्पष्ट कल्पना लेखनातून यावी.
(२) संवादांतील दोन व्यक्ती भिन्न स्तरावरील (वय, व्यवसाय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी) असतील तर त्यानुसार भाषा बदलती असावी.
(३) संवादातील वाक्ये सोपी, सुटसुटीत, अनौपचारिक असावीत.
(४) संवादाला योग्य समारोप असावा.
(५) संवाद वाचल्यावर त्या विषयावरचा सर्वांगीण विचार वाचकापर्यंत पोहोचावा.

**हे नसावे**

(१) हो-नाही स्वरूपाचे संवाद नसावेत.
(२) बोलणे पाल्हाळीक नसावे.
(३) मध्येच बोलणे थांबवल्याची भावना नसावी.
(४) संवाद ओढून-ताणून केलेला नसावा.
(५) संवाद मुद्दे सोडून भरकटणारा नसावा.

**संवादासाठी आवश्यक स्वभाव वैशिष्ट्ये**

(१) संवेदनशीलता
(२) गुणग्राहकता
(३) अनाग्रही वृत्ती
(४) विवेकशीलता
(५) भावनिकता
(६) विश्वासार्हता
(७) स्वागतशील रसिक वृत्ती

ही वैशिष्ट्ये अंगी असतील तरच माणूस सुसंवादी बनतो.

## संवाद लेखन नमुना

### संगणकाचा महिमा

| आजोबा | नात |
| --- | --- |
| (रघुनाथराव) | (शिवानी) |

**आजोबा** : बरेच दिवस झाले चेन्नईला येऊन! मला मुंबईला गेलं पाहिजे.

**शिवानी** : आजोबा 'तुम्ही खूप दिवस राहणार आहे', असं म्हणाला होतात.

**आजोबा** : अग दिवसभर मी एकटा असतो घरात. इथे मराठी वर्तमानपत्रसुद्‌धा मिळत नाही. मी वेळ कसा घालवणार?

**शिवानी** : एवढंच ना आजोबा! तुम्हांला रोज मराठी वर्तमानपत्र वाचायला मिळेल, मी व्यवस्था करते.

**आजोबा** : ते कसं काय शक्य आहे बुवा?

**शिवानी** : आजोबा, हे संगणकाचे युग आहे. नेटवरून काही सेकंदातच जगातील कोणतीही गोष्ट आपण घरबसल्या उपलब्ध करून घेऊ शकतो. आता जगात अशक्य असं काहीच राहिलं नाही.

**आजोबा** : पोरी, हे सगळं मी ऐकलंय खरं....

**शिवानी** : आजोबा, मी नेट सुरू केलंय. कोणतं वर्तमानपत्र वाचायचंय तुम्हांला?

**आजोबा** : 'सर्वकाळ'.

**शिवानी** : थांबा हं, मी आता ही अक्षरे संगणकावर टाईप करते.

**आजोबा** : अरे व्वा! सगळी पाने दिसायला लागली की इथे... सगळ्या बातम्या वाचतो आता!

**शिवानी** : आजोबा, तुम्ही आता तुमच्या मित्रांना ई-मेल पण करू शकता.

**आजोबा** : खरंच पोरी, या संगणकाने संपूर्ण जगालाच एकदम जवळ आणलंय!

# ७. वृत्तान्त लेखन

वृत्तान्त लेखन

घडलेल्या घटनेचे नेमके वर्णन

* वृत्तान्त लेखनात राग, आनंद, दु:ख, आश्चर्य इत्यादी तीव्र भावना व्यक्त करणे अपेक्षित नाही.

**लक्षात ठेवा**

- कल्पनेला अजिबात वाव नाही
- सत्यकथन व वस्तुनिष्ठता यांस महत्त्व

*** सभा, संमेलने, शिबिरे, कार्यशाळा यांच्याविषयीच्या एखाद्या घटनेसंबंधी सविस्तर व क्रमवार माहिती सांगणे म्हणजे वृत्तान्त लेखन होय.**

वृत्तान्त लेखन

- आटोपशीर व आकर्षक पद्धतीने लेखन आवश्यक
- तारीख, वेळ, ठिकाण देणे आवश्यक

**लक्ष द्या.**

वृत्तान्त

- मथळा
- स्पष्टीकरण
- घटनांचा क्रम
- लहान वाक्ये व लहान परिच्छेद
- नकारात्मक भाषा नको
- भाषा वास्तवदर्शी असावी
- स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अचूक उल्लेख
- घटनेचे अचूक, परिपूर्ण, स्पष्ट लेखन

## वृत्तान्त लेखन नमुना

### ❀ मराठी भाषा दिन उत्साहात साजरा ❀

**रत्नागिरी, ता. २८ फेब्रुवारी :** रत्नागिरी येथील समर्थ विद्यामंदिर येथे मराठी भाषा दिन दिनांक २७ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे मराठी विषयाचे सेवानिवृत्त शिक्षक श्री. म. सा. कुलकर्णी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सकाळी ठीक ७.३० वाजता इयत्ता पाचवी ते इयत्ता सातवीमधील विद्यार्थ्यांनी गावातून ग्रंथदिंडी काढली. सकाळी ९.०० वाजता शाळेतील सर्व विदयार्थी, शिक्षक शाळेच्या सभागृहात एकत्र जमले. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे व मा. मुख्याध्यापक स्थानापन्न झाले.

सरस्वतीच्या प्रार्थनेने कार्यक्रमाला सुरुवात झाली. कविता वाचन, मराठी गीतगायन, कथाकथन, कादंबरीतील काही अंशांचे अभिवाचन इत्यादी प्रकारचे सुंदर कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले.

'कविवर्य कुसुमाग्रजांचे मराठी भाषेतील योगदान व मराठी भाषेचे महत्त्व' या विषयावर प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी प्रतिनिधी सुशांत कांबळे याने उपस्थितांचे आभार मानले. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

- **खालील विषयावर वृत्तान्त लेखन करा.**

**नवमहाराष्ट्र विद्यालय**
विमाननगर, वसई
**जागतिक विज्ञानदिन सोहळा**
जागतिक विज्ञानदिनानिमित्त सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ
डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान
प्रमुख उपस्थिती– .........

२८ फेब्रुवारी
**वेळ**
सकाळी ११ वाजता

**स्थळ–**
डॉ. होमीभाभा सभागृह

# ८. लेखनकौशल्य

## निबंध लेखन

या इयत्तेत आपण विविध लेखनकौशल्यांच्या प्रकारांचा अभ्यास करणार आहोत. निबंधलेखन म्हणजे विषयानुरूप केलेली विचारांची मुद्‌देसूद मांडणी होय. एखाद्या विषयाच्या अनुषंगाने आपल्या मनात येणारे विचार, भावना, कल्पना, स्वानुभव यांना प्रभावी भाषेत मुद्‌देसूदपणे मांडणे म्हणजे निबंधलेखन. निबंधलेखनात लिहिणाऱ्याच्या विचारांचे प्रतिबिंब पडत असते. लेखनकौशल्याचा विकास व अभिव्यक्तीक्षमतेचा विकास हे निबंधलेखन घटकाचे प्रमुख उद्‌दिष्ट आहे.

**निबंधलेखनासाठी आवश्यक गोष्टी.**

- निरीक्षण
- वाचन
- बहुश्रुतता
- शब्दसंपत्ती
- चिकित्सक विचार
- कल्पना
- भावना
- अनुभव
- चिंतन
- प्रभावी भाषा
- विषयानुरूप शैली

पाठ्यपुस्तकातील निबंधलेखन–लेखनकौशल्यांतर्गत आपण इयत्ता नववीसाठी प्रसंगलेखन, आत्मकथन, कल्पना विस्तार या निबंधप्रकारांचा अभ्यास करूया.

कल्पकता, तर्कसंगती, विचाराची सुसंगत व सुसंबद्‌ध मांडणी ही लेखनकलेची काही वैशिष्ट्ये आहेत. आपण निबंध लिहितो म्हणजे विषयाच्या अनुषंगाने असलेले आपले वाचन, चिंतन, निरीक्षण, विचार व भावना यांना शब्दबद्‌ध करतो. आपले अनुभव मुद्‌देसूदपणे मांडतो. त्यासाठी प्रत्येक अनुभवाकडे संवेदनशीलतेने पाहता यायला हवे. आपल्या शब्दांतील अनुभव इतरांच्या मनाला भिडेल असा मांडता यायला हवा. शब्दांतून भाषासौंदर्य व्यक्त व्हायला हवे.

वाचन, आकलन, निरीक्षण, विचार, भावना, कल्पना व अनुभव यांची प्रभावी शब्दांत अभिव्यक्ती हा लेखनकौशल्य विकासाचा गाभा आहे.

निबंधलेखनासाठी आवश्यक क्षमता, कौशल्ये, अभ्यास घटक हे सर्वच निबंधप्रकाराबाबत समान असले तरी प्रत्येक निबंध प्रकाराचे स्वत:चे वेगळेपण असते. निबंध प्रकार हाताळताना ती वैशिष्ट्ये लक्षात घेणे, ती अभ्यासणे, सुयोग्य उपयोग करणे आवश्यक ठरते.

**(१) प्रसंगलेखन–**

आपण अनुभवलेली, ऐकलेली, एखादी घटना, एखादा प्रसंग, एखादा विचार, एखादी समस्या आपल्याला नेहमीच विचार करायला प्रवृत्त करीत असते. तो प्रसंग जर आपल्या बाबतीत घडला तर आपली प्रतिक्रिया काय असेल? असा विचार केल्यास आपण प्रसंगाचे विश्लेषण तटस्थपणे करू शकतो. अशा विचारांना, भावनांना, संवेदनशीलतेची, भावनिकतेची जोड देऊन शब्दबद्ध केले, तर तो प्रसंग वाचणाऱ्याच्या मनाला भिडतो त्या प्रसंगाचे शब्दचित्र डोळ्यांसमोर उभे राहू शकते. आपल्या भावना प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्यही व्यक्त होऊन लेखनकौशल्याचा, अभिव्यक्ती क्षमतेचा विकास साध्य होऊ शकतो.

**प्रसंगलेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे :**

(१) प्रसंगाची, घटनेची कल्पना
(२) सूक्ष्म निरीक्षण
(३) भावनांची अभिव्यक्ती
(४) चित्रदर्शी संवेदनशील लेखन

## प्रसंगलेखन नमुना

• **खालील बातमी वाचा.**




वरील सोहळ्याला तुम्ही उपस्थित होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

## (२) आत्मकथन–

**आत्मलेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्‌दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार.

(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोगिता, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.

(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे.

(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रितीने कल्पना मांडणे.

(५) संपूर्ण लेखन करताना भाषा प्रथमपुरुषी एकवचनी असावी.

### आत्मकथन नमुना

**वर्गातील बाक तुमच्याशी बोलतोय अशी कल्पना करून त्याचे आत्मकथन लिहा.**



## (३) कल्पना विस्तार

### कल्पना विस्तार करताना लक्षात घ्यावयाचे मुद्‌दे

(१) कल्पनाप्रधान लेखनकौशल्याचा उद्‌देशच कल्पना करता येणे हा आहे.

(२) मुख्य कल्पना निबंधाच्या शीर्षकातच दडलेली असते.


(३) एकातून दुसरी कल्पना अशी कल्पनांची साखळी लेखनकौशल्य वाढवते.

(४) कल्पना वास्तवाला धरून किंवा गमतीदार असावी.

(५) विषयासंबंधी सुचलेल्या कल्पनांचा विस्तार करावा.

**मी पक्षी झाले तर.....**

चौकटीतील मुद्द्यांच्या आधारे कल्पना करून आत्मकथनपर लेखन करा.



- खालील उतारा वाचा. त्याचे निरीक्षण करा. एकाच उताऱ्यात म्हणी, वाक्प्रचार, आलंकारिक भाषा, नावीन्यपूर्ण शब्दसमूह यांचा सुयोग्य व चपखल उपयोग आढळतो. यातूनच मराठी भाषेची भाषिक समृद्धी अधोरेखित होते.

बंडू म्हणजे अतिशय धडपड्या व खळाळत्या उत्साहाचा झरा. तो त्याच्या धाकट्या बहिणीला म्हणाला, ''ताई तुम्ही या खुर्चीवर स्थानापन्न व्हा. मी आपल्या हातांवर न भूतो न भविष्यति अशी सुरेख मेंदी रेखाटतो.'' मेंदी म्हणजे तायडीचा जीव की प्राण. ती खुर्चीवर बसताच टेबलावरच कोन घेऊन तो तिच्याजवळ बसला. त्याने जशी तिच्या हातावर मेंदी रेखाटायला सुरुवात केली, तसे त्याला जाणवले, की मेंदी रेखाटने आपल्या आवाक्याबाहेरचे आहे; पण हे कबूल करणे त्याच्या जिवावर आले. यातून पळवाट काढण्यासाठी तो तायडीला म्हणाला, ''अगं, नीट बस.'' तुझ्या हातावर मेंदी काढताना माझी किती त्रेधातिरपीट उडते आहे. त्याचे हे वाक्य ऐकून घरात खसखस पिकली. आजी हळूच म्हणाली, ''नाचता येईना, अंगण वाकडे'', तर स्वयंपाक आटोपून आजी शेजारी आई बसली आणि गालातल्या गालात हसत म्हणाली, 'उथळ पाण्याला खळखळाट फार.' हे ऐकून बंडूच्या नाकाला मिरच्या झोंबल्या; पण करणार काय? त्याची अवस्था इकडे आड तिकडे विहीर अशी झाली होती. आजी आईकडे पाहत डोळे मिचकावत म्हणाली, ''अगं आपला बंडू आहेच, झाकले माणिक आणि वाकबगार. सगळ्या कलाकौशल्यांत आपला हातखंडा असावा, असंच त्याला वाटतं.'' तेवढ्यात हातातला पेपर बाजूला सारत त्याचे बाबा म्हणाले, ''बंडूराजे, तायडीच्या हातावर उजेड पाडून तारे तोडून झाले असतील, तर पानावर बसूया का? पोटात कावळे ओरडायला लागलेत आमच्या. आधी पोटपूजा करूया, मग वाटल्यास तुम्ही मेंदीच्या मोहिमेवर कूच करा आणि मोहिमेची इतिश्री करा.''

- खाली दिलेल्या रिकाम्या चौकटीत शब्दसमूह, वाक्प्रचार व म्हणी यांचा वापर करून उतारा तयार करा.

## 'बोलीभाषेतील सांस्कृतिक ठेवा'

महाराष्ट्रातील सर्वच बोलीभाषांचा भाषिक, सांस्कृतिक ठेवा समृद्ध आहे त्याचबरोबर आनंददायीही आहे. या विविध बोलीतील काही प्रातिनिधिक उदाहरणे वाचा व त्याचा आनंद घ्या. त्याचबरोबर इतर बोलीभाषांमधील भाषिक समृद्धीचा शोध घ्या.

- **पावरी बोली– (कोडे)**

(१) जंगलमा रमणेवाली रातला पाणी पिणारी बुड इंडा मेकणे–वाली ची कुण?

–जंगलात राहणारी, लाल पाणी पिणारी, पांढरी अंडी देणारी, ती कोण? ☐

(२) एक दाद ने पेटम दाने

– एका दादाच्या पोटात अनेक दात– ☐

**म्हणी**

(१) कागला काल भुईला भार–

खायला काळ अन् भुईला भार.

(२) रूपड्या ताकली गुपज्या माकली–

लेकी बोले सुने लागे.

(३) करनू नी तीना डरनू ती–

कर नाही त्याला डर काय?

(४) खिसाम काय आदलू नी अत्ती गुलवतलू–

खिशात दमडीं नाही अन् चालला हत्ती घ्यायला.

- **वऱ्हाडी बोली– म्हणी**

(१) चुली सांगे मुलीले, दोन्ही पाय चुलीले–

दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान, स्वत: कोरडे पाषाण

(२)काखेत घेतलं टिचुकलं सारं गवत इचकलं–

काखेत कळसा अन् गावाला वळसा

- **झाडी बोली– म्हणी**

(१) मा तसि लेक्/मसेला येक्–

एका माळेचे मणी

(२) होता जोन्द्रा पानावर्ता दिस्ते–

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात.

## • हे शब्द असेच लिहा.

विद्यार्थ्यांनो, प्रत्येक शब्दाला स्वत:चा अर्थ असतो. वर्णाचा अर्थपूर्ण समूह म्हणजे शब्द. ही शब्दांची व्याख्या हेच दर्शवते. त्याचप्रमाणे शब्दाला संदर्भानुसारही अर्थ प्राप्त होतो.

उदा., (१) आज माझ्या आजीची पाठ खूप दुखत होती.

(२) आज मी 'वंद्य वन्दे मातरम्' कविता पाठ केली.

पाठ या एकाच शब्दाचे दोन्ही वाक्यांतील अर्थ भिन्न आहेत. याचप्रमाणे 'शब्द' जर चुकीचा लिहिला गेला तरी त्याचा अर्थ बदलू शकतो. अगदी वेगळ्याच अर्थाचा शब्द तयार होऊ शकतो.

उदा., (१) **कृतज्ञ**– उपकाराची जाण असलेला

**कृतघ्न**– उपकाराची जाण न ठेवणारा

(२) **पाणी**– पिण्याचे पाणी/जल

**पाणि**– हात

पाणी शब्द पाणि असा लिहिल्याने केवळ ऱ्हस्व (ईकार), दीर्घ (ईकार) लिहिल्याने शब्दाचा अर्थच बदलला.

यावरून लक्षात येते, की आपले म्हणणे अपेक्षित योग्य अर्थवाही होण्यासाठी शब्दांचे सुयोग्य म्हणजेच लेखननियमांनुसार लेखन होणे आवश्यक असते.

खाली काही असे शब्द दिलेले आहेत, की जे नेहमी तुमच्या वाचनात, लेखनात येतात; परंतु ते चुकण्याची शक्यताही असते. या शब्दांचा अभ्यास करा. त्यांचे उच्चारानुसार लेखन (योग्य लेखन नियमांनुसार) समजून घ्या. त्यांचा सराव करा व त्यांचे योग्य उपयोजन करा.

| | | | |
|---|---|---|---|
| अंत:करण | गरिबी | प्रीती | व्यक्तिमत्त्व |
| अनिर्णित | चमत्कृती | सत्कृत्य | गरीब |
| अर्थशास्त्रज्ञ | जीवितकार्य | महत्त्व | सामूहिक |
| अस्तित्व | ठरावीक | मूर्तिपूजा | सार्वजनिक |
| आशीर्वाद | तत्त्वज्ञान | मैत्रीण | सार्वत्रिक |
| उज्ज्वल | दातृत्व | मैत्रिणीला | साहित्यिक |
| उन्मेष | दीपप्रज्वलन | वक्तृत्व | सूचना |
| ओजस्वी | दृष्टिकोन | वाङ्मय | स्फूर्ती |
| औचित्य | निर्मिती | विषण्ण | सृजनशीलता |
| ऋणनिर्देश | निर्भर्त्सना | वैफल्य | स्मृतिदिन |
| कर्तृत्व | निष्क्रिय | वैशिष्ट्य | स्मृती |
| कीर्ती | परिस्थिती | हळूहळू | हार्दिक |
| कुत्सित | परीक्षा | क्रीडांगण | हृदय |

## • पारिभाषिक शब्द

ज्ञानप्रसाराच्या विविध माध्यमांत आणि जीवन व्यवहारात सतत बदल होत असतात. साहजिकच त्या त्या ज्ञानक्षेत्रात वा व्यवहारात प्रचलित शब्दांहून वेगळे शब्द वापरले जातात. विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील माहिती, संकल्पना यांच्या प्रकटीकरणाला योग्य ठरतील असे शब्द वापरण्याची गरज असते. भाषिक व्यवहाराच्या या वेगळेपणातून ज्ञानक्षेत्रांची वा व्यवहारांची परिभाषा सिद्ध होते. अशा परिभाषेतून शास्त्रभाषेचा व ज्ञानभाषेचा विकास होत असतो. बदलते जीवनव्यवहार, वाढत्या गरजा आणि विस्तारणारी ज्ञानक्षेत्रे यांनुसार 'पारिभाषिक संज्ञा' निर्माण होतात.

पारिभाषिक पदनामांच्या वापरामुळे किंवा पारिभाषिक संज्ञांच्या वापरामुळे विचार, संकल्पना यांच्या प्रकटीकरणात विशिष्टता, निर्दोषता येते. पारिभाषिक संज्ञांचा मूळ उद्देश व्यवहारसापेक्ष भाषेचे उपयोजन हा आहे.

शिक्षण, विविध शास्त्रे, प्रशासन, आरोग्य, समाज, उद्योग, व्यापार, न्याय, आर्थिक व्यवहार, कला, संस्कृती इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये आवश्यकतेनुसार पारिभाषिक संज्ञा उपयोगात आणल्या जातात. या संज्ञांमुळे ज्ञानव्यवहार अधिक प्रभावी आणि सुस्पष्ट होतात. या दृष्टीने पारिभाषिक संज्ञांना अनन्यसाधारण महत्त्व असते.

| | | | |
|---|---|---|---|
| Calligraphy | सुलेखन | Secretary | सचिव, चिटणीस |
| Academic Qualification | शैक्षणिक अर्हता | Children's Theatre | बालरंगभूमी |
| Action | कार्यवाही/कृती | Comedy | सुखात्मिका |
| Census | जनगणना | Agent | अभिकर्ता/प्रतिनिधी |
| Casual Leave | नैमित्तिक रजा | Category | प्रवर्ग |
| Anniversary | वर्धापनदिन | Bio-data | स्व-परिचय |
| Corporation | महामंडळ, निगम | Bonafide Certificate | वास्तविकता प्रमाणपत्र |
| Daily Wages | दैनिक वेतन, रोजंदारी | Book Stall | पुस्तकविक्री केंद्र |
| Lyric | भावगीत | Dismiss | बडतर्फ |
| Magazine | मासिक-पत्रिका | Event | घटना |
| Medical Examination | वैद्यकीय तपासणी | Exchange | देवाण-घेवाण, विनिमय करणे |
| Express Highway | द्रुतगती महामार्ग | | |
| News Agency | वृत्तसंस्था | Official Record | कार्यालयीन अभिलेख |
| Exhibition | प्रदर्शन | Orientation | निदेशन, उद्बोधन |
| General Meeting | सर्वसाधारण सभा | Part Time | अंशकालीन, अर्धवेळ |
| Government Letter | शासकीय पत्र | Goodwill | सदिच्छा |
| Programme | कार्यक्रम | Handbill | हस्तपत्रक |
| Plumber | नळ-कारागीर | Honorable | माननीय |
| Pocket Money | हातखर्च | Humanism | मानवतावाद |
| Index | अनुक्रमणिका | Registered Letter | नोंदणीकृत पत्र |
| Junior Clerk | कनिष्ठ लिपिक | Receptionist | स्वागतिका |
| Refreshment | अल्पोपहार | Journalism | वृत्तपत्रकारिता |

# पूरक पुस्तके व संदर्भग्रंथ यांची यादी

## पूरक पुस्तकांची यादी

(१) हाती ज्यांच्या शून्य होते– संपादन अरुण शेवते.

(२) मुसाफिर– अच्युत गोडबोले

(३) एक होता कार्व्हर– वीणा गवाणकर

(४) मन में है विश्वास– विश्वास नांगरे पाटील

(५) आय डेअर– किरण बेदी

(६) आकाशाशी जडले नाते– जयंत नारळीकर

(७) समिधा– साधनाताई आमटे

(८) खरेखुरे आयडॉल– सुधा मूर्ती

(९) संस्कृतीच्या पाऊलखुणा– द. ता. भोसले

(१०) व्यक्ती आणि वल्ली– पु. ल. देशपांडे

(११) झाडाझडती– विश्वास पाटील

(१२) स्वामी– रणजित देसाई

(१३) यश तुमच्या हातात– शिव खेरा

(१४) तोत्तोचान– चेतना सरदेशमुख (अनुवादक)

(१५) आई समजून घेताना– उत्तम कांबळे

(१६) पक्ष्यांचे ठसे– सुधीर मोघे (कविता संग्रह)

## संदर्भ ग्रंथांची यादी

(१) वाचू आनंदे– भाग १ ते ४ – माधुरी पुरंदरे

(२) लिहावे नेटके– भाग १ व २ – माधुरी पुरंदरे

(३) सुगम मराठी व्याकरण व लेखन – मो. रा. वाळंबे



## महत्त्वाची संकेतस्थळे व लिंक्सची यादी

https://youtu.be/NJmOlUnFK54

https://en.wikipedia.org/.../Gajanan_Digambar_Mad..

https://youtu.be/Pz2_lLpyFgY

https://en.wikipedia.org/wiki/Marathi_Vishwakosh

https://en.wikipedia.org/wiki/Charlie_Chaplin

https://en.wikipedia.org/wiki/M._Visvesvaraya

https://en.wikipedia.org/wiki/Olympic_Games

https://youtu.be/EJ9ELMcbn1w

https://www.youtube.com/watch?v=Rm4PS8O8c-A

https://www.youtube.com/watch?v=AhyCHlFF_9Q

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित अधिक माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी कुमारभारती इयत्ता ९ वी (मराठी माध्यम)

₹ ६५.००